नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १८४ * * नागपूर * रविवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## थोडक्यात...

### कोल्ड्रिफ व नेक्स्ट्रो-डीएस सिरपवर एमपीतही बंदी



■ **भोपाळ :** तामिळनाडूपाठोपाठ, मध्य प्रदेशनेही कोल्ड्रिफ आणि नेक्स्ट्रो-डीएस कफ सिरपवर बंदी घातली आहे. या सिरपमुळे छिंदवाडा येथे मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे ११ मुलांचा मृत्यू झाल्याचे मानले जाते. मुख्यमंत्री मोहन यादव यांनी एका पोस्टमध्ये ही माहिती शेअर केली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मुलांना कोल्ड्रिफ आणि नेक्स्ट्रो-डीएस कफ सिरप देण्यात आल्याचे उघड झाले. मुलांच्या मृत्यूनंतर, तपासासाठी तीन पथके स्थापन करण्यात आली आहेत. राज्यस्तरीय चौकशी करण्यासाठी आता विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले जाईल. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी सांगितले, संपूर्ण मध्य प्रदेशात या सिरपच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. सिरप बनवणाऱ्या कंपनीच्या इतर उत्पादनांच्या विक्रीवरही बंदी घालण्यात येत आहे.

### ७ वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून हत्या

**भिवंडी :** ठाणे जिल्ह्यातील भिवंडीत, एका ३३ वर्षीय पॉवरलूम कामगाराने त्याच्या शेजारी राहणाऱ्या सात वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिचा गळा दाबून खून केला. त्यानंतर त्याने मुलीचा मृतदेह एका पोत्यात भरला आणि पळून गेला. आरोपीने अशाच पद्धतीचा अवलंब करत २०२३ मध्येही एक बलात्कार आणि खून केला होता. त्याने भिवंडीमध्ये एका सहा वर्षांच्या मुलीवर क्रूरपणे हल्ला केला आणि नंतर तिची हत्या केली. त्या प्रकरणात तो तुरुंगात होता आणि दोन महिन्यांपूर्वी न्यायालयातून पळून गेला. घटनास्थळापासून दोन किलोमीटर अंतरावर पोलिसांनी त्याला १ ऑक्टोबर रोजी पुन्हा अटक केली.

# ओबीसी नेते मोर्चावर ठाम!

### मुख्यमंत्र्यांसोबतची बैठक निष्फळ : जीआर रद्द करण्याची मागणी : सरकारला अल्टिमेटम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या जीआरचा विरोध करण्यासाठी सकल ओबीसी समाजाच्या वतीने १० ऑक्टोबर रोजी नागपूरमध्ये मोठा मोर्चा काढण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी नेत्यांची बैठक बोलावली होती.

या बैठकीत २ सप्टेंबरला राज्य सरकारने काढलेल्या हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या जीआरवर सविस्तर चर्चा झाली. या जीआरमुळे ओबीसी समाजाचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे सांगत तीव्र भूमिका ओबीसी नेत्यांनी बैठकीत मांडली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी १० ऑक्टोबरचा मोर्चा रद्द करण्याची विनंती केली, मात्र आमच्या मागण्या होईपर्यंत आम्ही मोर्चा काढण्यावर ठाम असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बैठकीत झालेल्या मुद्द्यांवर आणि केलेल्या मागण्यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, आज मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, ओबीसी नेते छगन भुजबळ, पंकजा मुंडे, चंद्रशेखर बावनकुळे आणि महाराष्ट्रातील सर्व ओबीसी नेते यांच्यात बैठक झाली.

या बैठकीत २ सप्टेंबरला मराठा समाजाचे मोठ्या प्रमाणात ओबीसीकरण आणि कुणबीकरण करण्याचा जीआर काढला, त्या जीआरवर आणि ओबीसींच्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. अनेक




नेत्यांनी बैठकीत आपली भूमिका मांडली. या जीआरमुळे ओबीसी समाज मोठ्या अडचणीत आला असून, त्याचे अस्तित्व संपण्याच्या मार्गावर आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण झालेला आहे. अनेक समाज विरोधात उभा राहताना दिसत आहे. समाजामध्ये प्रचंड दरी निर्माण करण्याचे काम या जीआरमुळे होत आहे, हे आम्ही मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

हा जीआर काढत असताना, २००२ चा जीआर आणि त्यानंतर २०१२ त्यामध्ये नियम जे तयार झालेत, ते नियम हा जीआर काढताना दिसले नाहीत. तसेच त्या नियमांचा या जीआरमध्ये कुठेही उल्लेख केलेला नाही. पळवाटा ठेवण्यासाठी, कुठल्या ना कुठल्या



**मोर्चा रद्द करण्याची विनंती**

आमचे वकील ससाणे यांनी मुद्देसूद अभ्यासपूर्व मांडणी केली. मी आणि पंकजा मुंडे यांनी २ सप्टेंबरचा जीआर रद्द करा अशी मागणी बैठकीत केली. २०१४ पासून किती मराठ्यांना ओबीसी किंवा कुणबी प्रमाणपत्र दिलेत, त्याची श्वेत पत्रिका काढण्याची देखील मागणी केली. इतरही भरपूर मागण्या होत्या. पण आमचा त्या मागण्यांवर जोर नव्हता. कारण आमच्या हक्काचे संरक्षण पहिले करणे, हे आमचे काम होते. पण यामध्ये मुख्यमंत्र्यांनी त्या जीआरच्या संदर्भात माहिती देत असताना, आमचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आणि १० चा मोर्चा रद्द करण्याची विनंती केली.

मागनि जाऊन मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र मिळेल अशाप्रकारची व्यवस्था त्या जीआरमध्ये आहे. स्थानिक चौकशी अहवालामध्ये ज्या गोष्टीचा समावेश केलाय,

मुख्यमंत्र्यांनी आजच्या बैठकीत अनेक नेत्यांचे म्हणणे ऐकून घेतले. ठोस असा कोणता निर्णय झाल्याचे म्हणता येणार नाही. त्या जीआरचे ओबीसीवर काही वाईट परिणाम होणार नाही, एवढेच त्यांनी सांगितले. कुणबी आणि मराठा दोन्हीही वेगळे असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने दोन वेळा सांगितले आहे. त्यामध्ये मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसीमध्ये समावेश करणे, हा मूर्खपणा ठरेल असे म्हणत कोर्टाने फेटाळले आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

त्यातुन पूर्ण वंशावळीला त्याचा लाभ होईल, असा विषय आम्ही बैठकीत मांडल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.

मी मुख्यमंत्र्यांना बैठकीत विनंती केली, २ सप्टेंबरचा जीआर रद्द करून श्वेत पत्रिका काढा आणि तो निर्णय घेऊन तुमचा प्रतिनिधी १० ऑक्टोबरच्या मोर्चात पाठवा. आम्ही त्यांचे व सरकारचे स्वागत करू. पण १० ऑक्टोबरचा मोर्चा काढण्याचे आम्ही सर्व सकल ओबीसी महामोर्चाने ठरवले आहे. सरकारला १० ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे, असा इशारा वडेट्टीवार यांनी सरकारला दिला. ओबीसी समाजाच्या १२ जणांनी आमचे संपले म्हणून आत्महत्या केली. सरकारने आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मदत जाहिर करण्याची अपेक्षा होती. पण तशी भूमिका दिसली नसल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

# विंडिजचा धुव्वा!

### एक डाव आणि १४० धावांनी भारताने अहमदाबाद टेस्ट जिंकली



रवींद्र जडेजाने घेतल्या ४ विकेट

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. ४ :** अहमदाबाद कसोटीत टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४० धावांनी पराभव केला. भारताने दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दुसरी कसोटी १० ऑक्टोबरपासून नवी दिल्लीत खेळली जाईल.

शनिवारी, सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, वेस्ट इंडिजचा दुसरा डाव ४५.१ षटकांत १४६ धावांवर संपला. अॅलिक एथनस ३८, जस्टिन ग्रीव्हज २५ धावांवर बाद झाला. रवींद्र जडेजाने चार, मोहम्मद सिराजने तीन, कुलदीप यादवने दोन आणि वॉशिंग्टन सुंदरने एक बळी घेतला.

तत्पूर्वी, भारताने त्यांचा पहिला डाव ४४८/५ वर घोषित केला, ज्यामुळे त्यांना पहिल्या डावाच्या आधारावर २८६ धावांची आघाडी मिळाली. सामन्याच्या पहिल्या दिवशी वेस्ट इंडिजला फक्त १६२ धावा करता आल्या.

## झेडपी आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबरला : नगराध्यक्ष पदांचे आरक्षण सोमवारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर घेण्याच्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर वेगाने तयारी सुरू झाली आहे. जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण येत्या सोमवारी मंत्रालयात सोडत पद्धतीने काढले जाणार आहे. या सोडतीच्या वेळी मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्यासाठी पत्रे देण्यात आली आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने ३२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या सदस्यपदाच्या आरक्षणाची तारीख निश्चित केली आहे. त्यानुसार, १३ ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

या आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर रोजी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबरला सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. या प्रारूप आरक्षणावर १४ ते १७ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून, ३ नोव्हेंबर रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाणार आहे.

राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदाच्या आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी वापरली जाणार आहे. ८ ऑक्टोबरला प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर, त्यावर १३ ऑक्टोबर पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. त्यानंतर २८ ऑक्टोबर रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल.

### भारत खरेदी करणार एके ६३० हवाई संरक्षण तोफ प्रणाली



■ **नवी दिल्ली, दि. ४ :** भारत पाकिस्तान सीमेजवळील सुरक्षा मजबूत करत आहे. हे साध्य करण्यासाठी, लष्कराने अॅडव्हान्स्ड वेपन्स अँड इक्विपमेंट इंडिया लिमिटेडला सहा नवीन एके -६३० एअर डिफेन्स गन सिस्टीम खरेदी करण्यासाठी निविदा जारी केली आहे.

या बंदुकांच्या यंत्रणेची गरज ऑपरेशन सिंदूर दरम्यान जाणवली, जेव्हा पाक सैन्याने लोकसंख्या असलेल्या भागात आणि धार्मिक स्थळांना लक्ष्य केले होते.

### शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा 'यक्षप्रश्न'

■ **वृत्तसंस्था, बारामती, दि. ४ :** राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे आणि शेतजमिनींचे प्रचंड नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.



या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सरकारकडे तातडीने मदत व भरपाई देण्याची मागणी केली आहे. शेतक ऱ्यांची जमीनच वाहून गेली आहे. त्यामुळे त्याचे पुनर्वसन कसे करावे हा यक्ष प्रश्न आहे. शेतकरी अतिशय बिकट परिस्थितीत आहे, त्याला त्वरीत मदतीची अपेक्षा असून, सरकारने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शरद पवार यांनी केली. ते आज बारामती येथे माध्यमांशी बोलत होते.

शरद पवार म्हणाले, शेतकरी अतिशय बिकट परिस्थितीत आहे, त्याला आधार देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत मुसळधार पावसामुळे शेतजमिनी अक्षरशः वाहून गेल्या आहेत. नुकसान भरपाई देऊन आर्थिक मदत करता येईल, पण जमीनच नसलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन कसे करायचे, हा एक मोठा 'यक्षप्रश्न' आहे. आर्थिक आणि भौतिक मदतीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## महाज्योतीला तब्बल १५०० कोटींचा निधी

### ओबीसींसाठी मोठा निर्णय : ६३ वसतिगृहांची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** राज्यात आरक्षण आणि न्याय्य वाटपावरून सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मोठी घोषणा केली आहे. प्रत्येक समाजाला न्याय देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचं स्पष्ट करत त्यांनी



'महाज्योती' संस्थेला तब्बल १५०० कोटी रुपयांचा निधी वितरित झाला असून, ओबीसींसाठी ६३ वसतिगृहे उभारण्यात आली आहेत, असं सांगितलं.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी शिष्टमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री पंकजा मुंडे, छगन भुजबळ, अतुल सावे, आमदार विजय वडेट्टीवार, परिणय फुके, खासदार प्रशांत पडोळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत राज्यातील ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या समितीला मंत्रिमंडळाचे अधिकार देण्यात आले असून, ओबीसी योजनांवर थेट देखरेख ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या सर्व योजना ओबीसी महामंडळांनाही लागू करण्यात आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. जो कुणबी आहे त्याच्यावर अन्याय होणार नाही. खोटी कागदपत्रं चालणार नाहीत, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

### नमकहराम, गद्दारांना मी उत्तर देत नाही..

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ४ :** मी गद्दार, नमकहराम व



हरामखोरांना उत्तर देत नाही, अशा कडवट शब्दांत उद्धव ठाकरे यांनी सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांची टीकेला प्रत्युत्तर देणे टाळले आहे. मी गद्दार व नमकहरामांना उत्तर देत नाही. मला ते देण्याची गरज वाटत नाही. ठाकरे म्हणजे काय? हे संपूर्ण महाराष्ट्र व देश ओळखतो.

आपल्या देशाला आता पंतप्रधान, गृहमंत्री व अख्ख्या मंत्रिमंडळाची गरज आहे. आता एका पक्षाचे मंत्री बसलेत. ते देशाचे नाहीत. देशाचे म्हणून कारभार कुठे सुरू आहे? असा सवाल त्यांनी केला.

### वनडे संघाच्या कर्णधारपदावरून
## रोहित शर्माची उचलबांगडी

शुभमन गिल नवा कर्णधार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** भारताच्या एकदिवसीय संघाचे कर्णधारपद रोहित शर्माकडून काढून घेण्यात आले आहे.




ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी जाहीर झालेल्या भारतीय संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश आहे, परंतु शुभमन गिलला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. गिल आधीच कसोटी कर्णधार आहे.

रोहित आणि विराटने शेवटचा एकदिवसीय सामना या वर्षी ९ मार्च रोजी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध खेळला होता.

भारताच्या एकदिवसीय संघात शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), अक्षर पटेल, केएल राहुल (यष्टीरक्षक), नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा, ध्रुव जुरेल, यशस्वी जयस्वाल यांचा समावेश आहे.

## ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** 'पिंजरा' या अजरामर मराठी चित्रपटातून घराघरांत पोहोचलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री आणि प्रसिद्ध नृत्यांगना संध्या शांताराम यांचे निधन झाले आहे. वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीवर शोककळा पसरली आहे.





१९७२ साली प्रदर्शित झालेला व्ही. शांताराम दिग्दर्शित 'पिंजरा' हा मराठी चित्रपटसृष्टीतील अमर कलाकृती मानली जाते. एका आदर्श शिक्षक आणि तमाशा कलावंत यांच्यातील प्रेम कथेवर आधारित या चित्रपटात संध्या यांनी साकारलेली तमाशातील नर्तिकेची भूमिका प्रचंड गाजली. या भूमिकेमुळे त्या संपूर्ण महाराष्ट्राच्या लाडक्या अभिनेत्री बनल्या. आजही 'पिंजरा' आणि संध्या यांची भूमिका प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.

**अभिनय, नृत्याचा संगम**

ज्येष्ठ चित्रपट निर्माते-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांनी त्यांच्या आयुष्यात तीन विवाह केले होते. संध्या या त्यांच्या तिसऱ्या पत्नी होत्या. दुसरी पत्नी, अभिनेत्री जयश्री यांच्याशी घटस्फोट घेतल्यानंतर अवघ्या एका महिन्यातच शांताराम यांनी संध्या यांच्याशी विवाह केला होता. संध्या यांनी मोजक्याच चित्रपटांमध्ये काम केले असले, तरी त्यांच्या भूमिका अविस्मरणीय ठरल्या. अभिनयासोबतच त्या एक कुशल नृत्यांगना म्हणूनही ओळखल्या जात.

संध्या यांनी १९५९ मध्ये आलेल्या 'नवरंग' सिनेमातून कमाल दाखवली होती. व्ही. शांताराम यांचा हा चित्रपट होता. अरे जा रे हट नटखट हे त्यांचे गाणे आजही तुफान लोकप्रिय आहे.


संध्या शांताराम, यांचे खरे नाव विजया देशमुख होते. दिग्दर्शक व्ही. शांताराम यांना हे गाणे खरोखरच खास बनवायचे होते, म्हणून त्यांनी खऱ्या हत्ती आणि घोड्यांची व्यवस्था केली. सेटवर खऱ्या प्राण्यांमध्ये संध्या निर्भयपणे नाचत होत्या. गाण्याच्या शूटिंगपूर्वी, त्यांनी हत्ती आणि घोड्यांशी मैत्री केली, त्यांना स्वतःच्या हातांनी केळी आणि नारळ खायला दिले आणि पाणी पाजले. संध्यांच्या समर्पणाने आणि धाडसाने दिग्दर्शक प्रभावित झाले.

व्ही. शांताराम संध्यांच्या प्रेमात पडले. व्ही. शांताराम विवाहित असले तरी संध्या यांचे समर्पण आणि तेजस्वीपण त्यांना भुरळ घालत होते. ते आधी त्यांच्या धाडसी स्वभावाने प्रभावित झाले होते.

संध्या यांनी बहुतेक शांताराम यांच्या चित्रपटांमध्ये काम केले, ज्यात झनक झनक पायल बाजे, दो आँखे बारह हाथ, नवरंग, पिंजरा आणि अमर भूपाळी यासारख्या हिट चित्रपटांचा समावेश आहे. जुन्या मुलाखतींमध्ये, शांताराम नेहमी म्हणायचे की संध्याच्या चेहऱ्यावरील हावभाव अविस्मरणीय होते, तिचा आवाज गोड होता, आणि ती एक अद्वितीय व्यक्तिमत्व होती. ही अभिनेत्री आज जग सोडून गेली.

# नागपूरमध्ये एव्हिएशन हब होण्याची क्षमता : गडकरी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ४ :** देशाच्या केंद्रस्थानी असलेल्या नागपूर नागपूरमध्ये एव्हिएशन हब होण्याची क्षमता आहे. त्यामुळे हवाई वाहतूक क्षेत्रामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने कुठलीही तडजोड न करता जबाबदारीने काम करण्याची गरज आहे. आपल्या सर्व क्षमतांचा वापर करून या क्षेत्राला आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज शनिवारी केले.



विकसित भारतात उड्डयन क्षेत्राची भूमिका' यावर परिसंवाद

विकसित भारतामध्ये उड्डयन क्षेत्राची भूमिका या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. एअर ट्रॅफिक कंट्रोलर गिल्ड ऑफ इंडियाच्या वतीने ४ ते ६ ऑक्टोबर या कालावधीत ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेमध्ये केंद्रीय उड्डयन मंत्रालय, एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया त्याचप्रमाणे विविध खाजगी कंपन्यांचे विमान वाहतूक क्षेत्रातील भागधारक सहभागी झाले आहेत.

या कार्यक्रमाला भारतीय विमान प्राधिकरणाचे महाव्यवस्थापक योगीराज सोरटे, एअर ट्रॅफिक कंट्रोलर गिल्ड ऑफ इंडियाचे महासचिव आलोक यादव, असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे सचिव डॉ. विजय कुमार शर्मा प्रामुख्याने उपस्थित होते.

गडकरी पुढे म्हणाले, गेल्या दहा वर्षांमध्ये देशातील विमानतळांची संख्या ७५ वरून १५० झाली आहे. देहरादून ते दिल्ली या स्पाईस जेट्स विमान प्रवासात बायो एव्हिएशन फ्युएलचा वापर करण्यात आला आहे. देशाचे शेतकरी आता परळी, राइस हस्क यापासून बायो एव्हिएशन इंधन तयार करू शकतात.

एम्फिबीयस सीप्लेन अर्थात जमिनीवर आणि पाण्यावर चालणारे विमान याची आवश्यकता आहे. जल आणि वायुमार्गाद्वारे प्रवासी वाहतूक खर्च किफायतशीर आणि जलद करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. यकरिता दिशानिर्देश आणि मार्गदर्शक तत्वे उड्डयन क्षेत्राच्या तज्ज्ञांनी तयार होणे आवश्यक आहे.

हवाई वाहतूक क्षेत्रामध्ये अद्ययावत तंत्रज्ञानाचे अंतर्भाव त्याचप्रमाणे प्रवासी वाहतुकीचा महसूल वाढवण्यासाठी नवनव्या योजनांचा या क्षेत्रातील हितधारकांनी सखोल विचार करावा असे नितीन गडकरी यांनी यावेळी नमुद केले.

# सायबर फसवणूक झाल्यास तक्रार द्या : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

रस्ता अपघातामध्ये ज्या पद्धतीने 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळाल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचू शकतात. त्याच पद्धतीने सायबर फसवणुकीमध्येही 'गोल्डन अवर' महत्वाचा आहे. जेवढी विनाविलंब तक्रार द्याल, तेवढी फसवणूक झालेली रक्कम वाचविणे आणि परत मिळविणे सोयीचे होते. त्यामुळे सायबर फसवणूक झाल्याचे समजल्यास तातडीने विनाविलंब १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सायबर जनजागृती माह ऑक्टोबर २०२५ कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस मुख्यालय येथे झाले. यावेळी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री राणी मुखर्जी, व्हीजेटीआयचे डॉ. फारूक काझी, आयआयटी मुंबईचे प्रा. मंजेश हनवाल यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.



सायबर फसवणूक तक्रारीसाठी 'गोल्डन अवर' महत्वाचा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हे टाळणे हेच सर्वात मोठ आव्हान आहे. गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराला शिक्षा होण्याबरोबरच आर्थिक तोटा टाळणे आवश्यक आहे. सायबर फसवणूक टाळण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या वापरामुळे फिशिंग, ओटीपी फसवणूक, डीपफेक, आवाज व चेहरा क्लोनिंग अशा नवीन तंत्रांचा गैरवापर करून सामान्य लोकांना फसवले जात आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन व्यवहार, पेमेंट्स यामध्ये आपण माहिती देतो. कुकीज स्वीकारल्यानंतर वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ शकतो. यावरून घोटाळे, खंडणी, सायबर बुलिंग यासारखे प्रकार घडतात.

राज्यात जागतिक स्तराची सायबर सिक्युरिटी लॅब, प्रतिसाद केंद्रे आणि रेग्युलेटरी यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. यामुळे फसवणुकीनंतर तत्काळ कारवाई करून नुकसान कमी करता येते. मात्र यासाठी वेळेवर तक्रार होणे महत्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानच धोका असून त्यावर तंत्रज्ञान हाच उपाय आहे. डीपफेकसारख्या आव्हानांवर आपली क्षमता वाढविणे गरजेचे आहे. कोणताही डिजिटल गुन्हा त्याचा डिजिटल फिंगरप्रिंट मागे ठेवतो. त्यामुळे क्षमता आणि जनजागृती दोन्ही समान महत्त्वाचे आहेत. युवकांपर्यंत सायबर सुरक्षिततेबाबत माहिती पोहोचवणे आवश्यक असून, या कार्यात कम्युनिकेटर्सची महत्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला म्हणाल्या की, नागरिकांना सजग ठेवण्यासाठी आणि त्यांचे त्वरित संरक्षण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उल्लेखनीय जनजागृती मोहीम सुरू केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या रेल्वे स्थानकावर दररोज सायबर सुरक्षा सूचना दिल्या जात आहेत. लाखो नागरिक हे संदेश दररोज त्यांच्या दैनंदिन जीवनात ऐकत आहेत. राज्य पोलीस यंत्रणाही जनजागृतीची गरज ओळखून महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये, जिल्ह्यांमध्ये आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सखोल जनजागृती मोहीम राबवत आहे.

यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. तसेच 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी सायबर यावेळी जनजागृतीसाठी काम करणाऱ्या सायबर वॉरियरचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. विशेष पोलीस महानिरीक्षक यशस्वी यादव यांनी आभार मानले.

# बोगस कुणबी प्रमाणपत्र काढल्यास कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याने खोटे प्रमाणपत्र जारी केले किंवा दाखला तयार केला, तर त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज स्पष्ट केले. यावेळी त्यांनी राज्यातील पूरस्थिती लक्षात घेऊन ओबीसी संघटनांना त्यांचा 10 तारखेचा प्रस्तावित मोर्चा रद्द करण्याचेही आवाहन केले.



चंद्रशेखर बावनकुळे यांची स्पष्टोक्ती

राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राच्या माध्यमातून ओबीसी आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. पण या जीआरला ओबीसी नेत्यांनी कडाडून विरोध केला आहे. सरकारने आज ओबीसी नेत्यांची एक बैठक बोलावून त्यांचे म्हणणे जाणून घेतले. त्यात मराठा - ओबीसी वादावर विस्तृत चर्चा केली. त्यानंतर ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या बैठकीत काय झाले? याची माहिती दिली.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सरकारच्या जीआरसंबंधी जो काही संशय निर्माण केला गेला, त्यावर आज ओबीसी नेत्यांचे म्हणणे सरकारने जाणून घेतले. या बैठकीत महाज्योतीला निधी मिळणे, ओबीसी विद्यार्थ्यांना उद्योगांसाठी सवलती देणे, त्यांना कमी व्याजदराचे कर्ज उपलब्ध करून देणे आदी विविध मुद्यांवर चर्चा झाली. सर्वच नेत्यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यात पात्र लोकांनाच मराठा - कुणबी व कुणबी - मराठा प्रमाणपत्र देण्याचा आग्रह धरण्यात आला. कुणीही जीआरचा सरसकट आरक्षण म्हणून गैरफायदा घेऊ नये. विशेषतः खोटे कुणबी प्रमाणपत्र जारी होऊ नये यावरही यावेळी भर देण्यात आला.

बैठकीत काही अधिकाऱ्यांनी खोडाखोडी करून बोगस प्रमाणपत्र दिल्याचा मुद्दा उपस्थित केला. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

त्यानुसार, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल असे स्पष्ट केले. कुणी बोगस प्रमाणपत्र काढले असेल किंवा दाखल्यांवर खाडाखोड केली असेल अथवा एखाद्या अधिकाऱ्याने चुकीचे प्रमाणपत्र दिले असेल, तर त्याला तो अधिकारी सर्वस्वी जबाबदार असेल. त्याच्यावर कारवाई केली जाईल, असे बावनकुळे म्हणाले.

# दिवाळीनंतर आचारसंहिता लागू होईल

## निवडणुकीच्या तयारीला लागा : चंद्रकांत पाटील

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ४ :



महाराष्ट्रात आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात आता चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर तंत्र व उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू, असे त्यांनी म्हटले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, लोकसभा, विधान सभेपेक्षा नेत्याची खरी निवडणूक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका असते. लोकशाहीमधील सर्वात महत्त्वाची ही निवडणूक आहे. कदाचित आज (4 ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल. आता कुणीतरी म्हणतील निवडणूक आयोगाशी दादांची चर्चा झाली वाटते. मी 40 वर्षे यामध्ये घालवली त्यामुळे मी अंदाज मांडला आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू या, असे त्यांनी म्हटले आहे. भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात ते बोलत होते.

पुढे बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, 2019 साली ज्यांचे तिकीट नाकारले त्या बावनकुळे यांना 2024 च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार मिळाले. निवडणूक ही फास्ट ट्रेन प्रमाणे आहे, प्लॅटफॉर्मवर जो राहील तो राहील. मात्र, नाराज होऊ नका. राजकारणात प्रयत्नाबरोबरच नशीब देखील लागते. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मोठा फरक असला पाहिजे. 2017 ची परिस्थिती बदला, त्यासाठी येणाऱ्या दिवाळीचा फायदा करून घ्या. लोकांना भेटून संपर्क वाढवा, असा कानमंत्र पाटील यांनी यावेळी बोलताना दिला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे मात्र शेवटच्या क्षणी कोणता निर्णय घ्यायचा हे वरिष्ठ नेते ठरवतील. आमच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मागत असलेल्या ठिकाणी आपला चांगला उमेदवार असेल तर मैत्रीत लढू, पण कार्यकर्त्यांचा बळी दिला जाईल असे लढणार नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी 2019 साली थोडा समजूतदारपणा दाखवला असता तर हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शोधावे लागले असते, पण ते आडून बसले नसते तर राज्यात चित्र वेगळे दिसले असते.

# वैजापूरच्या ढेकू नदीत एकजण बुडाला

■ महासागर प्रतिनिधी
वैजापूर, दि. ४ :

छत्रपती संभाजीनगरच्या वैजापूर तालुक्यातील राहेगाव शिवारातील ढेकू नदीत शनिवारी सकाळी तीन पोहण्यासाठी उतरले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने ते नदीत वाहू लागले. यातील दोघे कसेबसे बाहेर पडले, परंतु एक जन मात्र नदीत बुडाला आहे. अजय पांडुरंग बोरकर (22, रा. राहेगाव, वैजापूर) असे नदीत बुडाल्याचे नाव आहे.

नदीतून बाहेर पडलेल्या दोघांनी घटनेची माहिती गावात कळवली. गावातील लोकांनी तात्काळ नदीकाठी धाव घेत शोध कार्य सुरू केले. पाण्याचा जोर जास्त असल्याने छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथकाला देखील या ठिकाणी बोलावण्यात आले आहे. पथकातील जवानांनी पाण्यात उतरून अजयचा शोध घेणे सुरू केले आहे. दरम्यान, अजय हा राहेगावचे उपसरपंच पांडुरंग बोरकर यांचा मुलगा असल्याचे समजते.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरात वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत. वैजापूर तालुक्यातील डोंगरथडी भागातील कविटखेडा व अंचलगाव शिवारात दोन मुले पुराच्या पाण्यात सोमवारी (30 सप्टेंबर) दुपारी वाहून गेली होती. गौरव कृष्णा शिंदे (वय 14) व राज गुलाब ब्राह्मणी (वय 6), अशी मृत मुलांची नावे असल्याची माहिती शिवूर ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक वैभव रणखांब यांनी दिली.

वैजापूर तालुक्यातील कविटखेडा येथील गौरव शिंदे हा नववीत शिकणारा मुलगा लोणी-बोलठाण मार्गावरील नदीवरील पुलावरून वाहून गेला होता. घटना घडताच गावकऱ्यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. मात्र, त्याचा मृतदेह आढळून येत नसल्याने छत्रपती संभाजीनगरमधील अग्निशमन विभागाच्या पथकाला पाचारण करावे लागले. मंगळवारी सकाळी गौरवचा मृतदेह हाती लागला.

राज ब्राह्मणी हा सहा वर्षीय मुलगा अंचलगाव शिवारातीलच एका नाल्यात पडला होता. त्याला वाचवण्यासाठी त्याच्या वडिलांनीच नाल्या उडी घेतली. परंतु राजचा बुडून मृत्यू झाला. राजचे कुटुंबीय मध्यप्रदेशातील लखनगाव सेंधवा येथून मजुरीसाठी आले असल्याचे समजते.

# लाडक्या बहिणींना ६ हप्ते एकदाच द्या : उद्धव ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ४ :



मराठवाड्यातील पूरग्रस्तांना मदत करण्याच्या उद्देशाने सरकारने लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना 6 महिन्यांचे हप्त एकगठ्ठा द्यावेत, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी केली. बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथील महिलांच्या खात्यात 10 हजार रुपये टाकले. त्यानुसार मराठवाड्यातील लाडक्या बहिणींनाही एकगठ्ठा 6 हप्ते मदत म्हणून द्यावेत, असे ते म्हणालेत.

उद्धव ठाकरे आज पुण्याच्या दौऱ्यावर होते. तिथे आयोजित पक्षाच्या मेळाव्यात पक्षकार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी वरील मागणी केली. ते म्हणाले, मराठवाड्यात गंभीर पूरस्थिती उद्भवली आहे. तेथील शेतकऱ्यांना व सर्वसामान्य नागरिकांना तत्काळ मदतीची गरज आहे. सत्ता असो किंवा नसो शिवसेना तुमच्या मदतीसाटी आहे. पण ज्या परिस्थितीत मराठवाड्यातील शेतकरी सध्या सापडला आहे, त्यांना तत्काळ मदत करण्याची गरज आहे. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात दोन-तीन महिन्यांचे पैसे एकदाच टाकण्यात आले. त्यानुसार आत्ताही 6 महिन्यांचे हप्ते एकाचवेळी द्या.

# ओबीसींबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ४ :



हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या जीआरचा विरोध करण्यासाठी सकल ओबीसी समाजाच्या वतीने 10 ऑक्टोबर रोजी नागपूरमध्ये मोठा मोर्चा काढण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी नेत्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत 2 सप्टेंबरला राज्य सरकारने काढलेल्या हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या जीआरवर सविस्तर चर्चा झाली. या जीआरमुळे ओबीसी समाजाचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे सांगत तीव्र भूमिका ओबीसी नेत्यांनी बैठकीत मांडली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी 10 ऑक्टोबरचा मोर्चा रद्द करण्याची विनंती केली, मात्र आमच्या मागण्या होईपर्यंत आम्ही मोर्चा काढण्यावर ठाम असल्याचे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बैठकीत झालेल्या मुद्द्यांवर आणि केलेल्या मागण्यांसंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, आज मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री, ओबीसी नेते छगन भुजबळ, पंकजा मुंडे, चंद्रशेखर बावनकुळे आणि महाराष्ट्रातील सर्व ओबीसी नेते यांच्यात बैठक झाली. या बैठकीत 2 सप्टेंबरला मराठा समाजाचे मोठ्या प्रमाणात ओबीसीकरण आणि कुणबीकरण करण्याचा जीआर काढला, त्या जीआरवर आणि ओबीसींच्या अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. या जीआरमुळे ओबीसी समाज मोठ्या अडचणीत आला असून, त्याचे अस्तित्व संपण्याच्या मार्गावर आहे.

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण झालेला आहे. अनेक समाज विरोधात उभा राहताना दिसत आहे. ३० सप्टेंबर रोजी हिंगोली जिल्ह्यातील वेलतुरा गावात वंजारी समाजाच्या लोकांनी देवीची मिरवणूक सुरू असताना गोपीनाथ मुंडेंच्या गाणे लावण्याच्या कारणावरून 12 लोकांना लाठ्या-काठ्यांनी झोडपून काढले.

# ९ ते २३ ऑक्टोबरपर्यंत पावसाची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ४ :

मान्सूनचे चार महिने संपताच म्हणजे १ ऑक्टोबरपासून महाराष्ट्राला ऑक्टोबर हीटचे चटके बसू लागतात. मात्र यंदा परिस्थिती वेगळी राहणार आहे. ९ ते २३ ऑक्टोबर या काळात मोठा दिलासा मिळणार आहे. हवामान खात्याने काही दिवसांपूर्वीच बदलत्या वातावरणाचा अभ्यास केला. त्यानंतर जारी करण्यात आलेल्या विश्लेषणानुसार ९ ते २३ ऑक्टोबर या कालावधीत थंडी वाढून पाऊसही पडेल. परिणामी महाराष्ट्रातील नागरिकांची तीव्र उन्हापासून सुटका मिळण्याची शक्यता वाढली आहे.

सहा वर्षांनंतर ऑक्टोबरची तीव्रता कमी असण्याची स्थिती उद्भवणार आहे. यंदा मे महिन्यापासूनच महाराष्ट्रात पाऊस सुरू आहे. जून महिन्यात तो अपेक्षेनुसार कोसळला. मात्र, जुलै ते सप्टेंबरमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. सप्टेंबरमध्ये तर मराठवाडा, खान्देशात पाऊस अक्षरशः वैरी झाल्यासारखा होता. शिवाय यंदा परतीचा मान्सून राज्यात रेंगाळणार आहे. त्याचा परिणाम ऑक्टोबर हिटवर होत आहे.

सर्वात महत्त्वाची म्हणजे ऐन दिवाळीच्या आठवड्यात राज्यात आल्हाददायक वातावरण असेल, अशी दाट शक्यता आहे. हवामान वैज्ञानिक एस. डी. सानप आणि डॉ. प्रवीण कुमार यांच्या विश्लेषणानुसार, यावर्षी ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्रातील नागरिकांना उष्णतेऐवजी पाऊस आणि थंडीचा अनुभव मिळण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रामध्ये ९ ते २३ ऑक्टोबर या दोन आठवड्या दरम्यान हवामान सामान्यापेक्षा अधिक थंड आणि अधिक पावसाळी, दमट राहील. अधिक अचूकतेने सांगायचे झाले तर १६ ते २३ ऑक्टोबर हा दिवाळी सणाचा आठवडा (२० रोजी नरक चर्तुदशी, २१ रोजी लक्ष्मीपूजन, २२ रोजी पाडवा तर २३ रोजी भाऊबीज आहे.) महाराष्ट्रासाठी अत्यंत आरामदायक असेल.

# एकनाथ शिंदेंच्या ओएसडींच्या भावावर प्राणघातक हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. ४ :



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांचे मोठे बंधू आणि शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्यावर आज सकाळी प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. करमाळा तालुक्यातील हिवरवाडी येथे सकाळी शेतात जात असताना त्यांच्यावर हा हल्ला झाला.

महेश चिवटे यांच्यावर झालेल्या हल्ल्यानंतर महेश चिवटे यांना तातडीने करमाळा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या हल्ल्यामागे दिग्विजय बागल आणि रश्मी बागल यांनी सुपारी दिल्याचा गंभीर आरोप महेश चिवटे यांनी केला आहे.

दिग्विजय बागल हे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत एकनाथ शिंदे गटाकडून उमेदवार होते. तर रश्मी बागल कोलते या भाजपच्या महिला आघाडीच्या प्रमुख आहेत. चिवटे यांनी केलेल्या या आरोपामुळे सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गट आणि भाजपमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा विकोपाला गेल्याचे स्पष्ट झाले आहे. या दोघांमधील वाद यापूर्वीही समोर आला होता.

हल्ल्याची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक रणजीत माने हे तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत.

पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला असून, हल्लेखोर आणि त्यामागील नेमके कारण काय आहे, याचा शोध घेण्यात येत आहे. या घटनेमुळे शिंदे यांच्या शिवसेनेतील अंतर्गत वाद विकोपाला गेला असून, संपूर्ण तपासानंतर सत्य समोर येईल.

# 'ई-केवायसी'च्या ओटीपीची अडचण दूर करणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारला राज्यात पुन्हा सत्तेत आणण्यासाठी गेमचेंजर ठरल्याचे मानले जाते. या महत्त्वपूर्ण योजनेअंतर्गत, पात्र लाभार्थी महिलांना दरमहा 1500 रुपये दिले जातात. मात्र, या योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना महिला व बालविकास विभागाने विकसित केलेल्या पोर्टलवर ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

सध्या लाभार्थी महिलांना या ईकेवायसी पोर्टलवर ओटीपी मिळण्यात तांत्रिक अडचणी येत असल्याचे समोर आले आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट करून या अडचणींची नोंद घेतली आहे. ईकेवायसी प्रक्रियेत येणाऱ्या ओटीपीसंबंधीच्या या तांत्रिक अडचणी लवकरात लवकर दूर केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.



अदिती तटकरेंचे लाडक्या बहिणींना आश्वासन

अदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ईकेवायसी करताना ओटीपी बाबत काही तांत्रिक अडचणी येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. महिला व बालविकास विभागाच्या वतीने याची गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, तज्ञांच्या माध्यमातून याबाबत उपायोजना करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच ही तांत्रिक अडचण दूर होऊन ईकेवायसी प्रक्रिया अधिक सुलभ व सुकर होणार याबाबत मी सर्व लाडक्या बहिणींना आश्वस्त करते, असे आश्वासन तटकरे यांनी दिले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेत केवळ लाभार्थी महिलेचीच नव्हे, तर तिच्यासोबत पती किंवा वडिलांची ई-केवायसी करणेही अनिवार्य आहे. याचा उद्देश हा आहे की, लाभार्थी महिलेचे वार्षिक उत्पन्न तसेच तिच्या पतीचे किंवा वडिलांचे वार्षिक उत्पन्न शोधले जाईल. जर महिलेचे लग्न झाले असेल तर तिच्या पतीचे आणि लग्न झाले नसेल तर वडिलांचे उत्पन्न तपासले जाणार आहे.

लाडकी बहीण योजनेच्या मुख्य अटीनुसार, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. आता लाभार्थी महिलेचे स्वतःचे उत्पन्न आणि त्यासोबतच तिच्या पतीचे किंवा वडिलांचे उत्पन्न मिळून ते अडीच लाखांपेक्षा जास्त आढळल्यास सदर महिला अपात्र ठरवली जाईल.

यापूर्वी केवळ लाभार्थी महिलांचे उत्पन्न तपासण्यात आले होते, जे फारसे अडीच लाखांपेक्षा जास्त नव्हते. त्यामुळे आता कुटुंबाचे एकूण उत्पन्न शोधण्यासाठीच पती किंवा वडिलांची ई-केवायसी आवश्यक करण्यात आली आहे.

# अल्पवयीन मुलीचा गळा दाबून खून

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. ४ :

पाटण तालुक्यातील कोयना विभागातील तळीये (पश्चिम) , ता. पाटण जि.सातारा ) येथील अल्पवयीन मुलीला वाटोळे येथील युवकाने फूस लावून पळवून नेत तिचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खून केल्यानंतर युवतीचा मृतदेह वाजेगाव (ता. पाटण) परिसरातील कोयना नदीच्या किनाऱ्याजवळ पुरल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी ज्ञानदेव तुकाराम सुतार, (वय 37, मूळ रा. वाटोळे-पाटण, सध्या रा. विरार, मुंबई) याला ठाणे रेल्वे स्थानक परिसरातून ठाणे पोलिसांनी अटक करून कोयना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, ऑगस्ट 2024 मध्ये ज्ञानदेव तुकाराम सुतार, वय 37 याने पीडित मुलीस आमिष दाखवून, फूस लावून पळवून नेल्याची तक्रार कोयनानगर पोलिसांत दाखल करण्यात आली होती. कोयनानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाजेगावच्या हद्दीत एका अल्पवयीन गरोदर मुलीचा तिचा प्रियकर ज्ञानदेव सुतार याने खून करून मृतदेह रस्त्याजवळ नदीच्या कडेला खड्ड्यात पुरला आहे.

# विकसित भारतासाठी महिला-बाल विकास योजनांची अंमलबजावणी करा : अन्नपूर्णा देवी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सर्व राज्यांनी करावी, यासाठी केंद्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे प्रतिपादन केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी केले.

महाराष्ट्रात मिशन वात्सल्य व मिशन शक्ती या योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यासाठी केंद्र शासनाकडून समन्वय होणे आवश्यक आहे. तसेच, राज्य कुपोषण मुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असताना अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढविणे अत्यावश्यक असल्याची मागणी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी केली.

केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या अध्यक्षतेखाली आज दूर दृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी विविध राज्याच्या महिला व बालविकास विभागाचे मंत्री दूर दृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.



विकसित भारताच्या दृष्टीने महिला व बालकांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल यावर यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच, योजनांची अंमलबजावणी अधिक बळकट करण्यासाठी स्पष्ट मानव संसाधन धोरण, पुरेसे पायाभूत सुविधा, आर्थिक समतोल, न्याय्य वेतन, विश्वसनीय स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आणि अनुदान यासंदर्भातही चर्चा करण्यात आली. मंत्री आदिती तटकरे यांनी राज्यात बालविवाह, हुंडा प्रथा, घरगुती हिंसा व लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी उपाययोजना तसेच नवीन शिक्षण धोरणांतर्गत पढाई भी, पोषण भी योजना प्रभावीपणे राबविली जात असल्याचे स्पष्ट केले.

तसेच, राज्याची कुपोषण मुक्तीकडे वाटचाल सुरू असून, यासाठी अंगणवाडी केंद्रांची संख्या शहरी आठ हजारांहून अधिक वाढविणे आवश्यक असल्याची मागणी त्यांनी केली. मंत्री तटकरे म्हणाल्या की, २०१८ नंतर अंगणवाडी सेविकांचे मूलभूत प्रशिक्षण व सुविधांची आवश्यक्ता आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि सक्षमीकरणासाठी मिशन शक्ती अंतर्गत वन स्टॉप सेंटर, महिला हेल्पलाईन 181, बेटी बचाओ-बेटी पढाओ, नारी अदालत यांसारख्या योजना सुरू आहेत. त्या अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी भाडेकरार, जिल्हा संरक्षण कक्ष व हेल्पलाईनसाठी स्वतंत्र वाहन असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, पिंक ई-रिक्षा आणि आदिशक्ती अभियान यांमुळे महिलांच्या प्रगतीसाठी राज्याने ठोस पावले उचलली आहेत. बालकांच्या संरक्षण आणि पुनर्वसनासाठी सुरु असलेल्या मिशन वात्सल्य योजनेसाठी जिल्हा संरक्षण कक्षांना वाहने , वेतनमानात सुसंगती, पुरेसा निधी आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग असल्यास योजना अधिक प्रभावीपणे राबवता येईल.

राज्यात महिला आणि बालकांच्या संरक्षणासाठी ठोस धोरणे व योजना कार्यरत आहेत. मात्र त्यांचा परिणामकारक लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र सरकारकडून पुरेशा निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यास महाराष्ट्र या योजनांच्या अंमलबजावणीत देशात आदर्श ठरेल, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

# इंदिराबाई भोसले महाविद्यालयाकडून मदत आवाहन रॅलीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ४ :

येथील राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात मराठवाड्यात मान्सून परतीच्या पावसाने निर्माण केलेली नैसर्गिक पूर परिस्थिती व परिसरातील ८० लाख हेक्टर जमीन व पिके पाण्याखाली, यामुळे झालेल्या अतोनात नुकसानीची परिस्थिती लक्षात घेता. त्यांना आर्थिक मदत देण्याकरिता मदत आव्हान रॅली करण्यात आली.



मराठवाड्यातील पूर परिस्थितीमुळे आलेला दुष्काळ आणि संकटाला तेथील तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यासाठी, एक पाऊल पुढे यावे ही भूमिका घेऊन निधी संकलनासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी करियर संसद सह महाविद्यालयाचे प्राचार्य व करिअर कट्टा समन्वयक यांनी सर्वप्रथम महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना मदतीचे आव्हान केले. सभ्य माणसाला दुःखी, अडचणीत असलेल्या मानवाचे दुःख पाहवत नाही. व माणुसकी जागी होत मदतीचा हात पुढे येतो. एक मदतीचा हात पुढे हजारो हात समोर येत मदतीस तयार होतात.

या प्रेरणेतून जागृत होत राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयापासून ते कुही बाजार पर्यंत मदत आव्हानाची रॅली काढण्यात आली. या रॅली द्वारे कुही भागातील परिसरात कुही मधील ग्रामस्थ, दुकानदार, प्रशासकीय कार्यालय, खाजगी कार्यालय, येथील नागरिकांनी सकारात्मक सहभाग दर्शविला. व विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाला आपले यथाशक्ती योगदान दिले. राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयाच्या या सामाजिक दायित्वाच्या उपक्रमात हार्दिक संवेदनेसह महाविद्यालयाचे घोषवाक्य "एक हात मदतिचा देऊया !! आम्ही देतो....तुम्ही पण द्या !!! याप्रमाणे सर्व तन, मन, धना सह सहभागी झाले.

मदत आव्हान रॅलीच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन मांडेकर, करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण लामखडे व प्रा. डॉ.गायत्री कूकडे यांनी परिश्रम घेतले. तसेच. प्रा. डॉ. सिरास कटमुसरे, प्रा. डॉ. पंकज करंबे, प्रा. सोमकुवर, ग्रंथपाल दिनेश घाटोळ यांनी आपला सहभाग दर्शविला. संजय टेकाम आणि भरत वानखेडे यांनी छायांकनाची जबाबदारी स्वीकारली.

## बंजारा माता मंदिर मैदानावर रावणदहन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ४ :

वागदरा येथील बंजारा माता नवरात्र उत्सव समिती तर्फे" रावण दहन" करण्यात आले. दस?याला रावण व मेघनाद यांचे पुतळे तयार करण्यात आले. सायंकाळी लहान मुलांनी राम, सीता, लक्ष्मण, हनुमान आदी रामायणातील विविध पात्रांच्या वेशभूषा करून शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी परिसरातील शेकडो नागरिक या उत्सवात सहभागी झाले होते. आयोजनाकरिता उद्योजक धनराज बाबडे यांच्या मार्गदर्शनात बंजारा माता नवरात्र उत्सव समितीचे राजेंद्र बोचर, सुनिल वाघमारे, सतिश टाले, दिनेश बारंगे, प्रविण देशमुख, पी. वासलवार, लीलाधर झिले, रणजित बोबाटे, हरिकेश श्रीवास्तव, कैलास चौरीवार, विवेक भांगे,राजू सुलताने, श्याम जावणे, प्रकाश वाढई, बाबाराव साठे, राजेंद्र सिंह, धनराज भावरकर, अजय सिंह,मनोज चौधरी, प्रफूल जिचकार यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा फुले बहुउद्देशीय मंडळद्वारे विजयादशमी उत्सव उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ४ :

दसरा म्हणजे फक्त परंपरा नाही, तर अन्यायावर न्यायाचा विजय साजरा करण्याचा आणि प्रत्येक आव्हानावर मात करण्याची नवी ऊर्जा देणारा सण आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी अन्न व नागरी पुरवठा मंत्री रमेशचंद्र बंग यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय मंडळ, माळीपुरा रायपूर, हिंगणा यांच्या वतीने आयोजित विजयादशमी उत्सव मेळाव्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी बंग म्हणाले की, सत्तेत काम करणाऱ्यांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घेऊन काम केले तरच समाजाची सर्वांगीण प्रगती शक्य आहे. देशभर पेटलेल्या आरक्षणाच्या प्रश्नांवर सरकारला दूरदृष्टीने पावले उचलावी लागतील, अन्यथा कायमस्वरूपी तोडगा निघणे



कठीण होईल.

दसरा मेळाव्याची सुरुवात प्रभू श्रीरामचंद्र यांच्या पालखीच्या नगरभ्रमणाने झाली. पालखी मैदानावर आल्यानंतर रावण दहन करून जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या कार्यक्रमाला माजी मंत्री रमेशचंद्र बंग, माजी सत्ता पक्षनेते बाबा आष्टणकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते दिनेश बंग, हिंगणा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र बोबडे, सरपंच उमेश आंबटकर, सामाजिक कार्यकर्त्या अरुणा बंग, सामाजिक कार्यकर्ते अनिल चानपूरकर, माजी सरपंच जगदीश कनेर वीरश्री चांनपूरकर, शशिकांत थोटे, प्रकाश वानखेडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महात्मा फुले बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने यावर्षी समाजभूषण पुरस्कार पिलाजी (भैय्याजी) बनकर यांना प्रदान करण्यात आला.

## लाव्हाची महाराणी नवरात्रोत्सव उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

लाव्हा ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या संतोषी माता नगरमधील लाव्हाची महाराणी नवरात्र महोत्सवाची विविध स्पर्धेद्वारा सांगता झाली. महोत्सव दरम्यान आमदार समीर मेघे, डॉ.राजीव पोद्दार,सरपंच ज्योत्सना नितनवरे, उपसरपंच रॉबीन शेलारे, माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे, माजी जि. प. सदस्य ममता धोपटे आदींनी मंडळाला भेट दिली.आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष तथा ग्रा.पं. सदस्य आकाश पवार, सचिव सुधीर गरपडे ,प्रणय कांबळे,सार्थक चेटूले, अनिकेत कुंबळे, प्रतीक भिमटे, अभिजीत टिकले, आकाश टिकले,भावेश बिसेन, विशाल शर्मा, अशोक रहांगडाले, शेवंता गजभिये, परदेशी गजभिये आदींनी सहकार्य केले.

# डब्ल्यूसीएल येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड ने ०२ऑक्टो .२०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना त्यांच्या जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहिली.




मुख्यालयात आयोजित समारंभात अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जय प्रकाश द्विवेदी, संचालक तांत्रिक (संचालन आणि प्रकल्प) आनंद प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, विभाग प्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी दोन्ही महान व्यक्तींच्या छायाचित्रांना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जय प्रकाश द्विवेदी यांनी सफाई मित्रांना सन्मानित केले. त्यानंतर उपस्थित पाहुण्यांनी डब्लू सी एल मुख्यालय परिसरात कोल इंडिया लिमिटेडच्या शुभंकराचे अनावरण केले. या मेळाव्याला संबोधित करताना, सीएमडी द्विवेदी म्हणाले की, महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांचे जीवन आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. त्यांचे आदर्श आपल्याला सत्य, अहिंसा, साधेपणा, त्याग आणि राष्ट्रसेवेचा मार्ग दाखवतात. त्यांनी प्रत्येकाने हे आदर्श आपल्या जीवनात आणि कार्य संस्कृतीत आत्मसात करावे आणि देशाच्या प्रगतीत अर्थपूर्ण योगदान द्यावे असे आवाहन केले. महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त मुख्यालयात तसेच डब्ल्यूसीएलच्या सर्व भागात कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

# वैशाली नगर येथे धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ४ :

वैशाली नगर परसोडा शितलवाडी येथे धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त निमित्त डॉ.रोशन अलोने तसेच प्रा.राजेंद्र कांबळे यांचे हस्ते तथागत गौतमबुध्द आणि भारतरत्न परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामुहिक त्रिशरन पंचशील गाथा घेवुन महाप्रसाद वितरन करुण धम्मचक्र परिवर्तन दिवस साजरा करण्यात आला. प्रामुख्याने भाऊराव भिलावे, प्रा.राजेंद्र गायकवाड, चंद्रशेखर सांगोडे, ओंकार खोब्रागडे, राष्टपाल ढोके, देविदास साखरे, जयश्री सांगोडे, संध्या सांगोडे, पुर्वांशी सांगोडे, आशु भोवते, ढोकेताई, वंशीका साखरे, माधवी कांबळे सह आदी उपस्थीत होते.

# नागपूर मध्यवर्ती कारागृहातील १०३ कैद्यांनी दिली गांधी विचार परीक्षा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मुंबई सर्वोदय मंडळ आणि सहयोग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर मध्यवर्ती कारागृहात गांधी जयंतीचे औचित्य साधून कैद्यांसाठी गांधी विचार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक कारागृह व सुधार सेवा; योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कैद्यांमध्ये सुधारणा आणि पुनर्वसनाच्या दृष्टीने हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. नागपूर मध्यवर्ती कारागृहातील न्यायाधीन पुरुष बंदी २५, शिक्षा पुरुष बंदी ३६ आणि महिला बंदीवान ४२ अशा एकूण 103 कैद्यांनी या परीक्षेत आपला सहभाग नोंदविला.

नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक वैभव आगे यांच्या नेतृत्वात आणि अतिरिक्त अधीक्षक दीपा आगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ तुरुंगाधिकारी आनंद पानसरे, तुरुंगाधिकारी बाळासाहेब शिंदे आणि मनोहर भोसले यांनी हा उपक्रम यशस्वी केला.



गांधी विचार परीक्षेचे संयोजक आणि सहयोग ट्रस्टचे विश्वस्त डॉ रवींद्र भुसारी यांच्या संयोजनात ह्यूमन राइट्स अँड लॉ डिफेंडर्सच्या प्रमुख एडवोकेट स्मिता सिंगलकर आणि श्वेता सलील जैन यांनी परीक्षा प्रक्रिया पूर्ण केली. कैद्यांना अभ्यासासाठी गांधी बापू, माझी जीवन कथा आणि सत्याचे प्रयोग अर्थात गांधीजींची आत्मकथा ही पुस्तके इंग्रजी, मराठी आणि हिंदी भाषेत देण्यात आली होती.

# नागपूरमधील एचडीएफसी स्काय ग्राहकांपैकी ७०% उद्योजक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि गतिशील वित्तीय सेवा कंपनी, एचडीएफसी सिक्युरिटीज लिमिटेड (एचएसएल) ने त्यांच्या ग्राहक-केंद्रित डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनबद्दल माहिती दिली आणि आर्थिक वर्ष 26 च्या दुसऱ्या सहामाहीत आणि त्यानंतर भारताच्या आर्थिक विकासासाठी सकारात्मक दृष्टीकोन व्यक्त केला. 25 वर्षांहून अधिक अनुभवासह, एचडीएफसी सिक्युरिटीज उद्योगात आघाडीवर आहे आणि विश्वास, पारदर्शकता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा संगम करून लाखो ग्राहकांसाठी गुंतवणुकीचा अनुभव नव्याने सादर करत आहे, ज्यात पहिल्यांदाच गुंतवणूक करणारे ग्राहक ते अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ व्यक्ती यांचा समावेश आहे. एचडीएफसी सिक्युरिटीजचे सीनियर एग्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट आणि हेड ऑफ इन्स्टिट्यूशनल इक्विटीजचे प्रमुख, उन्मेष शर्मा यांनी गुंतवणूकदारांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी आणि ब्रँडच्या व्यापक प्रवासाला बळकटी देण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांवर सविस्तर चर्चा केली.

आजच्या माहितीपूर्ण आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम गुंतवणूकदारांशी अधिक प्रभावी संवाद साधण्यासाठी आर्थिक सेवांच्या उद्योगातील बदलांविषयीही मार्गदर्शन केले. येथे एकूण 11% नवीन ग्राहक जोडले गेले असून, नागपूरने मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आणि कोल्हापूरलाही मागे टाकले आहे. शहरात महिलांचा सहभाग अधिक असून 52% ग्राहक महिला आहेत.

# वाडीत १८८ रुग्णांची मोफत तपासणी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

प्रत्येक स्त्रीचे आरोग्य चांगले सुदृढ व निरोगी रहावे यासाठी स्वतःच्या आरोग्याची नियमित तपासणी करा. महिलांच्या आरोग्य, सौंदर्य, फिटनेस आणि मानसिक आरोग्यासाठी ही पोषण मुल्यं असलेला आहार अत्यावश्यक आहे याची काळजी घ्यावी. असे आव्हान अध्यक्ष सुरेश बारई यांनी केले. खडगाव मार्गावरील महाकाली शीतला माता मंदिरात नवमीच्या शुभ-पर्वावर रि लाईफ मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल वाडी तथा श्री डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमानाने निशुल्क आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष सुरेश बारई यांच्या हस्ते तसेच री लाईफ हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल ठवरे,डॉ. मीनल धोटे, डॉ.अश्विनी ठवरे, विश्वस्त



सुरेश फलके, प्रवीण डाखोरे,योगेश कुमकुमवार, दिलीप लांजेवार मयूर चौधरी, गुरुदास बावणे, विजय कनेर, शंकर राठी, पुरुषोत्तम कामडी, यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाले. शिबिरात १८८ रुग्णांची मधुमेह उच्च रक्तदाब दमा अस्थमा वात कॅन्सर दंत चिकित्सा आदी आजाराची डॉ. लोकेश सेलोकर,डॉ. मीनल धोटे, डॉ. अश्विनी ठवरे, दिव्यांशी, सायली, योगिता, डॉ. अभिषेक सोनवणे, आदी चमूनी तपासणी करून मोफत औषधी वितरित केली. यावेळी अमोल चरपे, रजनीकांत अतकरी, अतुल कातोरे, अर्जुन जांभुळकर, पवन सिंह, निखिल देशमुख, सुरेश रायडू, किशोर राठोड, शंकर भगत, विनोद चौबितकर प्रामुख्याने उपस्थित होते.

# कन्हान येथे धम्मचक्र प्रवर्तन दिवस उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ४ :

कन्हान शहरात विविध संघटन द्वारे धम्मचक्र प्रवर्तन दिवस विविध कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

**भोजनदान कार्यक्रमाने धम्मचक्र प्रवर्तन व विजयदशमी दिवस उत्साहात साजरा**

कन्हान : - राजे फाउंडेशन कन्हान आणि सत्तधम्म बौद्ध विहार यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मचक्र प्रवर्तन आणि विजयीदशमी दिवस निमित्त रेल्वे स्टेशन रोड, गांधी चौक येथे भोजनदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . सर्व प्रथम विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या उपक्रमात बाहेरून येणाऱ्या हजारो



भाविकांसाठी भोजनदानाची व्यवस्था करुन वितरण करण्यात आले. धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमी हा सामाजिक ऐक्य व बंधुभाव वाढवणारा दिवस आहे. भोजनदान उपक्रमाद्वारे या पवित्र दिवशी भाविकांची सेवा करण्याचा आम्हाला आनंद आहे, असे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी राजे फाउंडेशनचे अध्यक्ष केतन भिवगडे, कैलासजी भिवगडे, आर्यन मेश्राम, रोशन सोनटक्के, नितीन मेश्राम, रॉबिन निकोसे, चिराल वैद्य, रितेश जनबंधू, प्रणय भिवगडे, शुभम चहांदे, देवांशू मेश्राम, अनिकेत मेश्राम, अर्चना मेश्राम, वंदना भिवगडे, वैशाली गजभिये, वनमाला चहांदे, संजना मेश्राम, भारती भिवगडे, संघमित्रा राऊत, सुजाता वासे, वर्षा मेश्राम, करिश्मा मेश्राम, रीना मेश्राम सह आदि नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

**सर्वधर्म समभाव संघटन कन्हान द्वारे धम्मचक्र प्रवर्तन दिवस साजरा**

कन्हान : - सर्वधर्म समभाव संघटन कन्हान द्वारे धम्मचक्र प्रवर्तन दिवस निमित्त कार्यक्रमाचे आयोजन गांधी चौक येथे करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर , राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे, अशोक पाटील यांनी महापुरुषांच्या जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# दीक्षाभूमीवर 'सेवा, ज्ञान आणि शक्ती'चा त्रिवेणी संगम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरची पवित्र दीक्षाभूमी ज्ञान आणि श्रद्धेच्या सागरात न्हाऊन निघाली असताना, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपन्यांतील (महावितरण, महापारेषण व महानिर्मिती) अधिकारी, कर्मचारी आणि अभियंत्यांनी एक अनोखा आणि महत्त्वाचा सेवाभावी उपक्रम राबवून धम्मबांधवांना दिलासा दिला. लाखो अनुयायांसाठी अन्नदान (भोजनदान), ज्ञानदान (पुस्तक वितरण), विविध योजनांची माहिती पुस्तिका वितरण आणि मोफत अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची सोय (प्याऊ) अशा सेवांचा संगम दीक्षाभूमीवर पाहायला मिळाला.

या उपक्रमात धम्मबांधवांना केवळ भोजनच नव्हे, तर विचारांची नवी दिशा देणाऱ्या ग्रंथांचे वितरण करण्यात आले. या ग्रंथदानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'वीझाच्या प्रतीक्षेत' या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. यासोबतच, सामान्य जनतेला थेट फायदा व्हावा म्हणून महावितरणच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या उपयुक्त माहिती पुस्तकांचे वितरण करण्यात आले.



वीज-संबंधित तक्रारी आणि प्रश्नांवर योग्य मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या भोजनदान व पुस्तक वितरण कार्यक्रमाचे उद्घाटन महावितरण, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते झाले. त्यांनी महावितरणच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी माहिती पुस्तिका वितरण मोलाचे ठरत असल्याचे सांगितले. सुहास रंगारी, मुख्य अभियंता, गोंदिया परिमंडल, यांनी अध्यक्षीय भाषणातून भोजनदानासोबतच दीक्षाभूमीवरून बाबासाहेबांच्या विचारांचे आदानप्रदान आणि पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची भूक भागवणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

महापारेषणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सतीश अणे, चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिष गजबे, अकोला परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी देखील आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचलन मधुकर सुरवाडे यांनी तर आभार प्रदर्शन कुणाल पाटील यांनी केले. यावेळी नागपूर शहर मंडलचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे, यंचेसह उमेश शहारे, सम्राट वाघमारे, गौतम धोंगडे, हेमराज ढोके, राहुल जीवतोडे, धम्मदीप फुलझेले, प्रसना श्रीवास्तव, महेश जाधव, योगेश विटनकर, डॉ. अविनाश आचार्य, सुशील विखार यांचेसह अनेक अभियंते व कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवाभाव आणि ज्ञानासोबतच, महावितरणने तंत्रज्ञान आणि योजनांची माहिती देण्यासाठी दीक्षाभूमीवर विशेष दालन उभारले होते. या दालनात प्रधानमंत्री सूर्यघर आणि मागेल त्याला सौर कृषीपंप यांसारख्या महत्त्वाच्या योजनांची माहिती देण्यात आली. दालनात उपयुक्त माहिती पुस्तिका आणि ध्वनीचित्रफितींच्या माध्यमातून योजना समजावून सांगण्यात आल्या. नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी अभियंते आणि कर्मचाऱ्यांची एक विशेष टीम तीन दिवस हजर होती. देशभरातून आलेल्या हजारो नागरिकांनी या दालनाला भेट देऊन महावितरणच्या योजना आणि वीज सुरक्षा नियमांची माहिती जाणून घेतली. या दालनाच्या संकल्पनेत मधुकर सुरवाडे, नरेंद्र तिजारे, कार्यकारी अभियंता राहुल जिवतोडे आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांचे मुख्य योगदान लाभले.

## दुर्गा देवीचे पंचेचाळीस सुवाशिनीद्वारा चरणी कुंकुमार्चन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

दत्तवाडीतील मंगलधाम दुर्गा उत्सव मंडळाचे वतीने मंगलधाम माऊलीचे श्रीपाद श्रीवल्लभ उपासना व पारायण मंडळातर्फे श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे श्री अनघा लक्ष्मी देवी अष्टोत्तरशतनामावली तसेच दुर्गाष्टोत्तर शतनामाने पंचेचाळीस सुवाशिनीनेद्वारा चरणी कुंकुमार्चन करण्यात आले. यावेळी प्रज्ञा चौधरी, वनश्री देशपांडे, शीला गोरडे, वंदना गोरडे, रोहिणी गोरडे, रंजना खर्चे, शोभा व्यवहारे, उषा लंगडे, वर्षा शिंगरु, शोभा भांडे, मालती वंजारी, रजनी क्षीरसागर,निर्मला निघोट, स्वाती वलोकर, दिपीका बावनकुळे, रमा वडस्कर, ललिता अकोटकर, रजनी गुजराती, बन्सोड, पिंकी कुहीके, अतकरी, कल्पना ठाकरे, सपना ठाकरे, नीता ठाकरे, विमल नांदूरकर, पायल तीनखेडे, शारदा कावडकर, किरण सुके, शीला ठाकरे, खाडे, सुके, किस्कोडा, वाघमारे, आदींनी कुंकुम अर्चना करून देवीच्या चरणी सेवा अर्पण केली.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **OBED RAZA ABDUL RAZZAK DOSANI / DOSANI UBAID RAZAAK**. NOW MY NEW NAME IS **OBED RAZA ABDUL RAZZAK DOSANI KACHHI.**
**ADD :** F N 405 RATAN TOWER NO.1 SHANTINAGAR NAGPUR 440002.
PASSPORT NO. **P2372635.**

MY OLD NAME WAS **ABID AJMAL KHAN**. NOW MY NEW NAME IS **ABID KHAN AJMAL KHAN.**
PASSPORT NO. **L7133658.**
**ADD :** FLAT NO.101, VYANKATESH PLAZA, RUIKAR ROAD, MAHAL, NAGPUR, MAHARASHTRA - 440032.

MY OLD NAME WAS **RUKHSANA BEGUM MOHAMMAD YUNUS.** NOW MY NEW NAME IS **RUKSANA JABEEN SHEIKH ANWAR.**
**ADD :** WARD NO.3,NEAR JILHA PARISHAD SCHOOL, BINA SANGAM, NAGPUR CITY, 441102, MAHARASHTRA, INDIA.

MY PASSPORT NO. **G8715848**. MY OLD NAME WAS **VAKIL AHMED MOHAMMAD SIDIQUI SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **VAKIL AHMED MOHAMMAD SIDDIQE SHAIKH.**
**ADD :** PLOT NO.212,JAI HIND NAGAR, NEAR TAUHID MASJID, MANKAPUR, NAGPUR 440030 MS.

I **MOHAMMAD SIDDIQE ABDUL GAFFAR** DECLERED THAT MY SON PASSPORT NO.**G8715848** IS MY INCORRECT NAME WAS **MOHAMMAD SIDIQUI ABDUL GAFAR.** NOW NEW CORRECT NAME IS **MOHAMMAD SIDDIQE ABDUL GAFFAR.**
**ADD:** PLOT NO.212, JAI HIND NAGAR, NEAR TAUHID MASJID, MANKAPUR, NAGPUR 440030 MS

I **SAVIRA MOHAMMAD SIDDIQE** DECLERED THAT MY SON PASSPORT NO. **G8715848** IS MY INCORRECT NAME WAS **SABIRA BEEUM MOHAMMAD SIDIQUI**. NOW NEW CORRECT NAME IS **SAVIRA MOHAMMAD SIDDIQE.**
**ADD.** PLOT NO.212, JAI HIND NAGAR, NEAR TAUHID MASJID, MANKAPUR, NAGPUR 440030 MS

MY OLD NAME WAS **NAZEEFA FAREA MOHD MUJAHIDUDDIN**. NOW MY NEW NAME IS **NAZEEFA FAREA MOHAMMAD MUJAHIDUDDIN QUAZI.**
**ADD :** PLOT NO.1637/A/7, NEW AHBAB SOCIETY, PENTION NAGAR, BORGAON ROAD, NAGPUR 440013 MS.

MY PASSPORT NO. **J8892888**. MY OLD NAME WAS **KHALIL AHMED GUNDUCK**. NOW MY NEW NAME IS **KHALIL AHAMAD SHAIKH.**
**ADD :** KUMBHAR GALLI, MOMINPURA, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SAJJAD MOHAMMAD ZAMEER KHAN**. NOW MY NEW NAME IS **SAJJAD ZAMEER KHAN.**
**ADD :** BADA TAJBAGH, NAGPUR.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ZAMEER USMAN KHAN**. NOW MY NEW NAME IS **ZAMEER KHAN.**
**ADD :** BADA TAJBAGH, NAGPUR.

# एकनाथ शिंदे विरूध्द उद्धव ठाकरे..

**जून २०२२ मधे ठाकरेंच्या शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकावून एकनाथ शिंदे चाळीस आमदारांसह बाहेर पडले आणि उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचे सरकार कोसळले. स्वतः उद्धव यांना वर्षा सोडून मातोश्रीवर अडिच वर्षात परत यावे लागले. त्याचे बक्षिस भाजपाने शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिले. अगोदर अडिचवर्षे मुख्यमंत्री व आता देवाभाऊंच्या महायुती सरकारमधे उपमुख्यमंत्रीपदावर असलेले शिंदे भाजपाला उपयुक्त आहेत. गेल्या चार वर्षापासून शिंदे विरूध्द ठाकरे चालू असलेला संघर्ष आजही कायम आहे हेच दोन ऑक्टोबर रोजी मुंबईत झालेल्या दोन स्वतंत्र दसऱ्या मेळाव्यावरून स्पष्ट झाले.**

शिवसेनाप्रमुख हयात असताही शिवसेनेत फूट पडली होती. पण शिवसेनाप्रमुखांचा दरारा जबर होता. आता उद्धव यांचा दरारा नाही, धाकही नाही. शिंदेंच्या नेतृत्वाखाली झालेला उठाव ते विसरू शकत नाहीत. आपला पक्ष फोडला, पळवला, पक्षाचे चिन्ह चोरले, त्यांच्या बंडामुळेच आपले मुख्यमंत्रीपद गेले ही भावना उद्धव यांच्या मनात कायमची घर करून बसली आहे.

दुसरीकडे, आपणच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचाराचे खरे शिलेदार आहोत, असा दावा शिंदे करीत आहेत. उद्धव यांनी हिंदुत्वाचा विचार सोडून पक्ष काँग्रेसच्या दावणीला बांधला असा आरोप ते सातत्याने करीत आहेत. शिंदे व ठाकरे यांचे स्वतंत्र दसरा मेळावे होत आहेत. दोन्ही नेते एकमेकांना आपल्या राजकीय हल्ल्याचे टार्गेट करीत करीत आहेत.

यावर्षीचा उबाठा सेनेचा दसरा मेळावा शिवतीर्थावर झाला तर शिंदेंच्या शिवसेनेचा मेळावा गोरेगावच्या नेस्को इन डोअर स्टेडियममधे झाला. उबाठा सेनेचा मेळावा पावसात उघड्यावर पार पडला. पावसामुळे शिंदे यांनी शिवसैनिकांची काळजी घेत तो बंदीस्त स्टेडियममधे घेतला. उद्धव ठाकरेंचे नेतृत्व झुगारून बंडाचा झेंडा फडवणारे शिंदे हे सत्तेत तर ठाकरे हे सत्तेविना आहेत.

शिवसेनाप्रमुखांच्या पुण्याईने उबाठासेनेच्या शाखांचे जाळे मुंबई, ठाणे, कोकण, राज्यात सर्वत्र आहे. पण सत्ता गेल्यापासून पक्षाचे सारे नेटवर्क दिशाहिन झाले आहे. शिंदे हे सत्तेत असले तरी ठाणे वगळता अन्यत्र शाखांच्या माध्यमातून पक्ष बांधणीकडे दुर्लक्ष झाले आहे.

रामदास कदम, आनंदराव अडसूळ, गजानन कीर्तिकर, गुलाबराव पाटील, उदय सामंत, प्रताप सरनाईक, नीलम गोऱ्हेंसह शिवसेनेचे बहुसंख्य दिग्गज, मात्तबर आणि सशक्त नेते एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बरोबर आहे. दहा मंत्री सरकारमधे असणे ही पक्षाकडे मोठी ताकद आहे. शिवाय उपमुख्यमंत्री व पक्षाचे मुख्य नेते म्हणून ते पक्षातील सर्वांची मनापासून काळजी घेतात ही मोठी जमेची बाजू आहे.

या उलट उबाठा सेनेत संघटनेकडे बघायला कोणीच नाही, पक्षाच्या कार्यकर्त्यांची विचारपूस करायलाही कुणी पुढे येत नाही. आपली काळजी घेण्यासाठी एकनाथ शिंदे आहेत असा विश्वास शिवसेनेत प्रत्येकाला असतो. उबाठा सेनेत आपले पुढे काय होणार, या काळजीने सारेच चिंताग्रस्त असतात. एकनाथ शिंदे यांच्या पाठिशी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे भक्कम पाठबळ आहे. दुसरीकडे उद्धव यांना देवेंद्र फडणवीसपासून शहांपर्यंत सर्वांशी संघर्ष करावा लागतो आहे.



**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

शिंदे यांनी उद्धव यांच्यावर टीकेची झोड उठवली. कोरोना काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते, तेव्हा सहाशे कोटी जमले पण त्यातला एक रूपयाही खर्च केला नाही, तीस वर्षात महापालिका किती लुटली याचा हिशेब नाही, आम्ही दिल्लीला जाऊन दहा जनपथपुढे मुजरे करीत नाही, संघावर टीका करणारे हे हिंदू कसे असू शकतात ? असा प्रश्न विचारला.

दहा वर्षात मोदींनी महाराष्ट्राच्या विकास प्रकल्पांसाठी दहा लाख कोटी दिले असे सांगत अटल सेतू, नवी मंबई विमानतळ, मेट्रो अशी यादीच शिंदेंनी वाचून दाखवली. उद्धव हे गटप्रमुखही नाहीत ते तर कारस्थान करणारे कटप्रमुख आहेत, अशी त्यांची खिल्ली उडवली. पक्षप्रमुख कधी आपल्या पक्षाच्या लोकांना संपविण्याचे कारस्थान करतो का? या प्रश्नाने शिंदे यांनी उध्दव यांच्या कार्यपध्दतीवरच प्रहार केला. शिंदे यांच्या भाषणात भाजपा, मोदी-शहांची प्रशंसा आणि हल्ल्याचा नेम हा उद्धव ठाकरे हाच होता.

रामदासभाई कदम यांच्या भाषणाने तर मोठा स्फोट झाला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निधन कधी झाले? त्यांचा मृतदेह दोन दिवस मातोश्रीवर का ठेवला होता? माहिती काढा, निधनानंतर त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले. रामदासभाईंच्या या वक्तव्यानंतर अनेकांच्या तोंडून अरे बाप रे असे उदगार निघाले.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून भाजपा, मोदी, शहा आणि संघावर हल्ले चढवले. ठाकरेंच्या मेळाव्यात शिवतीर्थासमोरच राहणारे मनसेचे सुप्रीमो राज ठाकरे आले नाहीत आणि राज- उद्धव यांच्या युतीच्या घोषणाही झाली नाही. मराठीच्या मुद्यावर आम्ही एकत्र आहोत, यापलिकडे युतीची चर्चा पुढे सरकत नाही उबाठा सेनेबरोबर निवडणुकीत मनसे युती करणार की नाही, यावर राज ठाकरे मौन पाळून आहेत.

वाघाचं कातडे पांघरणारा लांडगा माहीत होता, पण मी आज बाळासाहेबांची भगवी शाल पांघरलेल्या गाढवाचं चित्र पाहिलं, अशा भाषेत उद्धव यांनी आपल्या मुख्य प्रतिस्पर्ध्यावर टीका केली. भाजपावाले (महापालिकेत निवडून आल्यावर) समर्पयामी म्हणत मुंबई अडाणींच्या चरणावर अर्पण करतील, संघाला १०० वर्षे होताहेत. पण तुमच्या (भागवतांच्या) मेहनतीच्या वृक्षाला विषारी फळं आली आहेत, तुम्ही समाधानी आहात का? बटेंगे तो कटेंगे च्या घोषणा देता आणि तिकडे मोदी मुस्लिम महिलांकडून राखी बांधून घ्यायला सांगतात, मग खरी भूमिका कोणती ? भाजपा म्हणजे अमिबा आहे, तो वेडावाकडा पसरतो, जिथे गरज वाटेल तिथे युती करतो, शरीरात गेला की पोट बिघडवतो, अशा भाषेत पक्षप्रमुखांनी हल्ले केले.

मुंबई- ठाणे, कल्याण डोंबिवली, मीरा भायंदर, वसई विरार, पनवेल, नवी मुंबई, पुणे, नाशिक, अशा महापालिकांच्या निवडणुकींच्या तारखा जाहीर झाल्या की मराठी व हिंदुत्वाच्या मुद्यावरून शिंदे विरूध्द ठाकरे संघर्षाला धार चढेल व त्याचा लाभ घेण्यासाठी भाजपा पुढे सरसावलेला दिसेल.

## वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु गुरुवर्य ह.भ.प. श्री गोपाळ महाराज

**महाराष्ट्र ही संतांची पुण्यभूमी आहे. महाराष्ट्र हा समाज सुधारक थोरांची कर्मभूमी आहे.तयानीच तर या पुण्यभूमीला एक ओळख निर्माण करून दिली आहे.आजही या संत महात्म्यांचा वारसा व परंपरा निष्ठेने पुढे चालविणारे संत सज्जन आहेत. तेच वैचारिक चळवळीला पुढे चालवताना स्वतः ला चंदनापरी झिजवित आहेत. तथापि वारकरी दिसणं आणि वारकरी असणं यात दोन बाजू आहेत. आचार विचारांतूनच त्याची जाणीव होत असते. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊलेः. याप्रमाणे जीवन जगणाऱ्या अशा संतजनाचा समाजात मोठा आदर असतो अशा आदरयुक्त संत सज्जनांच्या मांदियाळीत गुरुवर्य हरी भक्त परायण श्री गोपाळ महाराज यांचे नांव मोठ्या आदराने घेतले जाते. त्यांचा आज अमृत महोत्सव.**

वै.श्रीराम महाराज मेहूणकर, वै.श्री वासुदेव महाराज व अशा थोर संतांनी वारकरी संप्रदायाला नवसंजीवनी दिली. हे कार्य गोपाळ महाराजांसारखे संतजन पुढे निष्ठेने चालवित आहेत.आणि म्हणूनच अशा लोकोत्तर महाराज मंडळीच्या पायीं भक्तगण आपला माथा टेकवून धन्य होतात.



ह.भ.प. श्री गोपाळ महाराजांचा जन्म ५ आक्टोंबर १९५१ ला शेतकरी कुटुंबात झाला. शेती आणि मातीशी एकनिष्ठ असलेले गोपाळ महाराजांची जन्मभूमी उरळ, ता. बाळापूर जि. अकोला. यावरुनच त्यांना गोपाळ महाराज उरळकर या नांवाने ओळखले जाते. ही ह्या जन्मभूमीची पुण्याई त्यांना लाभली आहे.

ग्रामसंस्कृतीतूनच ते लहानाचे मोठे झाले.त्यांच्या चालण्याबोलण्यातून ते जाणवते. अर्थात मातोश्री मनकर्णाआई व पिताश्री तुकाराम पाटील माळी यांचे संस्काराने त्यांचे सहजीवनाला सुंदर आकार मिळाला. आकोट तालुक्यातील देवरी हे त्यांचं मामकुळ आहे. त्यांचे आजोबा वै. अमृतराव आनंदराव फोकमारे यांचेकडूनही धार्मिक आध्यात्मिक व सामाजिक आदर्श मुल्य शिक्षण मिळाले. हाच मातृ पितृ वंशानुबंध त्यांचा खरा प्रेरणा स्त्रोत आहे.

महाराजांचे प्राथमिक शिक्षण उरळ येथे तर माध्यमिक शिक्षण निंबा येथे झाले.शालेय शिक्षणा सोबत समाज जीवनातून जीवन शिक्षणाचे धडे घेत त्याचं सात्विक व समाजशील व्यक्तित्व घडले. त्यांना बालवयापासून धार्मिक व आध्यात्माची आवड होती.आणि म्हणूनच ते आध्यात्मिक शिक्षणाकडे आपसूकच वळले.

मनुष्याचे जीवनात गुरुंचे महात्म्य अनन्यसाधारण आहे. वै.ह.भ.प.श्रीराम महाराज मेहूणकर यांचे गुरुत्वाकर्षणाने ते प्रभावित झाले.त्यांचेवर श्रद्धा व निष्ठा ठेवून त्यांनी आपला जीवन मार्ग स्वीकारला अर्थात गुरुंच्या आशिर्वादाने त्यांचं जीवन सुवर्णमय झाले.

**नंदकिशोर पं. हिंगणकर**
विश्वस्त
श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्रद्धासागर आकोट.
8767597166

या आध्यात्मिक प्रवासात गुरुबंधू ह.भ.प. तुकाराम महाराज सखारामपूरकर, ह.भ.प. भास्करगीरी महाराज देवगड ,ह.भ.प. जगन्नाथ महाराज वसू नेव्होरीकर, ह.भ.प. सारंगधर महाराज मेहूणकर आदींचा सहवासाने त्यांचा अमृतकाळ आनंदमयी झाला. या संत सहवासात त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलून गेला.

या संत संगतीत वारकरी जीवनाची अंतरंगात पेटविलेली ज्योत आजही प्रखरतेने तेवत आहे . आदिशक्ती मुक्ताई वारकरी शिक्षण मेहूण या संस्थेत तीन वर्षीय अभ्यासक्रम पूर्ण केला.त्यानंतर वारकरी संप्रदायाचे प्रचार व प्रसारासाठी स्वतःला वाहून घेतले.

श्री ज्ञानेश्वरी , श्री तुकाराम गाथा, एकनाथी भागवत हेच त्यांचे भावविश्व आहे. त्याचा सखोल अभ्यास, मनन चिंतनातून आपली भूमिका मांडताना संत विचारांचे ते पाईक झालेत.याच विचारधारेने त्यांचं जीवनपुष्प सुंगधीत झालं आहे. हा सुगंध चारही दिशा दरवळत आहे.

गुरुवर्य वै.श्रीराम महाराज हेच त्यांचे ब्रम्ह विष्णू महेश्वर आहे. एक प्रकारे या गुरुकृपेनेच ते वयाच्या पंचाहत्तरीत ताठ मानेने उभे आहेत. ब्रम्हचर्य स्विकारून त्यांनी केलेली आजवर निष्काम सेवा वारकरी संप्रदायातील नव्या पिढीला प्रेरणादायी आहे.

श्री गुरू सारिखा असता
पाठीराखा इतरांचा
लेखा कोण करी

या प्रमाणे एक प्रकारे त्यांचं अधिष्ठित झालं शेगांव निवासी सद्गुरू श्री गजानन महाराजांवर त्यांची अढळ श्रद्धा आहे. श्रद्धा-भक्ती,ज्ञान आणि वैराग्य यांचा त्रिवेणी संगम म्हणजे गोपाळ महाराज होत. पंढरपूर निवासी विठ्ठलाचे ते निस्सीम उपासक आहेत. अनेक वर्ष त्यांनी पंढरपूर आळंदीची पायदळ वारी केली. श्री गजानन महाराज संस्थानचे व्यवस्थापकीय विश्वस्त कर्मवीर वै. शिवशंकर पाटील यांनी त्यांचेवर बंथूवत प्रेम केले. याच ऋणानुबंधातून सद्गुरूंच्या शेगांव पंढरपूर पालखी सोहळ्यात १४ वर्ष सहभागी होण्याचा सुंदर योग आला.

*पंढरीची वारी आहे माझ्या घरी।*
*आणिक न करी तीर्थव्रत।।*
*व्रत एकादशी करीन उपवासी।*
*गाईन अहर्निशी मुखी नाम।।*
*नाम विठोबाचे घेईन मी वाचे।*
*बीज कण्यांतीचे तुका म्हणे।।*

एकप्रकारे त्याचं जीवन विठ्ठलमय झालं असंच म्हणावं लागेल. टाळ,मृदंग आणि विणा, ज्ञानेश्वरी गाथा हेच त्यांचे जीवनाचे खरे संसाधन झाले आहे. संत विचार, त्यांची शिकवण लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते निष्ठेने कार्य करत आहेत. समाज जीवनात वावरताना समाजांचे सुख दुःख अगदी जवळून अनुभवली. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा , बुवाबाजी , कर्मकांड , वाईट चालीरिती प्रथा परंपरेत आकंठ बुडालेला समाज बघतांना

*बुडती हे जन बघावे ना डोळा*

आणि म्हणूनच त्यांनी या गर्तेतून समाजाला वाचविण्यासाठी प्रवचन कीर्तन व जन संवादातून समाजाला जागविण्याचा प्रयत्न केला यातून त्यांचा समाजाप्रती असलेला कळवळा अधोरेखित होतो. ते समाज प्रबोधनाचे क्षेत्रातही दिपस्तंभा सारखेच आहेत.

ते हाडांचे शेतकरी. उत्तम शेती करतांना एक प्रगतशील शेतकरी म्हणूनही त्यांचा परिचय आहे . साधी राहणी ,संतविचारसरणी, शुद्ध चरित्र, निर्मळ स्वभाव आणि परमार्थिक निष्काम सेवा निश्चितच त्यांचे जीवनाला बावनकशी साधूत्व प्राप्त करुन देण्यारं आहे. लट्ठ आणि उंच शरीरयष्टी, श्वेत वस्त्र, फेटा-टोपीतील त्यांचं साधुत्व प्रत्येकाचे मनात त्यांचेप्रती आदरभाव निर्माण करणारा आहे. म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे.

असे असतांनाही स्वतः चा अभिर्भाव, अहंकार व मोठेपणा कधीच मिरवला नाही आणि तारांकित वलय निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्नही केला नाही. यातच त्यांचं प्रखर साधुत्व उजळून निघाले आहे.

गुरुवर्य महाराजांनी शतायुषी व्हावं. त्यांना निरामयी व सदृढ आरोग्य मिळावे आणि अशीच त्यांचेकडून संतसेवा घडत रहावी या प्रार्थनेसह त्यांचे त्रिवार अभिष्टचिंतन!

■ ■ ■

## अध्यात्म, विज्ञान आणि परंपरा यांचा अनोखा संगम : कोजागिरी पौर्णिमा

**वाचक लिहितात**

आश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमा. याची आणखीही वेगवेगळी नावे आहेत. कौमुदी पौर्णिमा, शरद पोर्णिमा, आसावरी पौर्णिमा, माडी पौर्णिमा असे सुद्धा कोजागिरी पौर्णिमेला म्हटले जाते.

कोजागरी पौर्णिमेच्या अनेक कथा आहेत, त्यापैकी एक अशी सांगितली जाते की, एकदा एक राजा आपले सगळे वैभव्य आणि संपत्ती गमावून बसतो. त्याची राणी महालक्ष्मीचे व्रत करते आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होऊन तिला आशीर्वाद देते आणि त्या राजाचे वैभव त्याला परत मिळते. असं म्हणतात की महालक्ष्मी विष्णुसह मध्यरात्री या चंद्रमंडलातून उतरून खाली पृथ्वीवर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात अमृतकलश घेऊन प्रत्येकालाच विचारते, की को जागर्ति...? को... जागर्ति...?' म्हणजे आपल्या कर्तव्याला कोण जागृत आहे का? कुणी जागं आहे का? आणि तिच्या हाकेला साद देण्यासाठी सगळेच जागे राहतात. मग तिची वाट पाहणाऱ्या, साद देणाऱ्या सगळ्यांना ती अमृत' म्हणजे लक्ष्मीचं वरदान देते, धनधान्य, सुखसमृद्धी देते. या दिवशी मध्यरात्री इंद्र, कुबेर, लक्ष्मी पूजन करतात.

शरद ऋतूमध्ये हवामानात बरेच बदल घडून येत असतात.एकीकडे पावसाळा संपत असतो आणि दुसरीकडे हिवाळा सुरु होत असतो. कोजागिरी पौर्णिमा ही शरद ऋतूत येते. दिवसा गरम आणि रात्री थंडी पडते. या दिवशी चंद्राच्या प्रकाशात एकप्रकारची आयुर्वेदिक शक्ती आहे. त्यामुळे हे दूध आरोग्यदायी आहे.

दूध आटवून त्यात काही आरोग्याला लाभदायक पदार्थ घालून प्यायल्याने कफ दोषाचा नाश होतो. आजही कित्येक ठिकाणी ज्यांना अस्थमाचा त्रास असणाऱ्यांसाठी हे औषधीयुक्त दूध चंद्र प्रकाशात वाटप करतात. कोजागरीचं शीतल चांदणं अंगावर घेतलं, की मनःशांती, मनःशक्ती, उत्तम आरोग्य लाभतं. या दिवशी प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठअपत्याला ओवाळून त्याची किंवा तिची अश्विनी साजरी करतात.

हिंदू धर्मातील प्रत्येक सण, शास्त्र आणि विज्ञान याची जाण ठेवून साजरा केला जातो. कुटुंबातील प्रमुख व्यक्तीला पुढील पिढीपर्यंत मानसन्मान मिळावा म्हणून हे पूजन केलं जातं. कोजागिरी पौर्णिमा ही केवळ लक्ष्मीप्राप्तीचा उत्सव नाही, तर विज्ञान, आरोग्य आणि कुटुंबसंस्कार यांचा सुंदर संगम आहे. या रात्री लक्ष्मीमाता को जागर्ति? अशी हाक देत प्रत्येकाच्या कर्तव्यपरायणतेची परीक्षा घेते. म्हणूनच कोजागिरी हा सण म्हणजे अध्यात्म, विज्ञान आणि परंपरा यांचा अनोखा संगमोत्सव आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

■ **सौ. रमा देशमुख**
**नागपूर.**

# तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स



आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ॲपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ॲपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला.

सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता.

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले.

कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ॲपल.

पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ॲपल 1 पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ॲपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते.

या कंपनीने ॲनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ॲपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ॲपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ॲपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ॲपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले.

आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ॲपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला.

हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ॲपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ॲपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले.

सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला.

त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन! ■ ■

# इन्कमटॅक्स विभाग कशी पकडतो कॉम्पुटर सिस्टम चोरी ?

**बेंगलोर सुलतान ज्वेलरी शोरूमचा गौप्यस्फोट कसा केला गेला?**

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




आज आपण कॉम्पुटर तथा इन्कमटॅक्स या बद्दलची व्यवहारीक माहिती बघणार आहोत, जी नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणार आहे.

**प्रश्न - डिजिटल म्हणजे काय?**

■ डिजिटल म्हणजे इलेक्ट्रानिक तंत्रज्ञान या तंत्रज्ञानामध्ये माहिती किंवा डेटा १ आणि ० या मध्ये साठवले जाते. यालाच सकारात्मक आणि नकारात्मक असे ही म्हटले जाते. सोप्याभाषेत असे म्हणता येईल डिजिटल म्हणजे इलेक्ट्रानिक मशीनद्वारे वापरली जाणारी ० व १ या मालिकेत व्यक्त होणारी माहिती. आजच्या काळात हीच माहिती संगणक, स्मार्ट फोन आणि इतर अनेक यंत्रामध्ये वापरली जाते.

**प्रश्न - इन्कमटॅक्स अधिकारी computer करदात्यास मागु शकतात का?**

■ होय, इन्कमटॅक्स अधिकारी करदात्यास computer चे device तथा पूर्ण computer ची मागणी करू शकतात.

**प्रश्न - इन्कमटॅक्स अधिकारी पासवर्ड मागू शकतात का? पासवर्ड देणे करदात्यास आवश्यक आहे का?**

■ इन्कमटॅक्स अधिकारी करदात्यास पासवर्डची मागणी करू शकतात पासवर्डची मागणी केल्यानंतर करदात्यास पासवर्ड देणे कायद्याने बंधनकारक आहे. जर पासवर्ड इन्कमटॅक्स अधिकारी यांना दिला नाही तर ते password crack करू शकतात. अशा वेळेस त्यांना फोटो काढणे वगैरे formalities कायद्याने कराव्या लागतात.

**प्रश्न - डिजिटल पुरावा करदात्याने दिला आणि तो खराब झाला तर काय करावे?**

■ हा एकच ओरिजिनल पुरावा असतो म्हणून तो खराब होता कामा नाही. या साठी या ओरिजिनल copy ची duplicate copy काढली जाते, यामुळे copy खराब होणार नाही.

**प्रश्न - computer system मध्ये calculator येतात का?**

■ Calculator हे computer मध्ये धरले जात नाही. याचे कारण असे की यात program-minig वगैरे काहीच करता येत नाही.

**प्रश्न - इन्कमटॅक्स अधिकारी करदात्याचे computer घेऊन जाऊ शकतात का ?**

■ होय इन्कमटॅक्स अधिकारी यांना computer घेऊन जाण्याचे अधिकार आहेत परंतु सहसा ते computer जप्त न करता त्याच्या Hard Disk वगैरे घेऊन जातांना दिसतात. इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना करदात्यावर त्यांना फारच शंका आल्यास ते सर्व computer व पार्टस घेऊन जाण्याचे त्यांना अधिकार आहेत.

**प्रश्न - बेंगलोर सुलतान ज्वेलरी शोरूमचा दोन नंबरचा व्यवहार इन्कमटॅक्स वाल्यांनी कसा पकडला?**

■ इन्कमटॅक्स विभागाने त्यांच्यावर Forensic Software चा वापर करून लपवलेले Software शोधून काढले. त्यांच्या 20 शोरूम वर एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या.

प्रत्येक शोरूम मध्ये त्यांना दोन-दोन कॅश बुक तथा दोन वेगवेगळे Cash Balance सापडले. विक्री रजिस्टर सह सर्व Stock बुकचे Double Software शोधुन काढण्यात forensic software ला यश आले व त्या आधारे इन्कमटॅक्सवाल्यांनी त्यांना रंगेहात धरले. ] इतकेच नाही तर जी प्रमुख कंपनी यांना स्पेशल चोरीसाठी software बनवून देत होती त्या M/s PQR software Pvt.Ltd. या कंपनी वर सुद्धा धाडी टाकण्यात आल्या ज्यामुळे सुलतान ज्वेलरी शो रूमचा संपूर्णतः भांडाफोड झाला. यासाठी Advanced क्लोन डिस्क ही बनवण्यात आले. या प्रकारे कंपनी चे 1300 किलो सोने त्या काळी जप्त करण्यात आले.

पुढील लेखमालेपासुन आपण हॉल मार्किंग तथा गोल्ड मॉनीटायझेशन स्कीम बद्दल महिती जाणुन घेणार आहोत. ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉट्सॲपवर प्रश्न send करावे म्हणजे त्यांची उत्तरे निशुल्क याच पेपरात त्यांच्या नावासह दिले जातील, ही नम्र सुचना.

■ ■ ■

# दररोज जेवणानंतर 2 हिरव्या वेलची चावून खा



तुम्ही अशा लोकांपैकी एक आहात का जे दिवसभर काम करतात आणि रात्री झोपायला जातात, पण झोप येत नाही? जेवणानंतर गॅस, ॲसिडिटी किंवा पोटफुगीसारख्या समस्या तुम्हाला त्रास देतात का? जर या प्रश्नांची उत्तरे हो असतील, तर उपाय स्वयंपाकघरातच आहे.

आपल्या स्वयंपाकघरातील असे अनेक मसाले आहेत ज्यांच्या सेवनाने आपल्या व्याधी आपण दूर करू शकतो. जसं की, वेलची. वेलची ही जवळपास सर्वांच्याच स्वयंपाकघरात असते. ही हिरवी वेलची शक्यतो आपण गोड पदार्थांची चव वाढवण्यासाठी वापरतो. हीच एवढीशी वेलची आपल्या शरीरासाठी देखील फायदेशीर असते. आपल्या रोज रात्री जेवण झालं की फक्त २ वेलची चावून खाण्याने अनेक समस्या दूर होऊ शकतात.

**हिरवी वेलची कशी फायदेशीर ठरते?**

अनेकजण हिरवी वेलची चहा, बिर्याणी किंवा खीरचा स्वाद वाढवणारा मसाला मानतात पण प्रत्यक्षात, ही छोटी, सुगंधी वेलची तुमच्या आरोग्यासाठी चमत्कारापेक्षा कमी नाही.

**पचन सुधारते** : आजच्या धावपळीच्या शेड्यूलमध्ये खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे पचनाच्या समस्या सामान्य झाल्या आहेत. रात्रीच्या जेवणानंतर दोन हिरवी वेलची चावल्याने पचनसंस्था मजबूत होते. वेलचीमध्ये असे संयुगे असतात जे पाचक एंजाइम्सना उत्तेजित करतात, ज्यामुळे जलद आणि अधिक परिपूर्ण पचन होते. ते गॅस, आम्लता आणि पोटफुगीसारख्या समस्यांपासून मुक्त होण्यास देखील मदत करते.

**तोंडाची दुर्गंधी दूर होते** : तोंडाची दुर्गंधी ही एक सामान्य अस्वस्थ करणारी समस्या आहे. जेवणानंतर वेलची चावल्याने ही समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते. वेलचीचा सौम्य सुगंध तोंडाची दुर्गंधी त्वरित दूर करतो. त्याचे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म तोंडाची दुर्गंधी निर्माण करणारे बॅक्टेरिया देखील मारतात, जे तोंडाची दुर्गंधी निर्माण करण्याचे एक प्रमुख कारण असतात.

**झोपेच्या समस्यांपासून आराम** : आजकाल, ताणतणाव प्रत्येकाच्या जीवनाचा एक भाग बनला आहे, ज्याचा आपल्या झोपेवरही परिणाम होतो. जेवणानंतर वेलची चावल्याने मन शांत होते. वेलचीमध्ये असे संयुगे असतात जे शरीरात सेरोटोनिन वाढवतात. सेरोटोनिन हे एक नैसर्गिक मूड बूस्टर आहे जे तणाव कमी करण्यास मदत करते आणि गाढ आणि गाढ झोपेला प्रोत्साहन देते.

**रक्तदाब नियंत्रित करा** : उच्च रक्तदाब ही एक गंभीर स्थिती आहे ज्यामुळे इतर अनेक आजार होऊ शकतात. वेलचीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम सारख्या खनिजे भरपूर प्रमाणात असतात, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. रात्रीच्या जेवणानंतर वेलची खाल्ल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि हृदय निरोगी राहण्यास मदत होते.

**वजन कमी करण्यासही उपयुक्त** : जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर रात्रीच्या जेवणानंतर वेलची खाणे फायदेशीर ठरू शकते.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## अभिजात दर्जा

मातृभाषेचा अवमान
आपणच तर करतो
स्वाक्षरी पुरतचं
कां इंग्रजी वापरतो?

इंग्रजांचा आमच्यावर
पडला एवढा प्रभाव
आम्ही मराठीत बोलणेही
कमी समजतो राव?

कॉन्व्हेंट संस्कृतीने मुलांची
तुटलीय मराठीशी नाळ
अभिजात दर्जा मिळाला म्हणून
काही फरक पडणार हाय?

# लक्ष्मी निवास मध्ये मानसी जोशी रॉय आणि राजेंद्र चावला एकत्र!

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
भारतातील प्रत्येक मध्यमवर्गीय संयुक्त कुटुंबाची दोनच मोठी स्वप्ने असतात स्वतःचे घर बांधणे आणि मुलींची लग्ने लावून देणे. हाच भावनिक प्रवास वास्तवात आणत, झी टीव्ही आपली नवीन मालिका लक्ष्मी निवास घेऊन येत आहे. प्रेम, एकोप्याची भावना आणि कुटुंबाचे सार जपणारी ही हृदयाला भिडणारी कहाणी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

ही वाहिनी नेहमीच अशा कथा सादर करत आली आहे ज्या भारतीय कुटुंबांच्या मनाला भिडतात. लक्ष्मी निवास मध्यमवर्गीय कुटुंबाच्या दैनंदिन संघर्षांवर आणि त्यागांवर प्रकाश टाकते. जुन्या परंपरा आणि मूल्ये जपत नव्या पिढीची स्वप्ने आणि बदलत्या आकांक्षा यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न ही मालिका करणार आहे.

या मालिकेची कथा लक्ष्मी आणि श्रीनिवास या मध्यमवयीन दांपत्याची आहे. त्यांनी तब्बल ३५ वर्षे भाड्याच्या घरात घालवली आहेत, पण स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्न त्यांनी आपल्या उराशी कायम जपले आहे. त्याचबरोबर आपल्या मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील राहिले आहेत.

लोकप्रिय अभिनेत्री मानसी जोशी रॉय या मालिकेत प्रमुख भूमिकेत दिसणार असून त्या लक्ष्मीची भूमिका साकारणार आहेत. तर ज्येष्ठ अभिनेते राजेंद्र चावला श्रीनिवासची भूमिका साकारणार आहेत. श्रीनिवास हे कुटुंबासाठी जगणारे, प्रेमळ पती आणि जबाबदार वडील आहेत. त्यांचे एकमेव अपूर्ण स्वप्न म्हणजे आपल्या कुटुंबासाठी स्वतःचे घर बांधणे. अखेर हे स्वप्न पूर्ण करण्याच्या प्रवासाला सुरुवात होते, पण त्याच वेळी नव्या पिढीची महत्त्वाकांक्षा आणि आई-वडिलांची मनापासूनची इच्छा यांच्यात संघर्ष उभा राहतो आणि त्यांच्या आयुष्यात नवी आव्हाने येऊ लागतात.



आपल्या भूमिकेबद्दल बोलताना मानसी जोशी रॉय म्हणाल्या, लक्ष्मी म्हणजे प्रत्येक भारतीय आई, जिला आपल्या मुलांना नेहमी आनंदी पाहायचे असते. मला या भूमिकेकडे आकर्षित करणारे कारण म्हणजे ती लाखो स्त्रियांच्या भावनांचे, त्यांची ताकद, त्यांची स्वप्ने आणि प्रत्येक संकटात कुटुंबाला एकत्र ठेवण्याची त्यांची क्षमता यांचे प्रतिबिंब आहे. लक्ष्मी निवास ही फक्त घर बांधण्याची गोष्ट नाही, तर प्रेम, विश्वास आणि एकोप्याने भरलेले आयुष्य उभारण्याची कथा आहे.

## साई बल्लाळ तुम से तुम तक मध्ये जालंधर बल्लाळ यांच्या भूमिकेत

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
झी टीव्हीवरील वेगळी प्रेमकथा तुम से तुम तक मध्ये शरद केळकर आणि निहारिका चौक्सी अनुक्रमे आर्यवर्धन आणि अनु यांच्या भूमिकेत असून ते प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करत आहेत. वय आणि वर्ग यांच्या पलीकडच्या नात्यांना नवा अर्थ देणाऱ्या या मालिकेत आता एक जबर एंट्री होणार आहे. प्रसिद्ध अभिनेते साई बल्लाळ आता या मालिकेत जालंधर बल्लाळची भूमिका साकारणार आहेत. २० वर्षे तुरुंगवास भोगून बाहेर आलेला हा माणूस आतून फार जखमी आहे आणि आर्यवर्धनवर सूड उगवण्याचा त्याने निर्धार केला आहे.

जालंधरच्या आगमनामुळे तुम से तुम तक मध्ये सूड, टक्कर आणि अनपेक्षित वळणांनी भरलेले एक थरारक नवीन पर्व सुरू होणार आहे. हे नाट्य उलगडताना पहा दररोज रात्री ८:३० वाजता तुम से तुम तक मध्ये फक्त झी टीव्हीवर!

# प्रिमियर इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे सेबीकडे डीआरएचपी सादर

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
वेल्डिंग कंझ्युमेबल्स उद्योगातील पावडर्स तसेच वायर्स या दोन्ही श्रेणींमध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या उत्पादकांपैकी एकप्रिमियर इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेडने मार्केट रेग्युलेटर सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे.

कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्रीमध्ये प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याचे २७,९००,००० इक्विटी शेअर्स समाविष्ट आहेत. त्यामध्ये २२,५००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि ५,४००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे.

ऑफर फॉर सेलमध्ये अरविंद छोटालाल मोरजारिया यांच्या द्वारे २,१७०,८०० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, दिलीप छोटालाल मोरजारिया यांच्या द्वारे१,७४०,०३० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, सुभाष छोटालाल मोरजारिया यांच्या द्वारे१,०७८,७७० पर्यंतचे इक्विटी शेअर्स, ललित नवीनचंद्र मोरजारिया यांच्या द्वारे३४१,८९५पर्यंतचे इक्विटी शेअर्स आणि निर्मला नवीनचंद्र मोरजारिया यांच्या द्वारे६८,५०५ पर्यंतचे इक्विटी शेअर्स समाविष्ट असून एकत्रितपणे विक्री समभागधारक म्हणून ओळखले जातात.

बीआरएलएमएस सोबतच्या चर्चेनुसारप्रिमियर इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेडआपला दाखल करण्यापूर्वी ३० कोटी रु. पर्यंतच्या पूर्व आयपीओचा विचार करत आहे. जर तो अंमलात आला तर त्या द्वारे उभारलेली रक्कम फ्रेश इश्यूमधून कमी केली जाईल.

कंपनी आपले निव्वळ उत्पन्न पुढीलप्रमाणे वापरण्याचे नियोजनकरत आहे:

महाराष्ट्रातील रायगड जिल्हा, खालापूर तालुका, होनाड गाव येथे नवीन वायर उत्पादन सुविधा केंद्र उभारण्यासाठी लागणाऱ्या भांडवली खर्चासाठी वित्तपुरवठा करण्याकरता आणि पालघर जिल्हा, वाडा, मौजे अब्जे (वैतरणा नगर) येथे गट नं. ३३ आणि ३९ वर असलेल्या विद्यमान वाडा युनिटमधील उत्पादन क्षमतेच्या विस्तारासाठी आवश्यक भांडवली खर्चासाठीवित्तपुरवठा रण्याकरता, काही विद्यमान उत्पादनांच्या उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी, तसेच खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरणार आहे.

प्रिमियर इंडस्ट्रियल कॉर्पोरेशन लिमिटेडही वेल्डिंग कंझ्युमेबल्स उद्योगातपावडर्सतसेचवायर्सया दोन्ही श्रेणींमध्ये कार्य करणाऱ्या मोजक्या कंपन्यांपैकी एक आहे.

# तितिक्षा श्रीवास्तवचे जागृति एक नयी सुबह मध्ये गीताच्या भूमिकेत नाट्यमय पुनरागमन!

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबह ही मालिका आपल्या उत्कंठावर्धक आणि प्रेरणादायी कथानकामुळे सतत प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. आता मालिकेत एक मोठा ट्विस्ट येणार आहे जो प्रेक्षकांना आश्चर्यचकित करेल. अभिनेत्री तितिक्षा श्रीवास्तव उर्फगीता जागृतिची आई, जिला आतापर्यंत मृत समजले जात होते, ती पुन्हा मालिकेत परतणार आहे. तिचे हे पुनरागमन केवळ मालिकेला भावनिक उच्चांक देणार नाही तर तीव्र नाट्य आणि संघर्षाची पार्श्वभूमीही तयार करणार आहे.



आईला गमावल्याच्या वेदनेत आयुष्य घालवलेल्या जागृतिसाठी गीताचे पुनरागमन म्हणजे एक चमत्कारच आहे. आनंदाने भारावून गेलेली जागृति आता आई तिच्यासोबत असल्याने एक नवी ताकद अनुभवेल. गीता ठरवून आली आहे की ती आपल्या मुलीला साथ देईल आणि तिच्या सर्वात मोठ्या आव्हानाला कलिकांतला सामोरे जाण्यास आणि पराभूत करण्यास मदत करेल. पण तिच्या परतीसोबत एक भावनिक संघर्षही निर्माण होईल. गीताला नेहमीच आकाश हा जागृतिसाठी योग्य जोडीदार आहे असे वाटत आले आहे. त्यामुळे तिच्या मुलीचे सूरजसोबतचे लग्न स्वीकारणे तिच्यासाठी अजिबात सोपे ठरणार नाही. जरी तितिक्षा या मालिकेत परत आल्याने आनंदी असल्या तरी खरी उत्सुकता प्रेक्षकांसाठी आता पुढे आहे. गीताच्या एन्ट्रीमुळे कलिकांत आणि ठाकूर कुटुंबांची पायाभरणी हादरून जाणार आहे. तिच्यासोबत अनपेक्षित वळणे, भावनिक संघर्ष आणि शक्तींची उलथापालथ होऊन एक नवीन अध्याय सुरू होणार आहे. प्रेक्षकांना तिच्या उपस्थितीमुळे कथानक कसे बदलते आणि पुढील भागांमध्ये हाय-व्होल्टेज नाट्याला कशी सुरुवात होते हे पाहायला मिळेल.

अधिक जाणून घेण्यासाठी पाहत रहा जागृति एक नयी सुबह दररोज रात्री ११ वाजता फक्त झी टीव्हीवर!

# कलाकारांनी त्यांच्या मूळगावामधील दसरा साजरीकरणाला उजाळा दिला!



■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
दुष्टावर सुष्टाच्या विजयाचे प्रतीक असलेला दसरा सण संपूर्ण भारतात विविध प्रकारे जल्लोषात साजरा केला जातो, जेथे रामलीला, सामुदायिक कार्यक्रम, रावणाच्या पुतळ्याचे दहन आणि उत्साहपूर्ण विधींचे आयोजन केले जाते. एण्ड टीव्ही कलाकारांसाठी हा सण त्यांच्या मूळगावांमधील परंपरांबाबत देखील आहे, ज्या आजही त्यांना प्रेरित करत आहेत. हे कलाकार आहेत पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये जीतूची भूमिका साकारताना पाहायला मिळणारे पारस अरोरा म्हणाले, ''मी बरेलीमध्ये जल्लोषात व एकत्र दसरा सण साजरा करायचो. संपूर्ण शहर मोठ्या मैदानामध्ये गोळा व्हायचे, जेथे रामलीलामधील कलाकार दिवसभर परफॉर्मन्स सादर करायचे, ज्यानंतर मुख्य कार्यक्रमाकडे जायचो. रावणाच्या पुतळ्याचे दहन, आकाशामध्ये फटाक्यांची आतिषबाजी पाहण्याचा क्षण उल्लेखनीय असायचा. दहन, आकाशामध्ये फटाक्यांची आतिषबाजी पाहण्याचा क्षण उल्लेखनीय असायचा. बालपणी, आम्ही उरलेले फटाके गोळा करायचो आणि घरामध्ये तेच दृश्य पुन्हा तयार करायचो. माझे कुटुंबिय मला स्थानिक राम मंदिरामध्ये घेऊन जायचे, जेथे आम्ही आशीर्वाद घ्यायचो आणि माझी आई नेहमी बुंदीचे लाडू व समोसा असे उत्सवी मिष्टान्ने तयार करायची.''

पहा तुमच्या आवडत्या मालिका दर सोमवार ते शुक्रवार, मालिका 'हप्पू की उलटन पलटन' रात्री १० वाजता, 'भाबीजी घर पर है' रात्री १०.३० वाजता आणि 'घरवाली पेडवाली' लवकरच फक्त एण्ड टीव्हीवर!

# आपला ऐतिहासिक निकाल स्वाती चौहान यांनी आणला मोठ्या पडद्यावर

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
मुंबई: माजी प्रिन्सिपल जज स्वाती चौहान आता फिल्ममेकरच्या भूमिकेत पदार्पण करत आहेत. त्यांच्या स्वतःच्या न्यायालयातील एका खटल्यावर आणि त्यावर दिलेल्या निर्णयावर आधारित सायरा खान केस हा प्रभावी चित्रपट त्यांनी तयार केला आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक आणि लेखक करन रझदान ( दिलवाले, दिलजले, दिवाने, कयामत, दुश्मनी, त्रिमूर्ती यांसारख्या चित्रपटांचे लेखक) यांच्यासोबत त्यांनी हा चित्रपट सहलेखन व सहदिग्दर्शन केला आहे. ट्रेलर प्रदर्शित झाला असून, हा चित्रपट १० ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. यात रजनीश दुग्गल, पूनम दुबे, करन रझदान, आराधना शर्मा, राजीव वर्मा आणि मुकेश त्यागी प्रमुख भूमिकेत आहेत.



खऱ्या खटल्यावर आधारित असलेला सायरा खान केस एका मुस्लिम स्त्रीची कहाणी सांगतोजिला तिच्या पतीने एकतर्फी ट्रिपल तलाक देऊन मुलांपासून वेगळं केलं आणि तरीही त्या पतीने चार विवाह टिकवले. या कथेत वैयक्तिक धार्मिक कायदा आणि भारताच्या धर्मनिरपेक्ष कायद्यांमधील संघर्षाची तीव्रता दाखवली आहेज्याबाबत चौहान यांनी स्वतः ऐतिहासिक निर्णय दिला होता.

प्रणालीतील काही पूर्वग्रहांमुळे मला विशेषाधिकार आणि तत्त्वांमध्ये निवड करावी लागली. मी तत्त्वांना प्राधान्य दिलं आणि न्यायव्यवस्थेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, चौहान म्हणाल्या. पण माझी न्यायासाठीची बांधिलकी कधीच कमी झाली नाही. माझं नवं न्यायालय म्हणजे सिनेमा झाला. न्यायव्यवस्थेतून स्वेच्छा निवृत्तीनंतर त्यांनी फिल्ममेकिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण केला आणि अशा वास्तविक कथांना लोकांसमोर आणण्याचं ध्येय ठेवलं.

# ऑग्मंट एंटरप्रायझेस लिमिटेडने सेबीकडे दाखल केला ८०० कोटींच्या आयपीओसाठी डीआरएचपी

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
ऑग्मंट एंटरप्रायझेस लिमिटेड ही सोने व चांदी या क्षेत्रांतील एकात्मिक प्लॅटफॉर्म कंपनी आहे. ती इतर व्यवसायांना व ग्राहकांना सेवा पुरविते. ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, ती देशातील २४ राज्यांत कार्यरत आहे. कंपनीने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या नियामक संस्थेकडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे.

AUGMONT

या आयपीओमध्ये प्रत्येकी ५ रुपयांच्या दर्शनी मूल्याचे, ६२० कोटी रुपयांचे नवे इक्विटी शेअर (फ्रेश इश्यू) आणि १८० कोटींचे प्रवर्तकांकडील इक्विटी शेअर (ऑफर फॉर सेल ओएफएस) यांच्या विक्रीचा प्रस्ताव आहे. एकूण आयपीओचा आकार ८०० कोटी रुपये इतका आहे. ओएफएसमध्ये प्रवर्तक विक्रीदार शेअरधारकांचा सहभाग असून, नमिता केतन कोठारी, विवेक पृथ्वीराज कोठारी आणि डिंपल मुकेश कोठारी यांच्याकडून प्रत्येकी ६० कोटी रुपयांचे शेअर विक्रीस ठेवले जाणार आहेत.

या आयपीओमधून मिळणाऱ्या निव्वळ रकमेपैकी अंदाजे ४६५ कोटी रुपये भविष्यातील खेळत्या भांडवलाच्या गरजांसाठी, म्हणजेच कच्च्या मालाची खरेदी आणि मालाच्या साठ्याच्या देखभालीसाठी, तसेच खरेदीसाठी आवश्यक आगाऊ मार्जिन निधी भरण्यासाठी वापरले जाणार आहेत. उर्वरित निधी सर्वसाधारण कॉर्पोरेट कामांसाठी वापरला जाईल.

ऑग्मंट एंटरप्रायझेस ही कंपनी सुवर्ण व रौप्य मूल्यसाखळीतील विविध टप्प्यांत कार्यरत आहे. यामध्ये खरेदी व रिफाइनिंग, बुलियन ट्रेडिंग, डिजिटल सुवर्ण विक्री, दागिन्यांचे उत्पादन, आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्री तसेच सोन्याच्या आधारावर वित्तीय सेवा यांचा समावेश आहे. भारतात सोने-चांदीच्या खरेदीसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही माध्यमांत उपस्थिती असलेल्या मोजक्या कंपन्यांपैकी ऑग्मंट ही एक आहे.

ही कंपनी दोन प्रमुख व्यवसाय शाखांमध्ये कार्यरत आहे. या शाखांसाठी स्वतंत्र ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सचा वापर केला जातो. त्यांना भौतिक वितरण जाळ्याची जोड देण्यात आली आहे. पहिल्या शाखेत ऑग्मंट स्पॉट प्लॅटफॉर्मद्वारे एंटरप्राइज विक्री आणि आंतरराष्ट्रीय विक्री यांचा समावेश आहे, तर दुसऱ्या शाखेत ऑग्मंट गोल्ड फॉर ऑल प्लॅटफॉर्म आणि ऑफलाईन माध्यमांतून पुरवल्या जाणाऱ्या ग्राहक-केंद्रित सेवा येतात.

# आरएसएस ची १०० वर्ष म्हणजे: आपलेपणाचे शतक, भारताचा शाश्वत दिशादर्शक आणि शक्ती

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
नॅशनल युनिटी अँड सिक्युरिटी कौन्सिलच्या अध्यक्षा आणि नवजीवन हेल्थ सर्व्हिसेसच्या सीईओ डॉ. मोनिका बी. सूद यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांना भारतासाठी केलेल्या १०० वर्षांच्या अखंड सेवेसाठी आणि समर्पणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी संघाला आपलेपणाचे शतक, ओळखीचा दिशा-दर्शक आणि शक्तीचा स्रोत असे संबोधून राष्ट्राच्या स्वभाव, जिद्द आणि नियती घडविण्यातील त्याच्या महान भूमिकेचे कौतुक केले. २०व्या शतकात आरएसएसला ओळख जपण्याचे आव्हान होते, तर २१व्या शतकात नियती प्रक्षेपित करण्याचे. संघाने आपला आत्मा वर्गखोल्यांपासून मदत शिबिरांपर्यंत, स्टार्ट-अप्सपासून थिंक टँक्सपर्यंत नेला आहे.

# गायला सुरुवात केल्या-केल्याचमला भक्तीचा अनुभव आला : जावेद अली

■ मुंबई,दि. ०४ ऑक्टोबर:
सोनी सबवर गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय ही भव्य दिव्य कथा लवकरच सुरू होत आहे. ब्रह्मांडातील सर्वात शक्तिशाली आणि दिव्य कुटुंबाची कथा यात सांगितली आहे. प्रसिद्ध पार्श्वगायक जावेद अली याने या मालिकेचे गीत गाऊन मालिकेच्या भव्यतेत भर घातली आहे. त्याच्या गायकीमधून भक्ती, दिव्यत्व आणि भावनांची गहनता जाणवते, जो या मालिकेचाही आत्मा आहे.

एका दिलखुलास संभाषणात जावेद अलीने हे गीत गाण्याचा अनुभव कसा आध्यात्मिक समृद्धी देणारा आणि संस्मरणीय होता, हे सांगितले.

१. 'गणेश कार्तिकेय' ही सोनी सबवरील आगामी पौराणिक मालिका आहे. तुझ्या मते, तू गायलेले गीत मालिकेच्या विषयाला किती पूरक आहे?

हे गीत खरोखर या मालिकेचा कणा आहे. या गीतामुळे मालिकेचा भाव आणि ऊर्जा आधीपासूनच ध्यानात येते. हे गीत प्रेक्षकांच्या मनात या मालिकेविषयी उत्सुकता जागवेल आणि मालिका बघण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करेल. मला वाटते, हे गीत प्रेक्षकांना तत्काळ आवडेल.

२. या गीतामधून प्रेक्षकांना या मालिकेच्या विषयाबाबत काय संदेश मिळेल?

हे दमदार गीत प्रेक्षक आणि सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय या दिव्य कथेमधील सेतूचे काम करेल. याची भक्तिपूर्ण चाल प्रेक्षकांना आकर्षित करेल आणि त्यातील प्रेरक ऊर्जा प्रेक्षकांना कथानकाशी जोडेल. प्रेक्षकांमध्ये उत्सुकता जागवणारे हे गीत प्रेक्षकांच्या मनात श्रद्धेची भावना निर्माण करेल.




३. सोनी सबवरील 'गणेश कार्तिकेय' मालिकेसाठी तू हे गीत गायलेस तेव्हा तुला काही खास भावना अनुभवास आल्या का?

हे सुंदर गीत आदिल जी आणि प्रशांत जी य यांनी स्वरबद्ध केले आहे. अंशुमाली झा यांनी ते लिहिले आहे. मी जेव्हा हे गीत गाण्यास सुरुवात केली, तेव्हा माझ्या मनात भक्तीची लाट उसळली. याचे बोल आणि चाल यामधून एक विशिष्ट दिव्य भाव आणि ऊर्जा प्रकट होते. हा संपूर्ण अनुभव माझ्यासाठी खूप आध्यात्मिक होता.

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत ही दिव्य कथा उलगडताना बघा, ६ ऑक्टोबरपासून दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता सोनी सब वाहिनीवर

# शब्दकोडे क्रमांक २२३२



**आडवे शब्द :-**
२) एक रत्न
४) दूरदृष्टी, शहाणपण
६) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेली देवी
९) पवित्र
११) शिव्याशाप
१३) भविष्य पाहण्याची एक विद्या
१४) पेरणी
१५) शंभर
१७) मनाचा ओढा
१८) महाराष्ट्राची राजभाषा
२०) उंट हाकणारा
२२) अभिप्राय
२३) पंख
२४) केस
२५) छोटी बैलगाडी
२६) चूक च्या विरुद्ध, सह
२८) कुजके पाणी
३१) शासन चालविणारा गट
३३) कणीदार
३६) जमिनीवरील कर
३८) कारस्थान
३९) अथवा, किंवा
४०) गोमाता
४१) हत्ती
४३) चलाख, हुशार
४५) स्वप्न (हिं )
४८) नुकतेच सरलेले दिवस
५०) सरळ वासा
५१) घेरी, भोवळ
५२) फिकीर, काळजी
५४) राजाची पत्नी
५५) विजयादशमी
५७) कौरव-पांडवांची कथा
५९) चालू दिवस
६२) पर्ण
६३) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
६७) लोटी
६९) स्वस्तच्या विरुद्ध
७०) एक धान्य
७१) गुणाकार
७२) कमी पणा
७४) पाकळी, सैन्याचा विभाग
६५) वाईट
७६) मध्यस्थ
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) गाढव

**उभे शब्द :-**
१) शंकराचे एक नाव,
२) फायदेशीर
३) एक ज्वालाग्रही पदार्थ
४) बैलाचा सण
५) सुंदर तरुणी
६) भराव
७) डावा
८) शनीचे रत्न
९) एक चतुर्थांश
१०) रवाळ
१२) सूर्य
१४) सोटा, काठी
१६) अगदी त्याप्रमाणेच
१९) उघड उघड, बिनदिक्कतपणे
२१) उपयोग
२२) राज्ञी
२३) परकीय, दुसरा
२४) पळसाचा डिंक
२७) भरभराट
२८) तोटी,
२९) मेहनत
३०) बटवा
३२) रड्या मनुष्य
३४) बटवडा
३५) वेडा
३७) रात्रीचा पाऊस
४२) जपजाप्य
४४) अस्वल
४६) रागी, नागली
४७) कळलाव्या मुनी
४८) थरथरणारा आवाज
४९) लक्ष्मीचे एक नाव
५३) दशक
५४) राजवाडा
५६) युद्ध
५७) हात आणि पंजा यांना जोडणारा अवयव
५८) हमाल
६०) पाणी
६१) सध्या
६४) दुनिया
६५) धाक, वचक
६६) माझा
६८) त्वरित
६९) हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
७१) अधिकाराचे स्थान
७३) बोटावरचे कडक आवरण

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# जगाला गांधीवादी तत्त्वज्ञानाची गरज आहे : संदीप बर्वे

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ४ :




गांधी जयंतीनिमित्त रामटेक, येथील श्री नरेंद्र तिडके महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता निर्धारित कक्ष, राष्ट्रीय योजना व राज्यशास्त्र विभागाचे संयुक्त विद्यमाने दि.४ ऑक्टोबर ला रोज शनिवारी 'गांधीजींचे विचार व जीवनकार्य 'या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून संदीप बर्वे गांधीवादी विचारवंत, पुणे यांनी विशेष ऑनलाईन स्वरूपात उपस्थित राहून मार्गदर्शनपर भाषणात गांधीवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्याशिवाय जगातील मानवतावादी समाजाला खऱ्या अर्थाने सुख शांती लाभू शकत नाही असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच गांधी समजून घ्यायचा असेल, राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे ते म्हणाले. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.मनोज तेलरांधे यांनी याअभिनव उपक्रमाला शुभेच्छा देत,गांधीजींच्या विचारांमध्ये अहिंसा सत्य आणि सामाजिक समतेचे मूल्य अंतर्भूत आहेत.

आजच्या स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त युगात हे मूल्य अधिक महत्त्वाची ठरतात. असे ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा पाहुण्यांचा परिचय सिनेट सदस्य डॉ.श्रीकांत भोवते यांनी करून दिला,तर आभार प्रा.संतोष जाधव यांनी मानले.

यप्रसंगी डॉ. दिलीपकुमार जेना, डॉ.अमरीश ठाकरे, प्रा. सुनील कठाने, डॉ.स्वप्निल मनघे, डॉ. विवेक साहू व प्रा. आकाश मोहबिया आदींच्या सहभागाने कार्यक्रम प्रेरणादायी ठरले तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या ऑनलाइन सेमिनारला उपस्थिती दर्शविली.

## श्रीकृष्ण हायस्कूलच्या दोन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ४ :



श्रीकृष्ण हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,कान्होलीबारा येथील सेवानिवृत्त प्राचार्य विनोद नवघरे व वरिष्ठ लिपीक अजय डहाके यांचा शालेय परिसरात सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक सुनिल बुंडे होते.तर शिक्षक परिषदेचे नेते सुधीर वारकर, विनोद ठाकरे, श्रीप्रकाश चव्हान, विनायक इंगळे गुरुजी, केंद्रप्रमुख एकनाथ ढोरे, प्रा.अशोक कुनघटकर, माजी प्राचार्य अशोक कुकडकर, निर्मंत्रित सदस्य विनोद मोरवाल, कान्होलीबारा सरपंचा पल्लवी कुकडकर, सेवानिवृत्त प्राचार्य विनोद नवघरे व सेवानिवृत्त लिपीक अजय डहाके उपस्थित होते.सर्वप्रथम सेवानिवृत्त प्राचार्य नवघरे व पत्नी कविता नवघरे तसेच सेवानिवृत्त लिपीक अजय डहाके व पत्नी रत्नमाला डहाके यांचा उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व साडीचोळी देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. माजी शिक्षिका माया लोखंडे यांनी सुमधुर आवाजात एक भावगीत सादर केले. सत्कारमूर्ती विनोद नवघरे व अजय डहाके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पर्यवेक्षक सुनिल बुंडे यांनी अध्यक्षीय भाषण केले.तसेच कविता नवघरे व रत्नमाला डहाके यांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.प्रास्तविक बापू शिक्षण संस्थेचे निर्मंत्रित सदस्य विनोद मोरवाल यांनी तर संचालन दिनेश बावने व आभार प्रशांत कुनघटकर यांनी मानले.

# काटोल येथे ओबीसीची बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ४ :




ओबीसी प्रवर्गातील कुणबी जातीचे सरसकट दाखले मिळावेत यासाठी ओबीसी आरक्षणात मराठा समाजाची घुसखोरी सुरू आहे. यासाठी फडणवीस सरकारने मनोज जरांगेच्या हिंसक आंदोलनाला बळी पडून काढलेला जीआर रद्दबातल करण्यात यावा. मराठा जातीतील कुणबी दाखले देऊ नये. यासाठी नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 10 ऑक्टोंबर रोजी महामोर्चा काढण्यात येणार असून त्या दरम्यान काटोल येथे ओबीसी बांधवाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत सर्व ओबीसी बांधवांनी एकजुटीचा नारा दिला. त्याचप्रमाणे काटोल तालुक्यात ओबीसी मोर्चाची बांधणी करण्याकरिता गावागावात सभा आयोजित करण्यात येत आहे.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थित किशोर कन्हेरे, शेखर सावरबांधे, सुरेश गुडधे, राजेश काकडे, डॉ. अंजलीताई साळवे, एकनाथ काळमेंघ, सुखदेव वंजारी, शाम चौधरी, संचालन संजय डांगोरे, प्रास्ताविक प्रशांत अर्डक,आभार डॉ.अनिल ठाकरे,अमोल रेवतकर, बाबाराव वाघमारे, रमेशजी मुळेकर, सिद्दराज आटोणे, दिलीप चोरघडे, प्रशांत पवार, रमेश कांबळे, विलास खंडाईत, स्वप्निल राऊत उपस्थित होते.

## वाडी नगरात विजयादशमी उत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :

दत्तवाडीतील गजानन सोसायटीच्या क्रीडा मैदानावर हिंदू समाजात पौरुष व शक्तीचे जागरण करणारा पावन असा वाडी नगरचा विजयादशमी उत्सव रविवार ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. सर्वप्रथम सायंकाळी ६ वाजता गजानन सोसायटीच्या मैदानातून स्वयंसेवकांचा पथसंचलन काढण्यात येणार आहे. विशेष म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यारंभीला १०० वर्षे पूर्ण होत असून या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन सुद्धा यावेळी करण्यात येईल. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. संजय दमके राहणार असुन प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारतीय परियोजनाप्रमुख - धर्मजागरण श्यामजी वसंतराव हरकरे मुख्य मार्गदर्शन करणार आहेत. सर्व नागरिकांनी सहपरिवार व वेळेआधी उपस्थित राहून या ऐतिहासिक उत्सवाला उपस्थिती राहावे अशी विनंती वाडी नगर संघचालक दिनेश मंत्री यांनी केली आहे.

# अनाथालयात मुलांना फळवाटप



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ४ :

माजी नगरपरिषद अध्यक्ष शाहजहान भाई सफाहत यांच्या वतीने, कामठी येथील सेठ कस्तुरचंद डागा बाल सदन (अनाथाश्रम) येथे माजी केंद्रीय मंत्री, राज्यसभा सदस्य आणि अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे सरचिटणीस मुकुल वासनिक साहेब यांचा वाढदिवस अनाथ मुलांमध्ये साजरा करण्यात आला.

ज्यामध्ये मुलांना चिप्स, बिस्किट पॅकेटसह फळांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर, शहर कॉंग्रेस समिती कार्यालयात केक कापून वासनिक साहेबांचा वाढदिवस देखील साजरा करण्यात आला.

यावेळी शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष रमेश दुबे, शहर कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा कार्यालयीन प्रभारी लक्ष्मण संगेवार, कामठी शहर सेवादल अध्यक्ष नितेश यादव, महिला कॉंग्रेस अध्यक्षा सौ.सुरैया बानो, माजी नगरसेवक अर्शद भाई, माजी नगरसेवक उबेद अफरोज, गोल्डन समाचारचे संपादक श्री एम.ए., तैफब खान, तैफब खान, जिल्हाध्यक्ष ताईफ खान आदी मान्यवर उपस्थित होते. कॉंग्रेसचे सरचिटणीस विशाल ताकभावरे, शहर कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस वासिक अन्सारी, सेवादल संयोजक अब्दुल सलाम भाई, विक्की सिंघानिया, महिला कॉंग्रेस उपाध्यक्ष शाहीन शेख, सरचिटणीस चेतना गोडबोले, आशा ताय गौरे, समसून बाजी, विभा मेश्राम, शबाना परवीन, असगरी बेगम आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुक्तीवीरचा नाट्यप्रयोग मंगळवारी

**जैन मुनी देशभूषण व कुलभूषण यांच्या जीवनावर आधारित**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था, श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ व जैन समाजाच्या सर्व सहयोगी संस्थांच्या सहकार्याने जैन मुनिश्री देशभूषण व कुलभूषण यांच्या जीवनावर आधारित मुक्तीवीर नाटकाचा प्रयोग मंगळवार दि. ७ ऑक्टोबरला सायंकाळी ७ वाजता सुरेश भट सभागृह, रेशिमबाग येथे सादर करण्यात येणार असल्याची माहिती अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांनी दिली आहे.

अनेक वर्षापूर्वी होऊन गेलेले तपस्वी जैन मुनिश्री कुलभूषण व देशभूषण यांच्या जीवनावर नाटक सादर करण्यात येणार आहे. प्रस्तुत नाटकाचे लेखक व गीतकार डॉ. रवींद्र भुसारी असून दिग्दर्शक व नेपथ्यकार प्रमोद भुसारी आहे. निर्मिती प्रमुख नितीन नखाते असून प्रमुख मार्गदर्शक चंद्रकांत वेखंडे आहे. तांत्रिक सहयोग उमेश फुलंबरकर यांचे आहे. निर्मिती सहाय्य श्रीकांत धोपाडे, श्रीकांत तुपकर, राजेंद्र नखाते, प्रकाश मारवडकर, मनोज बंड यांचे आहे. ध्वनी मुद्रण अनाहद रेकॉर्डिंग स्टुडिओ, संगीतकार राजेश तितरमारे, पार्श्व संगीत नितीन कायरकर, वेशभूषा डॉ. सुचित्रा भुसारी, रंगभूषा बाबा खिरेकर, नृत्य दिग्दर्शक चिन्मय देशकर, नाट्य श्रृंगार सचिन जैन, प्रकाश योजना बाबा पदम, ध्वनी व्यवस्था बंडू पदम, गायक कलावंत मोरेश्वर निस्ताने, डॉ. अंजुषा पांडवकर, श्रुती पांडवकर, मनीष मोहरील आहे. नाटकाचे प्रचार प्रसार प्रमुख रमेश उदेपूरकर, राजेश जैन आहे. विशेष सहाय्य गझल गहाणकरी, विभास गहाणकरी आणि चिन्मयी गोरे, विशेष मार्गदर्शन प्रा. उमेशचंद्र सरोदय यांचे लाभले आहे. पार्श्व स्वर नरेश गडेकर, वैदेही सोईतकर, प्रमोद भुसारी, सायली भुसारी थेरे, अभिलाष भुसारी, रौनक पळसापूरे, डॉ. रवींद्र भुसारी, अनिल इंदाने, प्रकाश वाकेकर, मनीष मोहरील, दिशा विटाळकर, अभिनय नखाते, आशय मांडवगडे यांचे आहे.

नाटक निःशुल्क असून प्रवेश पत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. प्रवेशपत्रासाठी अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्था, श्री सैतवाळ जैन संघटन मंडळ, श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन चैत्यालय बाहुबली नगर व श्री पार्श्वप्रभू दिगंबर जैन सैतवाळ मंदिराच्या पदाधिकाऱ्यांसोबत संपर्क करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ :



प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, लोकसेवा नगर, नागपूरची २७ वी वार्षिक सर्वसाधारण आमसभा रविवार २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता संस्थेचे अध्यक्ष विलासराव मुसळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

सभेच्या प्रारंभी माता सरस्वती, डॉ. पंजाबराव देशमुख व संस्थेचे प्रेरणास्थान माजी प्राचार्य स्व. मधुकरराव मुंदाफळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांचे स्वागत व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व पीएचडी प्राप्त कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा घेण्यात आला.आमसभेचे प्रास्ताविक संचालिका प्रा.प्रगती पाचपोहर यांनी तर मागील वार्षिक सभेचा अहवाल मानद सचिव शिक्षिका आरती भोरे यांनी सादर केला. वित्तीय अहवाल व सभेचे विषय उपाध्यक्ष प्रा. गजानन काकड यांनी सभेसमोर मांडले. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देऊन सभासदांचे समाधान करण्यात आले.

सेवानिवृत्त प्राचार्य अवधूत व प्रा. मनोहर सोमनाथे (नरखेड) यांनी मार्गदर्शन करून संस्थेच्या पारदर्शक कारभाराचे कौतुक केले. सभे दरम्यान गावंडे यांनी भागभांडवल दरमहा ५०० ऐवजी १ हजार रुपये करण्याचा प्रस्ताव मांडला. सर्व सभासदांनी तो एकमताने मंजूर केला. हा निर्णय एप्रिल २०२६ पासून लागू होणार असल्याचे उपाध्यक्ष प्रा. काकड यांनी जाहीर केले. सभेची सांगता अध्यक्ष विलासराव मुसळे यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. संचालन व आभार वंदना पोतदार (मुसळे) यांनी केले. आयोजनासाठी प्रा. अविनाश चौधरी, बंडूभाऊ मोहोड, शुभम खडसे, चेतन गोडे, राजू शेळके व भैयाजी कटरे यांनी सहकार्य केले.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सामुहिक बुध्द वंदना व मिठाईचे वितरण

■ महासागर प्रतिनिधी,
सावनेर, दि. ४ :

युवक जागृती मंडळ व सुधाकर बागडे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त सावनेर बसस्थानक जवळील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा येथे भंते शिलरक्षीत महाथेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक बुध्द वंदना पार पडली. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी भाजप उपाध्यक्ष रामराव मोवाडे होते तर यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे माजी सिव्हिल सर्जन डॉ. चंदकांत मानकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बाबाराव पाटील माजी नगराध्यक्ष अँड अरविंद लोधी युवक जागृती मंडळ अध्यक्ष सुधाकर बागडे भाजप शहराध्यक्ष मंदार मंगळे, पत्रकार मनोहर घोळसे प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी उपस्थित बांधवांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोबर रोजी बौद्ध अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

# श्रद्धा परबतेची क्रीडा क्षेत्रात घवघवीत कामगिरी



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ :

नागपूर जिल्हा अंतर्गत आयोजित नागपूर ग्रामीण तालुका शालेय क्रीडा स्पर्धेत डॉ. दिलीप देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय व प्रगती विद्यालयातील इयत्ता ११ वी वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी श्रद्धा मनोहर परबते हिने मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.

गोलफेक, धाव ४०० मीटर व ८०० मीटर या तीनही प्रकारांत तिने तालुका स्तरावर विजेतेपद मिळवत जिल्हा स्तरासाठी पात्रता मिळवली. तसेच इयत्ता १२ वी वाणिज्य शाखेतील मृणाल कुंभालकर याने १०० मीटर धाव स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल विद्यालयामार्फत त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या व्यवस्थापिका प्रियांका देशमुख, संस्था अध्यक्ष डॉ. दर्शना देशमुख, सचिव अतुल देशमुख, सदस्य डॉ. नाना पोजगे, मुख्याध्यापक राजेंद्र घुलक्षे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जयंता गोतमारे, प्रा. सतीश शरणागत, क्रीडा शिक्षक मंगेश ठाकरे, पंकज बांते, पंजाब आडे, अनिल पठाडे,जया धवड, नीलिमा वानखेडे, प्रियतमा नितनवरे, भारती गेडाम,ज्योत्स्ना झाडे, ज्योती पुरके, अमृता गायकवाड आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## आता फास्टटॅग नसल्यास दुप्पट टोल नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

फास्टटॅग नियमांमध्ये एक मोठा बदल करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबरपासून, जर तुमच्या वाहनात वैध फास्टटॅग नसेल किंवा त्याचा फास्टटॅग खराब झाला असेल, तर तुम्हाला दुप्पट टोल भरावा लागणार नाही. पूर्वी, फास्टटॅग नसलेल्या चारचाकी व जड वाहन चालकांना दुप्पट टोल भरावा लागत होता. फास्टटॅगसह, तुम्ही सहजपणे टोलच्या १.२५ पट भरू शकता. याव्यतिरिक्त, जर टोल प्लाझा मशीन खराब झाली असेल, तर वैध फास्टटॅग असलेल्या वाहनांना आता मोफत प्रवास करण्याची परवानगी दिली जाईल. जर तुमच्याकडे फास्टटॅग नसेल, तर दुप्पट रक्कम रोखीने देण्याऐवजी, तुम्हाला फास्टटॅग वापरून फक्त १.२५ पट टोल शुल्क भरावे लागेल. उदाहरणार्थ, जर टोल शुल्क १०० रुपये असेल, फास्टटॅगशिवाय, तुम्हाला २०० रुपये रोखीने द्यावे लागतील. तथापि, आता, कॅश कार्डने पैसे भरण्यासाठी १२५ रुपयेच खर्च येईल. यामुळे टोल प्लाझावर रोख व्यवहार आणखी कमी होतील.

# भिवापूर महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ४ :



भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन" भिवापूर महाविद्यालय भिवापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक समितीच्या माध्यमातून महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते व डॉ. सुनील शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर या दोन्ही महान नेत्यांबद्दल सांस्कृतिक समितीचे सचिव डॉ. सोमेश्वर वासेकर यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. सुनील शिंदे, डॉ. मंगेश कडू, डॉ. मोतीराज चव्हाण , डॉ. राहील कुरेशी, डॉ. राजेश बहुरूपी इत्यादी उपस्थित होते. संचालन व आभार डॉ. सोमेश्वर वासेकर यांनी केले.

# महिला कॉंग्रेसतर्फे निषेध



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

टीव्ही चॅनेलवर भाजप प्रवक्त्याने राहुल गांधी यांना दिलेल्या जीवे मारण्याच्या धमकीच्या निषेधार्थ अखिल भारतीय महिला कॉंग्रेस आणि कॉंग्रेस परिवारतर्फे शनिवार ४ रोजी संध्याकाळी ६:०० वाजता व्हरायटी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे निषेध करण्यात आला. या कार्यक्रमात घोषणा आणि निदर्शने, महात्मा गांधींची हत्या कशी झाली आणि आता राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, या संदर्भात "महात्मा गांधी आणि आजचा भारत" या विषयावर ६ मिनिटांचा माहितीपट पडद्यावर दाखवला.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भोजनदानाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

69 व्या धमचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून दीभाभूमीवर येणाऱ्या बौद्ध उपासक व उपासिकांना सम्राट अशोक नागरि सहकारी बँकेच्या वतीने वैशाली नगर चौक येथे भव्य भोजनदानाचे आयोजन ॲड. महेंद्र बनसोड यांच्या पुढाकाराने करण्यात आले. या भोजनदानाचा लाभ दक्षिण भारत व हिंदी राज्यातील बौध्द उपासकांनी मोठ्या संख्येनी घेतला.

या भोजन दान कार्यक्रमाचे उद्घाटन नागपूर जिल्हा सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र घाटे यांनी केले तर अध्यक्षता बनसोड मित्र परिवार संघटनेचे संघटक ॲड. महेंद्र बनसोड यांनी भूषविले होते. प्रारंभी शशी कुमार कांबळे यांनी उपासकांना संविधान प्रास्ताविकेचे वाचन करून शपथ दिली. यावेळी प्रा. योगेश मुनेश्वर, पत्रकार भागवत लांडगे, शांताराम रंगारी, लक्ष्मीताई मेश्राम, मोईउद्दीन काजी, भगवान वाहने, सी. एम. चव्हाण, लिलाधर गाडबैल, मधुकर ढोके, सैय्यद लियाकत अली, विजय रामटेके आदि, प्रामुख्याने उपस्थित होते. बँकेच्या वतीने शहरात प्रियदर्शी सम्राट अशोक यांचा पुणार्कृती पुतळा उभारण्या चा संकल्प यावेळी ॲड. महेद्र बनसोड यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन ॲड. उमेश वाघमारे यांनी केले तर आभार डॉ. संजय चौधरी यांनी केले.


## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

एम.जे.सी. क्र. ८३/२०२५ — प्रोसेस क्र. १२९५/२०२५
पे.ता. ३०-१०-२०२५ — दिनांक ०४/१०/२०२५

Applicant : 1) Pradeep S/o Shrichand Udasi, Aged 50 years, Occu. Private, R/o N-460. R.B. Street, Shri Darbar Sahib Kate Oli Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Aadhar No. 3937 3646 6906. 2) Smt. Palak w/o Vijay Ahuja, Aged 45 years, Occu. Housewife, R/o Sindhi Camp, Pakki Kholi, Behind Anand Puri Kutiya, Akola, Tah. Akola. Pin-444001. Aadhar No. 5451 17328154
V/S
Non Applicant : NIL

मयत Late Shrichand S/o Hiradas Udasi, मयत दि. १७/०६/२०१९ R/o. Sindhi Darbar Sahab, Kati Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. Late Smt. Kanchan W/o Shrichand Udasi, मयत दि. १०/०१/१९९५

सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Shrichand S/o Hiradas Udasi, मयत दि. १७/०६/२०१९ R/o. Sindhi Darbar Sahab, Kati Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shrichand S/o Hiradas Udasi, मयत दि. १७/०६/२०१९ R/o. Sindhi Darbar Sahab, Kati Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ३०/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

एम.जे.सी. क्र. ८२/२०२५ — प्रोसेस क्र. १२८९/२०२५
पे.ता. ३०-१०-२०२५ — दिनांक ०४/१०/२०२५

Applicant : 1) Pradeep S/o Shrichand Udasi, Aged 50 years, Occu. Private, R/o N-460. R.B. Street, Shri Darbar Sahib Kate Oli Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Aadhar No. 3937 3646 6906. 2) Smt. Palak w/o Vijay Ahuja, Aged 45 years, Occu. Housewife, R/o Sindhi Camp, Pakki Kholi, Behind Anand Puri Kutiya, Akola, Tah. Akola. Pin-444001. Aadhar No. 5451 17328154
V/S
Non Applicant : NIL

मयत Late Smt. Kanchan w/o Shrichand Udasi, मयत दि. १०/०१/१९९५ R/o. Raybahadur Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. Late Shri Shrichand S/o Haridas Udasi, मयत दि. १७/०८/२०१९

सदरहू अर्जदारांने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Kanchan w/o Shrichand Udasi, मयत दि. १०/०१/१९९५ R/o. Raybahadur Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. ३०/१०/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Smt. Kanchan w/o Shrichand Udasi, मयत दि. १०/०१/१९९५ R/o. Raybahadur Oli, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur - Pin-441002. यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

एम.जे.सी. क्र. ८५/२०२५ — प्रोसेस क्र. १२९३/२०२५
पे.ता. ०१-११-२०२५ — दिनांक ०४/१०/२०२५

Applicant : 1) Smt. Chandrabhaga W/o Gulabrao Nagtode, Aged - 78 Years, Occu. NIL R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Aadhar No. 4641 9614 5930
V/S Non Applicant : NIL

मयत Late Shri Avinash S/o Gulabrao Nagtode, मयत दि. ११/१२/२००६ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Late Smt. Renuka W/o Avinash Nagtode,, मयत दि. १८/०९/२००९ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur.

सदरहू अर्जदाराने वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत ate Shri Avinash S/o Gulabrao Nagtode, मयत दि. ११/१२/२००९ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Late Smt. Renuka W/o Avinash Nagtode,, मयत दि. १८/०९/२००९ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारी कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर कामठी यांनी दि. ०१/११/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजत ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार कळवाव्या आणि ह्या लेखवरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य त कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारास Late Shri Avinash S/o Gulabrao Nagtode, मयत दि. ११/१२/२००६ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. Late Smt. Renuka W/o Avinash Nagtode,, मयत दि. १८/०९/२००९ R/o Ward No.3, Village-Bhowari, Tah. Kamptee, Dist. Nagpur. यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी


RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कोरोनाने हिरावला आधार .. शासनाने सावरला संसार!

## रोजगार मेळाव्यात शेकडोंच्या 'संघर्षाची झाली फुले' : नियुक्ती पत्र हातात मिळताच भावनांना वाट मोकळी






■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :** 'कोरोना' या जागतिक महामारीने अनेकांचे संसार उध्वस्त केले. गोरगरीब, श्रीमंत सारेच या संकटात बळी पडले. यात शासकीय कर्मचाऱ्यांची संख्याही मोठी... घरातील कर्ता पुरुष कोरोनाचा बळी पडल्याने कुटुंबाचा आधार हिरावला. पतीची नोकरी मिळावी म्हणून धडपड सुरु झाली. या धडपडीला शासनाने सकारात्मक साथ देऊन संघर्षाला फलदायी स्वरूप दिले आणि आज महाराष्ट्र शासनाने असे अनेक संसार सावरण्याचे पथदर्शी कार्य केले. शासनाच्या संवेदनशील पुढाकारामुळे आज नागपूर शहर आणि जिल्ह्यातील शेकडो व्यक्तींना अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्र प्रदान झाले.

नागपूर महानगरपालिकेसह महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा परिषद, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागातील विविध पदांवर नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना मुख्यमंत्री महोदय यांच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमा अंतर्गत नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात अनेक उमेदवारांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली.

शनिवारी गट 'क' आणि गट 'ड' प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती पत्र प्रदान करण्याच्या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे नागपूर शहरातील रेशीमबाग येथील मनपाच्या कविवर्य सुरेश भट सभागृहात थेट प्रक्षेपण करण्यात आले. जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऑनलाईन माध्यमातून नागपुरातील कार्यक्रमाचा शुभारंभ केला. मंचावर खासदार श्याम कुमार बर्वे, आमदार प्रवीण दटके, आमदार डॉ. आशिष देशमुख, विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनायक महामुनी, आदिवासी विभागाच्या अपर आयुक्त श्रीमती आयुषी सिंह, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



जेव्हा माझे पती कोरोनामुळे वारले, तेव्हा माझे मुल केवळ चार महिन्यांचे होते. गृहिणी असल्यामुळे त्याला सांभाळणे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे खूप मोठे आव्हान होते. पदवीधर असूनही, मुलाच्या संगोपनामुळे मला नोकरीसाठी प्रयत्न करता आले नाहीत. पण आज नियुक्ती पत्र मिळत आहे. नोकरीमुळे मला माझ्या मुलाचे चांगले संगोपन करता येईल आणि त्याला एक चांगले भविष्य देता येईल. मी या संधीसाठी शासनाची आभारी आहे.

**कविता रेशवंत हजारे**

कार्यक्रमात नागपूर महानगरपालिकेत सरळ सेवा भरती प्रक्रियेने नियुक्त व अनुकंपा तत्त्वावर नियुक्त 168 उमेदवारांना व लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त 241 उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने व प्रशासकीय अडचणींना दूर सारत करण्यात आली आहे.

अनुकंपा तत्वावर नियुक्तीमध्ये येणारे अडथळे लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष देऊन प्रक्रियेत सुरळीतता आणली. कार्यक्रमात नियुक्तीपत्र मिळाल्यामुळे यंदाची दिवाळी आनंददायी जाणार असल्याचे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

जन्मतःच अंध असलेल्या ज्या चिमुकलीला तिच्या जन्मदात्यांनी जळगाव येथील रेल्वेस्थानकाच्या कचरा पेटीत टाकले. पोलिसांचे लक्ष गेल्यानंतर त्यांनी तिला ज्येष्ठ समाजसेवक शंकरबाबा पापळकर यांच्या वज्झर येथील आश्रमात आणले आणि तिच्या आयुष्याला आधार मिळून जगण्याला नवी उभारी मिळाली. विषम परिस्थितीला तोंड देत जिद्दीने अभ्यास करीत तिने एमपीएससी परीक्षेत यश मिळवले अशा माला शंकरराव पापळकर यांची महसूल सहायक पदावर नियुक्ती झाली आहे.

पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या सहकार्याने तिने हे यश प्राप्त केले आहे. दिव्यांगांच्या पुनर्वसनाच्या इतिहासात नवीन अध्याय या निमित्ताने जोडला गेला आहे. संधी आणि साधनांचा अभाव असल्याचे कारण देत अनेकजण आपल्या नशिबाला दोष देत असतात. अशांसाठी माला या २५ वर्षीय मुलीची कथा प्रेरणादायी आहे. माला ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) लिपिक गट क मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे.

त्या म्हणाल्या की मी पद्मश्री शंकरराव पापळकर यांची कन्या आहे. माझ्या वडिलांनी सामाजिक कार्यातून जो आदर्श उभा केला, तोच माझ्यासाठी प्रेरणास्रोत आहे. एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून महसूल सहायक म्हणून नियुक्ती मिळाली याचा मला खूप आनंद आहे. नियुक्तीपत्र मिळाल्याबाबत त्यांनी शासनाचे आभार व्यक्त केले.

मनपा मध्ये अनुकंपा तत्वावर कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती मिळालेल्या शहेला कौसर जौ. सैयद आदिल यांनी सांगितले की, माझी आई नागपूर महानगरपालिकेत कार्यरत होत्या. त्यांच्या जागेवर मला अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळाली आहे. मी आधी घरी लहान मुलांचे शिकवणी वर्ग घ्यायचे, मला संधी मिळाल्याबाबत मी शासनाचे आभार व्यक्त करीत आहे.आता मी प्रामाणिकपणे माझे कर्तव्य पार पाडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याशिवाय एमपीएससी मार्फत महसूल सहायक पदावर नियुक्ती मिळालेल्या अस्मिता रमेश गिरी यांनी सांगितले की, माझी नियुक्ती झाल्याने माज्या कुटुंबाच्या अनेक आर्थिक समस्या दूर होतील. ही केवळ नोकरी नसून, माज्या संघर्षाला मिळालेले फळ आहे. नागरिकांची सेवा करणे हेच माझे ध्येय असल्याचे सांगितले.

तब्बल 17 वर्ष भारतीय लष्करात कार्य करणारे पवन रुपराव तागडे यांनी सांगितले की मी सतरा वर्ष भारतीय लष्करात कार्य केले आहे निवृत्तीनंतर राज्यसेवे परीक्षेत उत्तीर्ण झालो आणि आज नियुक्ती पत्र मिळत आहेत. प्रशासकीय सेवेत येण्याचे माझे स्वप्न होते. ही नियुक्ती माझ्यासाठी खूप मोठी जबाबदारी घेऊन आली आहे.

वर्धा येथील पार्थ अनिल दुपल्लीवार यांची नागपूर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता - स्थापत्य पदावरती नियुक्ती झाली आहे. परीक्षेसाठी आपण चांगली तयारी केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. याशिवाय वर्धा येथील प्रज्वल अनंतराव वैद्य यांची देखील मनपात कनिष्ठ अभियंता - स्थापत्य या पदावर काम करताना मला नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरभी शंकरराव रोडगे यांची स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर नियुक्ती झाली आहे आपल्या क्षेत्रात उत्तम कार्य करण्या साठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार अनुकंपा तत्वावर अविनाश अजय हारकर यांची सफाई कर्मचारी या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांनी प्रशासनाचे आभार मानले. शुभांगी समरीत यांची जिल्हा परिषदेत अंगणवाडी परिवेक्षिका म्हणून नियुक्ती झाली आहे. तर अक्षय किशोर वानखेडे यांची विस्तार अधिकारी - सांख्यिकी पदावर नियुक्ती झाली आहे.

# एआय, ड्रोन तंत्रज्ञानामुळे बंदोबस्त यशस्वी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :** धम्मचक्र प्रवर्तनदिनाला दीक्षाभूमीवर देशभरातून लाखो अनुयायी येतात. इतक्या मोठ्याप्रमाणात गर्दीला नियंत्रण करणे व असामाजिक प्रवृत्तींवर लक्ष ठेवणे हे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत होते. त्यामुळे यावर्षी पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनात दीक्षाभूमीवर एआय आणि ड्रोनवर आधारित बंदोबस्त लावण्यात आला होता. तंत्रज्ञानाची योग्य सांगळ आणि अचूक नियोजन केल्याने बंदोबस्त यशस्वी झाला, अशी माहिती पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी दिली.

दीक्षाभूमीवर दरवर्षी देशभरातून लाखो अनुयायी एकत्र येतात, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी निर्माण होते. या ठिकाणी सार्वजनिक सुरक्षिततेचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण कोणत्याही असुरक्षित घटनेचा परिणाम मोठ्या संख्येवर लोकांवर होऊ शकतो,

ही बाब लक्षात घेता शहराचे पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी यांनी बंदोबस्ताचे नियोजन केले होते.

पोलीस आयुक्त सिंगल



गुरूवारी पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी दीक्षाभूमी येथे ड्रोन प्रणालीद्वारे पाळत व रिअल-टाइम फुटफॉल मॉनिटरिंग तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष परीक्षण केले. ते म्हणाले की, दीक्षाभूमी बंदोबस्तात सार्वजनिक सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक ह्यएआयह्य तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. सुमारे १०० सीसीटीव्ही कॅमेरे एआय सिस्टीमशी जोडले होते.

हे कॅमेरे सिंबा डेटाबेसशी संलग्न आहेत, त्यामुळे कोणताही गुन्हेगार येताच त्याची त्वरित ओळख पटविण्यात आली.

गर्दीचे प्रमाण सतत मोजले गेले आणि जास्त गर्दी असलेले ठिकाण ओळखून तेथे अतिरिक्त बंदोबस्तासाठी पोलिस तैनात करता आले. गर्दीच्या हालचालींचे निरीक्षण करून संशयास्पद हालचाली आढळल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यात आले.

कोणतेही विवादास्पद बॅनर किंवा पोस्टर्स दिसताच त्वरित अलर्ट पोलिसांना येत होते. तसेच संशयास्पद वस्तू ओळखून तत्काळ सूचना एआय कार्यप्रणालीद्वारे दिली जात असल्याने सर्व उपाययोजनांमुळे परिस्थितीची सतत जाणीव ठेवण्यास मदत झाली.

सार्वजनिक सुरक्षेसाठी जलद व माहिती-आधारित कारवाई करण्याची क्षमता वाढली. सुरक्षेच्या दृष्टीने राबवलेली ही अत्याधुनिक एआय तांत्रिक उपाययोजना दीक्षाभूमी बंदोबस्तादरम्यान शहर पोलिसांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत असून शहरातील सार्वजनिक सुरक्षिततेच्या कार्यक्षमतेत महत्त्वपूर्ण योगदान देत असल्यावेही पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल यांनी सांगितले.

## दागिन्यांवर डल्ला

■ **नागपूर, दि. ४ :** कुटुंब कार्यक्रमानिमित्त बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत ७१.५ ग्रॅम सोने आणि ३० ग्रॅम चांदीच्या दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना नवीन कामठी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी प्रिया सुशांत चवरे (३५) रा. मठी मंदिरजवळ, कामठीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

२९ सप्टेंरच्या दुपारी प्रिया घराला कुलूप लावून कुटुंबासह भंडारा येथे गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने बेडरूमच्या कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने असा एकूण २ लाख ९० हजार ६०० रुपये किंमतीचा माल चोरून नेला. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली.

# मौदा एनटीपीसीला पुरस्कार




■ **महासागर प्रतिनिधी रामटेक, दि. ४ :** एनटीपीसी मौदाला उत्कृष्ठ संचार व जनसंपर्क कायार्साठी पब्लीक रिलेशंस काऊसीलींग ऑफ इंडीयाचा पुरस्कार ग्लोबल काम्युनिकेशन कॉनक्लेव कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार अनेक श्रेणीत देण्यात आला. प्रोजेक्टने संचार प्रबंधनसाठी रजत पुरस्कार आणि सीएसआर फॉर चाईल्ड केअरसाठी रजत पुरस्कार प्राप्त केला. सोबत प्रोजेक्ट ला प्रेरणादायक चित्रपट व संस्कृती, कला व खेळात योगदानदिल्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हे सर्व पुरस्कार २७ सप्टेंबरला अधिकृत घोषित करण्यात आले या कान्क्लेवला संचार क्षेत्रातील विशिष्ट व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. ज्यांनी संचार नियोजन प्रभावीपणे राबविले सीएसआर कार्यात सहभाग सोबत संचार कार्यात उत्कृष्ठता सादर केली अशांना पुरस्कार देण्यात आले.

यात एनटीपीसी मौदा येथील सुश्री तान्या द्विवेदी यांनी कॉरपोरेटर कम्युनिकेशन ऐक्सीकेटीव्ह प्राप्त केला.

हा पुरस्कार त्यांनी एनटीपीसी मौदा येथे संचार कार्यात पारदर्शकता आणणे, सामाजिक कार्यात उत्तरदायीत्व सोबत सांस्कृतिक व प्रेरणादायाक कायार्ला प्रोत्साहित करणे व त्यासाठी कटीबध्द राहणे यासाठी रेखांकित करण्यासाठी देण्यात आला.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त महाजनवाडीत समाजप्रबोधन




■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ४ :.** हिंगणा- वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत महाजनवाडी बस स्टॉप परिसरातील साहिल फोटो स्टुडिओ समोरील मैदानात समाजप्रबोधनाने धम्मचक्र प्रवर्तनदिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संविधान अभ्यासक तलाठी विनोद खोब्रागडे होते. तर महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार गायक संविधान शेंडे, सुप्रसिद्ध गायिका निशा धोंगडे,सामाजिक कार्यकर्ते , केशव डोंगरे, तेजराव मुन, सुरेश मानवटकर रमेश कनेरे, महानंदा पाटील, बालु मोरे, मुन्नाभाऊ दहाट,ज्येष्ठ पत्रकार विनायक इंगळे गुरुजी व गजानन ढाकुलकर उपस्थित होते.

प्रारंभी महामानवांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलीत करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संविधान अभ्यासक विनोद खोब्रागडे यांनी दीक्षाभूमी ,अंबाझरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व भिमा कोरेगांव या जागा अजुनही पुर्णपणे समाजाला मिळाल्या नाहीत. तसेच महाबोधी महाविहाराचा ताबा सुद्धा इतरांच्या हातात आहे.आणि या सर्व समस्यांना वाचा फोडायची असेल तर समाजबांधवांनी एका झेंड्याखाली एकसंघ होणे काळाची गरज आहे.असे अभ्यासपुर्ण मनोगत तलाठी विनोद खोब्रागडे यांनी व्यक्त केले.

प्रबोधनकार संविधान शेंडे व गायिका निशा ताई धोंगडे यांनी प्रबोधनासह गितांच्या माध्यमातून उपस्थीतांचे प्रबोधन केले. संचालन तृषा मेश्राम यांनी केले. प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते व सैनिक केशव डोंगरे यांनी केले तर विनायक इंगळे गुरुजी यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक देवेंद्र डोंगरे व मंगेश मेश्राम होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल कांबळे, सोनु मेश्राम, आशिष वाकडे, सुशिल खडसे , अनिल नगराळे यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी, समता सैनिक दलाच्या सैनिकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी भोजनदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लूट प्रकरणात ४ वर्षांचा सश्रम कारावास

■ **महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. ४ :** अतिरिक्त सत्र व जिल्हा न्यायाधीश एन. एच.जाधव यांच्या न्यायालयाने धंतोली ठाण्यांतर्गत १० लाखांची लूट प्रकरणातील आरोपी राहुल राजू कळमळकर (३०) रा. खरबी याला दोषी ठरवून ४ वर्षे सश्रम कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

त्याचे दोन साथीदार दीपक राजकुमार परतेकी आणि कृष्णा महादेव बिंजाडे यांची पुराव्या अभावी निर्दोष सुटका केली. तसेच फरार आरोपी कुणाल लक्ष्मण उरांडे आणि निरंजन यांना सीआरपीसी २२७ व इतर कलमान्वये नोंद गुन्ह्यातून मुक्त केले.

फिर्यादी जयंत मधुकर खोडे (४५) रा. शास्त्रीनगर यांनी ९ सप्टेंबर २०१८ च्या रात्री ८.२० वाजताच्या सुमारास त्यांच्या शोरूममधील कर्मचारी दुर्गेश याला १०,०८,८२६ रुपयांची रोकड घरी पोहोचविण्यासाठी दिली होती. दुर्गेश दुचाकीने दुसऱ्या एका सहकाऱ्यासोबत रक्कम घेऊन जात होता. धंतोली परिसरात रामकृष्ण उद्यानाजवळ राहुलने त्यांना अडवले. त्याच्यासोबत इतर ४ जणही होते.

राहुल हा पूर्वी खोडे यांच्या शोरूममध्येच काम करीत होता. त्यामुळे दुर्गेश त्याला ओळखत होता. त्यामुळे राहुलने आवाज दिल्याने दुर्गेश थांबला. त्याच दरम्यान राहुल व त्याच्या साथीदारांनी दुर्गेश व त्याच्या सहकाऱ्याला मारहाण करून रोकड लुटली आणि फरार झाले. पोलिसांनी १८ मेच्या रात्री सर्व आरोपींना अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक वडतकर यांनी तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले. सरकारची बाजू ॲड. झिकार, तर बचाव पक्षाची बाजू ॲड. ठाकूर यांनी मांडली. न्या. जाधव यांनी राहुलला दोषी ठरवून वरील शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून पोहवा सुषमा बेले आणि अचल हरगुळे यांनी काम सांभाळले.

# शिक्षकांसाठीचा टीईटीचा निर्णय शासनाने मागे घ्या



## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची आग्रही मागणी

■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ४ :** शिक्षण राज्यमंत्री महाराष्ट्र पंकज भोयर यांनी टीईटी प्रश्ना संदर्भात व शिक्षण क्षेत्रातील इतर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सर्व संघटनांची सभा नागपूर येथे घेतली. सभेमध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष अरविंद देशमुख व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या वतीने महेंद्र सालंकार सहभागी झाले होते.

संघटनेची बाजू मांडताना अरविंद देशमुख यांनी टीईटी प्रश्नासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, त्याचप्रमाणे या प्रश्नावरील संभ्रम दूर करण्यासाठी शासनाने तात्काळ प्रयत्न करावा अशी मागणी केली.

सोबतच सर्व शिक्षा अभियान व शिक्षण विभागातील इतर कंत्राटी कर्मचारी जे २५ वर्षापासून कंत्राटी पद्धतीवर आहे त्या कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन द्यावे, त्यांना नियमित सेवेत सामावून घ्यावे अनुकंपा तत्त्वावर नियुक्त शिक्षकांना टीईटी मधून सूट द्यावी, संच मान्यते संदर्भातील घातक १५ मार्च २०२५ चा घातक शासन निर्णय तात्काळ रद्द करावा या व शिक्षक हिताच्या इतर मागण्या या सभेमध्ये मांडण्यात आल्या.

टीईटी संदर्भात लवकरच महाराष्ट्र शासन सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करेल असे आश्वासन शिक्षणमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

# पीकपद्धतीत बदल करून उत्पन्नवाढ साधा!







## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शेतकऱ्यांना आवाहन : बेला येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
बेला / नागपूर, दि. ४ :

पीक पॅटर्नमध्ये शेतकऱ्यांनी बदल करून बाजारपेठेच्या मागणी आणि उत्पादकता यामधील सुवर्णमध्य साधत उत्पन्नवाढ साधावी. साखर कारखाने पूर्ण क्षमतेने चालावेत यासाठी नागपूर, भंडारा आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऊस लागवडीस प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

मानस ॲग्रो इंडस्ट्रीज ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या वतीने बेला येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. गडकरी म्हणाले, शेतकरी इंधनदाता व्हावा यासाठी मी गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. भारताला संपन्न बनवायचे असेल, तर ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे. या परिवर्तनाचा केंद्रबिंदू शेतकरीच आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले, तर देशाचे अर्थकारण मजबूत होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून उत्पादन आणि मूल्यवृद्धी या दोन्ही दिशांनी पुढे जायला हवे.

ते पुढे म्हणाले, कारखाना सुरु करताना अनेक अडचणी आल्या. मात्र, शेतकऱ्यांच्या सहकार्याने आणि चिकाटीने आपण त्या सर्व अडचणींवर मात केली. आज कारखाना यशस्वीपणे चालत आहे आणि त्याचे श्रेय शेतकऱ्यांनाच जाते. भविष्यातही हाच सहकार कायम राहिला पाहिजे.

ऊसाबरोबरच इतर पिकांच्या संदर्भातही ॲग्रो व्हिजनच्या माध्यमातून आम्ही सातत्याने प्रशिक्षण, कार्यशाळा आणि जागरुकता कार्यक्रम राबवत आहोत. विदर्भातील शेतकऱ्यांनी या कृषी चळवळीत सहभागी होऊन आपला प्रदेश कृषी समृद्ध बनवावा, असे आवाहनही गडकरी यांनी केले.

याप्रसंगी गडकरी यांच्या हस्ते कारखान्याला सर्वाधिक ऊस पुरवणाऱ्या नामांकित शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शेतकरी मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मानस समूहाचे उपाध्यक्ष जयकुमार वर्मा होते. तर आमदार डॉ. आशिष देशमुख, माजी आमदार सुधीर पारवे, राजू पारवे, आनंदराव राऊत, अनिल मेंढे, नरेंद्र जीवतोडे, प्रबंध संचालक समय बनसोड, संचालक फकिरा खडसे, शेषराव भोयर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शेतकरी मेळावा कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयकुमार वर्मा यांनी केले, संचालन महाव्यवस्थापक जयंत ढगे यांनी केले तर आभार नरेश गेडेकर यांनी मानले.

## परप्रांतातून आलेल्या मुलाचा मेंदूज्वरमुळे मृत्यू?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

उपराजधानीतील विविध रुग्णालयांमध्ये नागपूरसह राज्याबाहेरील मेंदूज्वर संशयितांच्या मृत्यूचा क्रम सुरूच दिसत आहे. ताज्या घटनेत मेयो रुग्णालयात तेलंगणातील एका मेंदूज्वर संशयित मुलाचा मृत्यू झाला. हा मुलगा कुटुंबियांसह नागपुरात फिरायला आला होता.

आरोग्य विभागातील सूत्रांच्या माहितीनुसार, हा मुलगा कुटुंबीयांसह पर्यटनासाठी नागपुरात विमानाने आला होता. येथे त्याची प्रकृती बिघडली. त्याने उपचार घेतले. परंतु प्रकृती खालवल्याने त्याला मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे त्याचा ३० सप्टेंबरला मृत्यू झाला. त्याचे दोन्ही मूत्रपिंड निकामी झाल्याचे डॉक्टरांच्या प्राथमिक निरीक्षणात पुढे आले. प्रयोगशाळेतील तपासणीत त्याला मेंदूज्वर असल्याचेही पुढे आले. त्यामुळे मुलाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. मृत्यू अंकेक्षणानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, मेयो प्रशासनाकडून या मुलाच्या मृत्यूची माहिती नागपूर महापालिकेला कळवली गेली. त्याला नागपूर महापालिकेतील आरोग्य विभागातील अधिकाऱ्यानेही दुजोरा दिला. नागपुरातील विविध रुग्णालयात आजपर्यंत मेंदूज्वर संशयित म्हणून २० रुग्णांची नोंद झाली. त्यापैकी ९ रुग्णांचा मृत्यू झाला. त्यात नागपूर शहरातील दोन रुग्णांसह एकाचा समावेश आहे. एका रुग्णावर उपचार सुरू आहेत.

नागपूर जिल्ह्यातील विविध रुग्णालयांत अल्पावधीत सनाहयीत मेंदूज्वराचे (अँक्युट एन्सेफॅलायटीस सिंड्रोम) २० रुग्ण आढळले. त्यापैकी ९ मुलांच्या मृत्यूंच्या कारणांचे गूढ कायम आहे. पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू प्रयोगशाळेतील (एनआयव्ही) तीन सदस्यीय पथकाने शहरातील एक मृत्यू झालेल्या मानकापूर भागातील प्राणी, डासासह इतरही काही नमुने गोळा केले. त्याची चाचणी एनआयव्ही प्रयोगशाळेत केल्यावर मृत्यूचे कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या रुग्णांमुळे नागपुरात आकस्मिक पोहचलेल्या एनआयव्हीच्या पथकामध्ये शास्त्रज्ञ डॉ. विजय बोंद्रे, डॉ. अविनाश देवशतवार, डॉ. सुरेंद्र कुमार यांचा समावेश आहे. तर त्यांच्यासोबत राज्याच्या आरोग्य विभागाच्यावतीने राहुल जगताप, डॉ. प्रेमचंद कांबळे, डॉ. महेंद्र जगताप हेही नागपुरात आले होते.

सध्या थंडी वाजणे व तीव्र ताप येणारे रुग्ण वाढले असल्याचे निरीक्षण डॉक्टरांनी नोंदवले. त्यापैकी अनेक रुग्णांत तीव्र सर्दी, खोकलासह इतर लक्षणे आढळत आहे. या पद्धतीच्या रुग्णांना लक्षणानुसार प्रतिजैविक देण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला गेल्याचे सूत्रांनी सांगितले.

## धक्का लागल्याने तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

विसर्जनाच्या रॅलीत धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात दोन भावंडांनी अल्पवयीन साथीदारासोबत मिळून एका तरुणाची चाकूने भोसकून हत्या केली.

भररस्त्यात घडलेल्या या घटनेने परिसरात दहशत पसरली. देवेंद्र अजय चव्हाण (२६) रा. मिनीमातानगर असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी कळमना पोलिसांनी दुर्गेश लालजी चव्हाण (३६) रा. मिनीमातानगर, गल्ली क्र. ६ यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपी भावंडांना अटक केली तर अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले.

आदित्य नीतेश चाचेरकर (२१) आणि आकाश उर्फ टोचू नीतेश चाचरकर (२०) दोन्ही रा. मिनीमातानगर अशी आरोपींची नावे आहेत. न्यायालयाने दोघांनाही बुधवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

देवेंद्र हा मुळचा उत्तरप्रदेशातील दयालपूर येथील रहिवाशी होता. फिर्यादी दुर्गेश हे काच फिटिंगची कामे करतात. देवेंद्र हा गत ३ वर्षांपासून त्यांच्याकडे कामाला होता आणि त्यांच्याच घरी भाड्याने राहात होता. रात्री ९ वाजताच्या सुमारास सार्वजनिक दुर्गा मंडळाची विसर्जन रॅली निघणार होती. देवेंद्र आणि चव्हाण या दोघांनाही रॅलीत सहभागी व्हायचे होते. होम ॲन्ड द डिझायनर स्टुडिओसमोर उभे राहून रॅलीची प्रतीक्षा करीत होते. त्याच वेळी आरोपी चाचेरकर बंधू हे सुद्धा अल्पवयीन आरोपीसोबत रॅली बघण्यासाठी तेथे आले होते. दरम्यान रॅली परिसरात पोहोचली.

रॅली बघत असताना गर्दीमध्ये देवेंद्रचा आदित्यला धक्का लागला. यावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. आसपास उभ्या इतर लोकांनी त्यांच्यातील वाद सोडवला. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. मात्र देवेंद्र आणि दुर्गेश तेथेच उभे राहून रॅली फिरून परत येण्याची प्रतीक्षा करीत होते.

दरम्यान आरोपी पुन्हा तेथे आले. काही वेळापूर्वी झालेला वाद उकरून काढत देवेंद्र व दुर्गेशला शिविगाळ सुरू केली. त्यांनी विरोध केला असता मारहाण सुरू केली. आकाशने देवेंद्रला पकडून ठेवले, तर आदित्याने अल्पवयीन आरोपीकडे असलेला चाकू घेऊन सपासप वार करीत रक्ताच्या थारोळ्यात लोळवले आणि पसार झाले. या घटनेने परिसरात रॅली पाहण्यासाठी आलेल्यांमध्ये दहशत पसरली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

कळमना पोलिस घटनास्थळी पोहोचले. देवेंद्रला उपचारार्थ खासगी रुग्णालयात नेले असता मेयोला रेफर करण्यात आले. मेयोच्या डॉक्टरांनी तपासून देवेंद्रला मृत घोषित केले. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून आदित्य आणि आकाशला अटक केली, तर अल्पवयीनला ताब्यात घेतले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना ५ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## महिला डॉक्टरचा मेयोत विनयभंग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मेयो रुग्णालयाच्या न्यू रेजिडेन्ट गर्ल्स हॉस्टेलमध्ये एका महिला डॉक्टरचा विनयभंग करण्यात आल्याची घटना पुढे आली आहे. तहसील पोलिसांनी आरोपी उबेद बेग इशाक बेग (२८) रा. गांजाखेत याला अटक केली आहे.

पीडित २८ वर्षीय डॉक्टर रात्री जेवण केल्यानंतर मैत्रिणीसोबत वसतिगृह परिसरातील मैदानात फिरत होती. या दरम्यान उबेद दुचाकीवर बसून त्यांच्याकडे वाईट दृष्टीने पाहात होता. ही बाब लक्षात येताच पीडितेने त्याला फटकारत एकटक बघण्याचे कारण विचारले, मात्र त्याने काहीच उत्तर दिले नाही. त्यामुळे दोघीही आपआपल्या खोलीत निघून गेल्या.

काही वेळाने उबेद थेट पीडित डॉक्टरच्या खोलीत पोहोचला. त्याला पाहून पीडिता घाबरली आणि तिने मैत्रिणीला फोन केला. मैत्रिण तत्काळ पीडितेच्या खोलीत आली असता आरोपी तेथेच उभा होता. दोघींनीही आरडा-ओरड केली असता वसतिगृहातील इतर महिला डॉक्टरही गोळा झाल्या. घाबरलेल्या उबेदने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र महिला डॉक्टरांनी सुरक्षा रक्षकाच्या मदतीने त्याला पकडले. तहसील पोलिसांनी उबेदला अटक केली. चौकशीत तो फळ विक्रेता असून त्याचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नसल्याचे पुढे आले.

## उद्धवसेनेचा ११ रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :



अतिवृष्टीने मराठवाड्यातील शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. शेती, घरदार, जनावरे वाहून गेली असून शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर पडला आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी आणि आक्रोशाची जाणीव महायुती सरकारला करून देण्यासाठी ठाकरे गट आक्रमक झाला आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली ११ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर विराट हंबरडा मोर्चा काढण्यात येणार आहे.


मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकरी या मोर्चात सहभागी होणार आहेत. गुरुवारी दसरा मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी राज्यातील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटावर आवाज उठवत सरकारला धारेवर धरले होते.

मते विकत घ्यायला तुमच्याकडे पैसे आहेत, शेतकऱ्याला द्यायला पैसे नाहीत, अशी टीका करीत शेतकऱ्यांना तातडीने मदत आणि कर्जमुक्ती मिळावी, या मागणीसाठी मराठवाड्यात आंदोलन करेन, असा इशारा दिला होता.

त्याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेचे नेते आणि पदाधिकारी यांच्यासोबत बैठक घेऊन मराठवाड्यातील आंदोलनाची रणनीती ठरवली. या आंदोलनासाठी लाखो शिवसैनिक येतील, असा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे.

## दीक्षाभूमीवर पुस्तकांची रेकॉर्डब्रेक विक्री





**पाच कोटी रुपयांची उलाढाल**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

जीवनात यशस्वी व्हायचं असेल, तर वाचनाशिवाय पर्याय नाही, हा मूलमंत्रच त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. बाबासाहेबाबाच्या विचारांनी भारावलेल्या त्यांच्या अनुयायांना हा मंत्र आजही महत्त्वाचा वाटतो. म्हणूनच दीक्षाभूमीवर अनेक प्रकारचे जिन्नस विक्रीला असतांना सर्वाधिक मागणी पुस्तकांचीच असल्याचे दिसते.

दीक्षाभूमीवरील एका अंदाजानुसार धम्मचक्र प्रवर्तन दिन पर्वाच्या काळात पुस्तकांवर जवळपास ५ कोटी रुपयांची उलाढाल झाली. २ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दक्षिण भारतातील राज्य कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू यासह उत्तर भारतातील राज्यातील अनुयायी मोठ्या संख्येत आले.

दीक्षाभूमीवर देशभरातून येणाऱ्या अनुयायांची संख्या दरवर्षी वाढतच जात आहे. महाराष्ट्रवगळता देशातील इतर प्रदेशात अनुयायांना बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरांचे विचारधन असलेले साहित्य सहज मिळत नाही. त्यामुळे नागपूरची दीक्षाभूमी आणि मुंबईच्या चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांचा ओढा पुस्तकांकडे अधिक असतो.

दीक्षाभूमीवर आलो की, एखादेतरी पुस्तक घेऊन जावे, अशी येथे येणाऱ्या प्रत्येकाची मुख्य इच्छा असते. त्यामुळे पुस्तकांच्या कोणत्याही स्टॉलवर गेले, की लोकांची गर्दी पाहायला मिळते.

दीक्षाभूमी परिसर आणि सभोवतालच्या परिसरात पुस्तक विक्रेत्यांचे तीनशेच्या वर स्टॉल होते. भारताचे संविधान, बुद्ध आणि त्यांच्या धम्म या ग्रंथांना सर्वाधिक मागणी होती. याशिवाय बाबासाहेब लिखित मूळ ग्रंथाची मागणी देखील मोठ्या प्रमाणात होती. लहान मुलांना महापुरुषांची ओळख करून देण्यासाठी कॉमिक्स स्वरूपातही पुस्तक उपलब्ध होत्या. त्यांचीही विक्री झाल्याचे सांगण्यात आले.

## ट्रकच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ४ :

रस्ता ओलांडणाऱ्या बिबट्याला भरधाव ट्रकने धडक दिली. यात बिबटचा जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली. मृत्यू झालेला बिबट अंदाजे सात ते आठ वर्षांचा नर होता.



अमरावती ते चांदूर रेल्वे मार्गावरील वडाळीलगत राज्य राखीव पोलिस दल वसाहतीसमोरील रस्त्यावरून रात्री साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास एक बिबट रस्ता ओलांडत होता. याचवेळी या मार्गावरून भरधाव जाणाऱ्या ट्रकने बिबट्याला धडक दिली. यात बिबट्याचा जागीच मृत्यु झाला. या वेळी या मार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी घटनास्थळी थांबून पाहिले असता त्यांना बिबट मृत अवस्थेत आढळला.

घटनेची माहिती वनविभाग व फ्रेजरपुरा पोलिसांना दिली. पोलिस व वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वडाळी येथील वनविभागाच्या परिसरात नेला. दरम्यान, पोहरा जंगलात बिबट्याचा वावर असून, बिबट अनेकदा चांदूर रेल्वे मार्ग ओलांडत असतात. यापूर्वी देखील एका बिबट्याचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती.

## नागपूर पदवीधर मतदासंघासाठी
# सुधीर दिवे यांची मजबूत दावेदारी

■ नरेंद्र देशमुख, वर्धा, दि. ४ :



नागपूर विभाग पदवीधर मतदासंघाच्या पुढील वर्षाच्या सुरुवातीला होऊ घातलेल्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. या मतदारसंघातून २०२० च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी अनपेक्षित मुसंडी मारत भाजपचे उमेदवार संदीप जोशी यांचा पराभव केला होता. भाजपने यावेळी उमेदवार बदल करीत तगडा उमेदवार मैदानात उतरविला तर नाराजीचे धनी ठरत असलेले आमदार वंजारी यांना मागचा करिष्मा साध्य करणे अवघड ठरणार आहे.

भाजपचे यशस्वी निवडणूक रणनीतीकार, कुशल संघटक आणि सर्वपरिचित सुधीर दिवे हे या निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. अनेक वर्षे संघटनात्मक जबाबदाऱ्या, लोकसभा ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपचा झेंडा फडकविणारे सुधीर दिवे यांना वारंवार या ना त्या कारणाने पक्षाकडून उमेदवारीची संधी मिळालेली नाही.

विधायक, सकारात्मक दृष्टिकोन आणि नवकल्पनांची अंमलबजावणी यात त्यांना महारथ प्राप्त आहे. राजकीय आणि निवडणूक प्रक्रियेचा प्रदीर्घ अनुभव, त्यात मध्यवर्ती भूमिका वठविल्याने सर्व खाचखळगे, आव्हाने कशी पार करायची याची त्यांच्याजवळ हातोटी आहे.

पक्षाला गरज पडली तेव्हा सदैव धावून येणारे दिवे यांच्या क्षमतांचा वर्धा, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यात भाजपाच्या वर्तुळाने आणि निवडणूक प्रक्रियेतील सर्वांनी वेळोवेळी अनुभव घेतला आहे. भाजपने त्यांना उमेदवारी देण्यातून केवळ योग्य व्यक्तीची निवडच होणार नाही, तर दिवेंच्या योगदानाचा सन्मान आणि विजयाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊलही ठरेल.

दुसरीकडे, आमदार अभिजित वंजारी यांचा कार्यकाळ फारसा प्रभावी राहिलेलस नाही. ते एका ठराविक कंपूतच वावरत राहिले. ज्या लोकांनी त्यांच्या विजयात योगदान दिले होते, त्यांचा त्यांना विसर पडला. त्यांच्याशी संपर्कच राहिला नाही. निधीचे असमतोल वाटप आणि काही ठराविक भाग, कामे यांनाच दिलेले प्राधान्य त्यांच्याविषयी नाराजी वाढण्यास कारणीभूत ठरले आहे.

सहा जिल्हे मिळून तयार झालेल्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाला त्यांनी गेल्या सहा - पावणेसहा वर्षांत कितीदा भेटी दिल्या, ज्यांनी त्यांना निवडून दिले त्या पदवीधर मतदारांच्या किती समस्या, प्रश्न त्यांनी सोडविले, असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

मागील निवडणुकीत त्यांना कॉंग्रेस व्यतिरिक्त इतरही काही पक्ष, संघटना, संस्था आणि व्यक्तींनी मदत केली, त्यांची साधी भेट घेण्याचेही सौजन्य त्यांनी दाखविले नाही. आता निवडणूक जवळ येताच त्यांनी पुन्हा त्याच लोकांना साद घालणे सुरू केले आहे.

पदवीधर मतदारांच्या नोंदणीची मोहीम सुरू करण्यास कार्यालयेही उघडणे आरंभले आहे; मात्र मागील निवडणुकीत प्रचाराच्या एका टप्प्यानंतर विजय आपलाच असे गृहीत धरून संदीप जोशी जसे निर्धास्त झाले होते, तशी संधी भाजप यावेळी वंजारी यांना देऊ इच्छिणार नाही.

सुधीर दिवे यांच्या उत्कृष्ठ नियोजनात वर्धा जिल्ह्यातील अनेक लोकसभा, विधानसभा निवडणुका लढल्या गेल्या, त्यात त्यांनी आपली कमाल दाखविली. २०२४ ला त्यांच्याकडे भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात आली. दरम्यान, वर्ध्यातील गणित बिघडले आणि तत्कालिन खासदार रामदास तडस यांची हॅट्रिक हुकली. मग विधानसभा निवडणुकीत त्यांच्याकडे आर्वी मतदारसंघाचा कठीण पेपर सोपविण्यात आला.

भाजपने उमेदवारी नाकारल्याने तत्कालिन आमदार दादाराव केचे यांनी बंड पुकारले. हे बंड त्यांनी त्यावर समाधानकारक तोडगा काढत यशस्वीपणे थोपविले आणि सुमित वानखेडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर केला. इतक्या प्रतिभासंपन्न, अनुभवी आणि कार्यतत्पर नेत्याला यावेळी संधी मिळाली तर त्यांच्या परिश्रमाचे चिज होईल, अशी भावना भाजपाच्या वतुळात व्यक्त केली जात आहे. दिवे यांचा नागपूर, वर्धा जिल्ह्यासह पदवीधर मतदारसंघातील इतर जिल्ह्यांत संपर्कजाळे आहे, जिव्हाळ्याचे संबंध आहे. त्यास भाजपाच्या उमेदवारीची जोड मिळाल्यास सुधीर दिवे यांचा विजयरथ रोखणे अभिजित वंजारी आणि कॉंग्रेसला अशक्य होऊ शकते.

## इटलीतील अपघातात नागपूरचे दाम्पत्य ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

इटलीतील ग्रोसेटो येथे झालेल्या रस्ते अपघातात नागपुरातील दाम्पत्याचा मृत्यू झाला तर त्यांच्या मुलासह पाच जण जखमी झाले.

जावेद अख्तर (५७), नाझिरा अख्तर (४४) असे दगावलेल्या नागपुरातील दाम्पत्याचे नाव आहे. इटलीच्या ग्रोसेटो येथील ऑरेलिया राज्य रस्त्यावर उत्तरेकडे जाणाऱ्या लेनवर आशियाई पर्यटकांना घेऊन जाणारी व्हॅन आणि नऊ आसनी मिनीबसची धडक झाली. यात अख्तर दाम्पत्याचा मृत्यू तर त्यांच्या मुलांसह पाच जण जखमी झाले.

इटलीतील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते पीडितांच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आहेत. ग्रोसेटोजवळ झालेल्या अपघातात नागपूरमधील दोन भारतीय नागरिकांच्या दुःखद निधनाबद्दल दूतावासाकडून शोकही व्यक्त केला गेला. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले की, इटलीतील ग्रोसेटो येथे झालेल्या रस्ते अपघातात अख्तर दाम्पत्याचा मृत्यू झाला असून त्यांच्या मुलासह इतर काही जखमी असल्याचे रोमधील भारतीय दूतावासाकडून कळवले गेले. वृत्त मिळेपर्यंत तिथे रुग्णालयात प्रक्रिया सुरू होती.


### श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ,वणी

**सोनेतारण जाहीर लिलाव**

**श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था** मर्या,वणी **सोने तारण** कार्यालय खालील नमुद केलेले खात्यांचे **सोने तारण** कर्जदार यांना वारंवार मुदत संपलेचे पत्र रजिष्ट्र ए.डी.,मोबाईलवर मेसेज व्दारे/समक्ष भेट देऊन नोटीस दिली आहे. तरीही त्यांनी मुदतीत कर्ज परतफेड केलेली नाही अथवा खाते नुतणीकरण केले नाही. खालील थकबाकीदाराकडील थकबाकी वसुलीसाठी त्यांचे कर्जाचे तारणापोटी ठेवलेल्या दागिण्यांचा जाहीर लिलाव बुधवार **दि. १५/१०/२०२५** व गुरुवार , **दि. १६/१०/२०२५** रोजी खालील नमुद ठिकाणी शाखा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खरेदीदारांनी नमुद केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे. मात्र लिलावाचे पुर्वी थकीत कर्जदाराने कर्जफेड वा कर्ज नुतणीकरण केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे वेळी वाचुन दाखविण्यात येतील. लिलाव स्थगित ठेवणे व लिलाव मुदत वाढ देणे,रद्द करणे याबाबत सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवले आहेत.

| अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | अ. क्र. | खाते क्रमांक | कर्जदारांचे नाव | लिलावाची दिनांक व वेळ लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **शाखा –भद्रावती,चिमूर ,वरोरा ,चंद्रपूर** | | | | | | | | | |
| १ | ११०००६२३ | भूषण गजानन खडसे | २ | १२०००२७८ | कुंभारे अरविंद नामदेव | ३ | ८००००४२ | तापसे अविनाश गुलाबराव | शाखा - भद्रावती, एचपी पेट्रोलियम जवळ चंद्रपूर नागपूर रोड, भद्रावती, वेळ :१२.०० वा. वार – गुरुवार दि .१६-१०-२०२५ |
| ४ | ११०००६२४ | भूषण गजानन खडसे | ५ | ६०००२९९ | प्रणवकुमार दौलतराव उलमाले | ६ | ८००००६५ | तापसे अविनाश गुलाबराव | |
| ७ | ११०००३९४ | दिनेश रामभाऊ डडमल | ८ | ६०००२९१ | संजय झितरूजी गायकवाड | ९ | ८००००८७ | चिंचोलकर गीता संजय | |
| १० | ११०००५२९ | तन्वीर अब्दुल्ला शेख | ११ | ६०००१८१ | दिवाकर विलास मत्ते | १२ | ८००००८९ | कुकाडे विठ्ठल गुलाबराव | |
| १३ | ११०००५५५ | तन्वीर अब्दुल्ला शेख | १४ | ६०००२८५ | प्रकाश मनोहर कातोरे | १५ | | | |
| १६ | ११०००५३१ | विजय मधुकर घरत | १७ | ११०००४६५ | कमलेश राजेश शर्मा | | | | |
| **शाखा – गडचांदूर ,राजुरा** | | | | | | | | | |
| १ | ७०००५३७ | वैशाली साईनाथ बोंडे | २ | ९०००६१० | कलवाल राजेंद्र अशोक | ३ | ९०००६०३ | धुमणे प्रमोद एकनाथ | शाखा - राजुरा आसफाबाद रोड, पंचायत समिती जवळ, राजुरा वेळ :१२.०० वा.वार – गुरुवार दि .१६-१०-२०२५ |
| ४ | ७०००५३५ | अमर मधुकर वेट्टी | ५ | ९०००६०९ | निमकर संदिप गोपाळ | ६ | ९०००५८५ | असत उल्ला बेग आजीज बेग | |
| ७ | ७०००५२५ | संदिप वासुदेव मिटकर | ८ | ९०००४०५ | गौरकर कवडू जनार्दन | ९ | ९०००५२५ | जक्कुला संपत वीरैया | |
| १० | ९०००६१२ | जरिया चैताली रमण | | | | | | | |
| **शाखा – गडचिरोली ,मुल ,वडसा** | | | | | | | | | |
| १ | १९००००१५ | संतोष विनायक निवालकर | २ | १००००१५४ | राजेश हरिभाऊ तुपकर | ३ | १७००००५६ | बेहरे मेघराज पंढरी | शाखा - मुल पंचायत समिती जवळ, चंद्रपूर रोड, वेळ :१२.०० वा. वार – बुधवार दि .१५-१०-२०२५ |
| ४ | १००००१२९ | वाकुडकर प्रकाश मोरेश्वर | ५ | १००००१५० | वैभव अनिल बनकवार | ६ | १७००००५४ | छाया सीताराम नंदरधने | |
| ७ | १००००९८ | यादव वीरेंद्र रामदेव | ८ | १००००१५१ | वैभव अनिल बनकवार | | | | |

लिलावाच्या अटी शर्ती :-
१) लिलावात भाग घेणारास रु.५,०००/-रोख भरून भाग घ्यावा लागेल.
२) लिलाव मंजूर,नामंजूर किंवा स्थगित करणेचा अधिकार संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे.
३) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखविण्यात येतील.

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था मर्या,वणी

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उद्दिष्ट केवळ संघटनेपुरते मर्यादित नाही. समाजात नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये मजबूत करण्यासाठी, प्रत्येक व्यक्तीमध्ये शिस्त आणि समर्पण विकसित करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी संघ कार्य करतो. संघाचा दृष्टिकोन समावेशक आहे; तो कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा गटाच्या विरोधात नाही. समाजकार्याच्या अखंड साधनेची शताब्दी पार पडत असताना घेतलेला वेध.**



# अखंड साधनेची शताब्दी

नोंद

**आमदार अमित गोरखे**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजाला गटबाजीपासून मुक्त करण्यासाठी आणि विविधतेत एकता स्थापित करण्यासाठी कार्य करतो. संघाचा शंभर वर्षांचा प्रवास हा या समर्पणाचा आहे. संघाची स्थापना भारताला केंद्रस्थानी ठेवून करण्यात आली होती आणि राष्ट्राच्या जागतिक स्तरावरील उदयाला हातभार लावण्याचे संघाचे उद्दिष्ट आहे. संघाची प्रार्थना आणि 'भारत माता की जय' हे केवळ शब्द नाहीत, तर कृती आणि समर्पणाची प्रेरणा आहे. संघाची निर्मिती ही काळाच्या कसोटीवर उतरलेल्या संथ आणि सततच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. संघ 'हिंदू' हा शब्द वापरत असला, तरी त्याचे सार धर्मापुरते मर्यादित नाही. ते समावेशकता, मानवता आणि राष्ट्राप्रती जबाबदारीच्या भावनेला मूर्त रूप देते. संघाचे उद्दिष्ट विरोध करणे किंवा स्पर्धा करणे नाही, तर समाजाच्या प्रत्येक घटकाला संघटित करून राष्ट्राची एकता राखणे हे आहे. संघाचे कार्य स्वयंसेवकांद्वारे केले जाते आणि हे कार्य नवीन स्वयंसेवकांना प्रशिक्षित करण्यासाठी आणि त्यांच्यात नेतृत्व आणि जबाबदारी विकसित करण्याच्या संधी प्रदान करते. राष्ट्राची संकल्पना शक्ती सरकारद्वारे परिभाषित केलेली नाही. भारतीय परंपरेत, राष्ट्राचा अर्थ संस्कृती, आत्मचिंतन आणि सामाजिक जाणीवेशी जोडलेला आहे. इतिहासाकडे पाहिल्यास हे स्पष्ट होते, की १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी झाले असले तरी त्यामुळे भारतीय समाजात एक नवचेतना आणि आत्म-जागरूकता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतरही समाजात निर्माण झालेली असमानता आणि दुष्कृत्ये दूर करण्याचे आव्हान कायम राहिले. या गरजेमुळे संघाची स्थापना आणि भूमिका निर्माण झाली.

डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि इतर महापुरुषांनी सामाजिक दुष्कृत्ये दूर करण्याची आणि संपूर्ण समाजाचे संघटन करण्याची गरज ओळखली. समाजाच्या नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांना बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत त्याचे योगदान सुनिश्चित करण्याच्या दृष्टिकोनातून १९२५ मध्ये संघाची स्थापना झाली. हिंदू हा शब्द केवळ एक धर्म नाही तर जबाबदारी, समर्पण आणि समावेशाचे प्रतीक आहे. तो बहिष्कार किंवा विरोध दर्शवत नाही, तर समाजाला एकत्र आणण्याचे आणि संघटित करण्याचे काम करतो. भारताचे स्वरूप सहकार्य आणि समन्वयाचे आहे, संघर्षाचे नाही. त्याची एकता भूगोल, संसाधने आणि आत्मनिरीक्षणाच्या परंपरेत आहे. बाह्याऐवजी अंतर्मनाकडें पाहिल्यास हे स्पष्ट होते, की सर्वांमध्ये एक समान सार आहे... ते वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट झाले तरीही. म्हणूनच भारतमाता आणि आपले पूर्वज आपल्याला आदरणीय आहेत. भारतमाता आणि त्यांच्या पूर्वजांचा आदर करणारी व्यक्ती खरी हिंदू आहे. शब्द बदलू शकतात; परंतु भक्ती आणि श्रद्धेची भावना समाजातील प्रत्येक व्यक्तीला एकत्र करते. हळूहळू, समाजातील लोक संघ आणि हिंदू या शब्दांचा अर्थ समजू लागले आहेत. जीवनाचा दर्जा सुधारत असताना, लोक त्यांच्या मूळ परंपरांकडे परत येतात.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोणालाही हिंदू होण्यास भाग पाडत नाही. त्याचे उद्दिष्ट समाजाच्या एकूण संघटनेत आणि राष्ट्रनिर्माणात योगदान देणे हे आहे. संघ कोणत्याही धर्माच्या, जातीच्या किंवा गटाच्या विरोधात नाही, तर सर्वसमावेशक दृष्टिकोनाने समाजाला एकत्र आणतो. संघाचे कार्य केवळ संघटनेपुरते मर्यादित नाही. त्याचे ध्येय समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये नैतिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये विकसित करणे हे आहे. समाजात जागरूकता आणि शिस्त हे संघाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. वैयक्तिक समर्पण आणि शिस्त त्याच्या कार्यपद्धतीत महत्त्वाची भूमिका बजावते. प्रत्येक स्वयंसेवक संघाच्या मूळ भावनेला आणि कार्यशैलीला आत्मसात करतो आणि समाजात अंमलात आणतो. समाजातील गटबाजी दूर करणे हे संघाचे ध्येय आहे. त्याचबरोबर सर्वांना एकत्र करणे आणि देशात एकता राखणे हे ही संघाचे उद्दीष्ट्य आहे. विविधतेतील एकता ही भारताची खरी ओळख आहे. विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा असूनही, भारताची ओळख त्याच्या आत्म्यात, संस्कृतीमध्ये आणि पूर्वजांबद्दलच्या आदरात आहे. संघाचे उद्दिष्ट ही एकता टिकवून ठेवणे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला सहभागी करून घेणे हे आहे. संघाचे कार्य तीन स्तरांवर चालते. वैयक्तिक विकास, सामाजिक उत्थान आणि राष्ट्रनिर्माण. संघाच्या माध्यमातून समाजात नैतिक आणि सांस्कृतिक मूल्ये बळकट केली जात आहेत. संघाच्या कार्यकर्त्यांद्वारे संघ समाजात शिस्त, समर्पण आणि सेवेची भावना निर्माण करतो. संघाचे उद्दिष्ट स्वयंसेवकांपुरते मर्यादित नाही, तर समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट्य आहे.

संघाची कार्यशैली वैयक्तिक प्रयत्न आणि संघटनात्मक दृष्टिकोन यांच्यात संतुलन राखते. संघाचे ध्येय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपली कर्तव्ये समजून घ्यावीत आणि राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे. संघाचं कार्य वैयक्तिक समर्पण, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीद्वारे समाजाचे संघटन करणे हे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शंभर वर्षांचा प्रवास हा एका धाडसाची एक भव्य गाथा आहे. १९२५ मध्ये नागपूरच्या पवित्र भूमीत डॉ. हेडगेवार यांनी लावलेले छोटेसे बीज आज भारताच्या सांस्कृतिक भूदृश्याला व्यापून वटवृक्ष बनले आहे. हा केवळ एका संघटनेचा उत्सव नाही, तर 'सर्वे भवन्तु सुखिन:' या शब्दांना जिवंत करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या जीवनदृष्टीचा उत्सव आहे. हे शताब्दी वर्ष केवळ संघाचे नाही, तर एका कल्पनेचा उत्सव आहे, जो आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम' या भारतीय भावनेला जिवंत ठेवण्यासाठी प्रेरणा देतो. संघाची ही प्रथा कोणत्याही संघटनेचे वैयक्तिक ध्येय नाही, तर भारताच्या आत्म्याचे बलिदान आहे. राष्ट्रीय प्रगती सत्ता परिवर्तनातून, केवळ आर्थिक प्रगतीतून नाही, तर समाजात जागृत झालेल्या सामूहिक चेतनेतून येते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपलेपणाची भावना मिळते. हा असा मार्ग आहे, ज्यावर भारत जगाला केवळ एक नवी दिशा देऊ शकत नाही, तर त्याच्या शाश्वत संस्कृतीच्या प्रकाशात त्याचे भविष्यदेखील उजळवू शकतो.

प्रत्येक नागरिक स्वतःमध्ये लपलेली सेवा आणि सद्भावनेची ज्योत प्रज्वलित करतो, तेव्हाच खरी राष्ट्रीय प्रगती शक्य आहे. संघाची ही पद्धत काळ, समाज आणि नवीन दृष्टिकोनाच्या त्याच दिव्याचा विस्तार आहे. संघाची शताब्दी ही केवळ संघटनेचा उत्सव नाही तर भारताच्या सांस्कृतिक जाणीवेचा उत्सव आहे. ही लाखो स्वयंसेवकांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमांना श्रद्धांजली आहे, ज्यांनी प्रसिद्धीची कोणतीही इच्छा न बाळगता राष्ट्राला बळकट करण्यासाठी काम केले. अखंड भारताचे स्वप्न भौगोलिकदृष्ट्या दूरचे वाटू शकते; परंतु सांस्कृतिक अखंडता आणि स्वाभिमानाची ज्योत पूर्वीपेक्षा अधिक तेजस्वी आहे. डॉ. मोहन भागवत यांच्या नेतृत्वाखाली संघ संवाद, समावेशकता आणि आधुनिकतेच्या संगमावर उभा आहे. हे शताब्दी वर्ष आपल्याला आठवण करून देते, की भारताचा आत्मा केवळ भूतकाळातच नाही, तर भविष्याच्या आकाशातही तेजस्वी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा एक दिवा आहे, जो प्रकाश पसरवतो. काळाच्या प्रत्येक वादळात स्थिर राहतो आणि म्हणतो, 'वसुधैव कुटुंबकम, दयाळू जग हे आपले कुटुंब आहे.' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आपल्या शताब्दी वर्षाकडे वाटचाल करत आहे. १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेली ही संघटना आज जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी सांस्कृतिक संघटना मानली जाते. आपल्या शंभर वर्षांच्या प्रवासात, संघाने भारतीय समाज, राजकारण, संस्कृती आणि राष्ट्रीय जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक पैलूवर एक ना अनेक प्रकारे प्रभाव पाडला आहे. हा प्रसंग संघासाठीच नाही, तर भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनासाठीदेखील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क या ट्रम्प सरकारने भारतावर लादलेल्या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. आता कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दीवंताना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्ट अप क्षेत्रामध्ये उतरावे लागेल. अमेरिकन कंपन्यांनी भारतातूनच आयटी सेवा घ्यायचे ठरवल्यास आयटी क्षेत्रात भारताची प्रगती होऊ शकते.**

# आता प्रतिभेला भारतातच उत्तम संधी




दृष्टीकोन

**डॉ. सुकृत खांडेकर**

ज्येष्ठ पत्रकार

स्वत:ला सिध्द करण्यासाठी एखाद्या माणसाकडे रास्त गुणवत्ता किंवा तात्विक आधार नसेल तर तो 'शॉर्ट कट'चा अवलंब करतो. रास्त काय आणि चुकीचे काय, याचा सारासार विचार न करता विचित्र कृती करायला लागतो. भारतीय औषध उद्योग, भारतीय चित्रपट यावर आयात शुल्क लादल्या किंवा वाढवल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणखी काय करणार, याची खात्री कोणालाही नाही. एव्हाना ते हात धुवून भारताच्या मागे लागले आहेत. भारत-पाकिस्तान युध्द आपण थांबवले, असा खोटा दावा करण्यापासून भारतावर ५० टक्के आयात कर लादण्यापर्यंत त्यांनी भारतविरोधी निती राबवायला सुरूवात केली. 'अमेरिका फर्स्ट' हे त्याचे धोरण आहे. पण ते राबवताना भारताला अनेक परिणाम भोगावे लागत आहेत. ट्रम्प यांनी एका आदेशावर स्वाक्षरी करून अमेरिकेत नोकरीसाठी येणाऱ्या कुशल आणि तज्ञ भारतीयांना जबरदस्त झटका दिला. नव्या आदेशानुसार एच वन बी व्हिसाचे पूर्वी सहा लाख रूपये असलेले शुल्क आता एक लाख डॉलर्स म्हणजेच ८८ लाख रूपये झाले आहे. हा आदेश अमेरिकेत जाऊन नोकरी करू इच्छिणाऱ्या तरूणांवर मोठा आघात ठरला. भारतातील डॉक्टर्स, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, आयटी क्षेत्रातील इंजिनिअर्स आणि तज्ञ वर्षानुवर्षे मोठ्या संख्येने एचवनबी व्हिसा मिळवून नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जात आहेत. ट्रम्प सरकारचा नवा आदेश म्हणजे त्यांच्या भविष्यावर अमेरिकेने चालवलेली कुऱ्हाड आहे. या सर्व  हजारो बुध्दीमान भारतीय तरूणांच्या अमेरिकेत जाऊन करिअर करण्याच्या स्वप्नावर ट्रम्प सरकारने पाणी ओतले. या निमित्ताने अमेरिकेच्या या नीतीची आणि परिणामांची जोरदार चर्चा सुरु झाली.

अमेरिका दर वर्षी जेवढे एचवनबी व्हिसा मंजूर करते, त्याचा सर्वाधिक म्हणजेच ७० ते ७३ टक्के लाभ भारतीय नागरिकांना मिळत आला आहे. २०२४ मध्ये एक लाखापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना अमेरिकेने एच वन बी व्हिसा मंजूर केला होता. २०२४ मध्ये ही संख्या घटली आणि ७१,२१९ भारतीयांना एच वन बी व्हिसाचा लाभ मिळाला. २०२५ मध्ये आजवर ६४ हजार भारतीयांना एचवनबी व्हिसा मंजूर झाला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये नोकरीसाठी अमेरिकेत येणाऱ्या भारतीयांना व्हिसा देण्याचे प्रमाण अगोदरच घटले आहे. आता या व्हिसाचे शुल्क भरमसाठ वाढवल्यामुळे नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीयांचा ओघ निश्चितच थांबेल किंवा खूपच कमी होईल.

व्हिसा शुल्कात सहा लाखावरून थेट ८८ लाख अशी भरमसाठ वाढ केल्याने भारतीय तरूणांचे व्हिसा शुल्क भरणाऱ्या अमेरिकन कंपन्याही हबकल्या आहेत. यापुढे ते एवढे मोठे शुल्क ते भरण्याची तयारी दाखवतील का, हा कळीचा मुद्दा आहे. भारतीय कुशल तज्ञांची, तंत्रज्ञांची आणि इंजिनिअर्सची संख्या घटली तर अमेरिकन कंपन्यांच्या कारभारावरही परिणाम होईल आणि या व्हिसा शुल्कवाढीचा अर्थव्यवस्थेवरही परिणाम होईल. कमी वेतनात कुशल तंत्रज्ञ म्हणून भारतीय नागरिक उपलब्ध होतात म्हणून अमेरिकेत भारतीय तरूणांना मोठी संधी मिळत होती. गेली काही दशके भारतीय नागरिकांनी सिलिकॉन व्हॅलीमधे मोठे स्थान निर्माण केले. आता भरमसाठ व्हिसा शुल्कामुळे हे तरूण देशात राहूनच विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय, आयटी क्षेत्रात सेवा करणार की ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि युरोपकडे धावणार, असा प्रश्न चर्चिला जात आहे.

अमेरिकेने लादलेले निर्बंध आणि नोकरीसाठी आकारलेले भरमसाठ व्हिसा शुल्क हे ट्रम्प सरकारने भारतावर लादलेले संकट आहे. या संकटाकडे बघून हताश होणार की आव्हान म्हणून संकटाला सामोरे जाणार हाच खरा प्रश्न आहे. कुशल तंत्रज्ञ आणि बुध्दीवंताना भारतातच नोकरी शोधावी लागेल किंवा स्टार्ट अप किंवा मेक इन इंडियामध्ये उतरावे लागेल. भारतीय सॉफ्टवेअर सेवेची निर्यात सध्या १५८ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. येत्या पाच वर्षांमध्ये ती २०० अब्ज डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अमेरिकेत बोलावून नोकऱ्या देण्याऐवजी भारतातूनच आयटी सेवा घेणे अमेरिकन कंपन्यांनी ठरवल्यास आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रात भारताची मोठी प्रगती होऊ शकते.  अमेरिकेतील कंपन्यांना भारतात राहून सेवा देणाऱ्या इंजिनिअर्स आणि तंत्रज्ञांची कमी खर्चात चांगली सेवा मिळू शकेल आणि भारताचीही वेगाने भरभराट होऊ शकेल. पूर्वी नोकरीसाठी भारतीय तरूण अमेरिकेत गर्दी करत होते, पण व्हिसाच्या भरमसाठ शुल्कामुळे ते भारतात राहुनच स्टार्ट अप सेवा सुरू करू शकतील. भारतात रोजगार वाढेल आणि भारतात राहून जागतिक स्तरावर सेवा देऊन भारतातील तरूणांना चांगले उत्पन्न मिळू शकेल. जागतिक सेवा देण्यासाठी उत्तम प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनाही देशात चांगली संधी मिळू शकेल.

भारतातून जागतिक स्तरावर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यासाठी उत्तम वातावरण असले पाहिजे. स्वच्छ आणि निरोगी परिसर पाहिजे. उत्तम वेतन आणि दर्जेदार सेवा देता आली तरच भारतीय तरूणांना स्पर्धेत टिकून राहता येईल. सरकारी कामातील लाल फितीचा कारभार आणि सर्व स्तरावर बोकाळलेला भ्रष्टाचार आणि कामचुकारपणा असेल तर जागतिक स्पर्धेत आपण कसे टिकाव धरू शकाणार? काम न करता वेतन किंवा मोबदला मिळाला पाहिजे आणि जास्तीत जास्त सेवा फुकट मिळाल्या पाहिजेत, ही मानसिकता दूर होणे सर्वात महत्वाचे आहे. राजकीय नेत्यांच्या मागे चकरा मारणे आणि सरकारी नोकरशहांची मनधरणी करणे या गोष्टी कायमच्या बंद होणे गरजेचे आहे. विदेशात जशी सुसज्ज व अद्ययावत असतात, तशी कार्यालये देशात राज्याराज्यांमध्ये उपलब्ध झाली पाहिजेत. महत्वाच्या मोठ्या शहरांमध्ये सुसज्ज ग्रोथ सेंटर्स उभारली पाहिजेत. वीज आणि पाणी पुरवठा अखंड पाहिजे, इंटरनेट सेवा उत्तम असली पाहिजे. संशोधनासाठी सुविधा आणि कॉर्पोरेट वातावरण स्पर्धेसाठी गरजेचे आहे. करआकारणी आणि कंपन्यांसाठी असलेले कायदे आणि नियम गुंतागुंतीचे नसावेत याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. अन्य कोणत्याही देशांपेक्षा भारतात टॅलेंट मुबलक आहे, भारतीय नागरिक प्रामाणिकपणे आणि चांगली गुणवत्ता देणारे काम करतात हे जगाला ठाऊक आहे. भारतीय कंपन्यांकडे विदेशातून अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होईल असे वातावरण निर्माण झाले तर भारत जागतिक पातळीवर आयटी आणि सॉफ्टवेअर सेवा देण्यात अग्रेसर राहिल हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा स्वदेशीचा पुरस्कार करायला सुरूवात केली आहे. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, कौशल्य विकास योजनांना आता गती देणे गरजेचे आहे. नोकरशहा आणि सरकारी फायलींच्या विळख्यात या योजना अडकून राहणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. उद्योग, तंत्रज्ञान आणि आयटी सारखी मंत्रालये त्याची माहिती तसेच ज्ञान व कामाची आवड असलेल्या मंत्री व सचिवांकडेच दिली पाहिजेत. संशोधन, विकास आणि उद्यमशीलता यांना प्रोत्साहन दिले तर आपला देश आंतरराष्ट्रीय पातळीवर टॅलेंट हब म्हणून ओळखला जाईल. अमेरिकेत जाऊन 'अब की बार ट्रम्प सरकार' अशा घोषणा देऊनही भारताच्या काय पदरी पडले हे सर्व जगाने बघितले आहे. आता हळहळ करण्याऐवजी ट्रम्प सरकारने लादलेल्या संकटातून सोने कसे निर्माण करता येईल यावर सरकार आणि खाजगी क्षेत्राने लक्ष्य केंद्रीत करायला हवे. भारतीय युवकांमधील नैराश्य दूर करण्यासाठी कालबध्द योजनापूर्वक प्रयत्न करायला हवेत. अन्यथा, हा बुध्दिजीवी तरूण आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी अमेरिकेला पर्याय म्हणून युरोप, युके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि आखाती देशांकडे मोठ्या संख्येने जाईल आणि भारत ताज्या संकटातून संधीकडे मार्गक्रमणा करण्यावाचून वंचित राहील.

# योजनेची वाढावी व्याप्ती

**कोणत्याही योजनेचे यश योजना किती चांगली आहे, यापेक्षा ती कशी राबवली जाते, यावर अवलंबून असते. ‘आयुष्मान भारत योजने’चेही तसेच आहे. सरकारी आरोग्ययंत्रणा अपुरी पडत असताना अशा महत्त्वाकांक्षी योजनेशी देशातील सर्व रुग्णालयांना जोडायला हवे. तसेच अशा योजनेतील रुग्णांवर उपचार करण्यास चालढकल करणाऱ्या, उपचारात कुचराई करणाऱ्या किंवा उपचार गांभीर्याने न करणाऱ्यांवर कारवाईची तरतूद असायला हवी.**




परामर्श

महेश जोशी

सरकार जनसामान्यांसाठी अनेक लक्षवेधी योजना राबवत असले तरी त्यांची नेटकी असायला हवी. केंद्र सरकारने ७० वर्षांवरील वृद्धांचा आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत (एबीपीएम–जे) समावेश करण्याचा निर्णय घेतल्यामुळे देशातील बहुसंख्य वृद्धांना पाच लाख रुपयांच्या मोफत आरोग्य विमा कवच योजनेचा लाभ मिळावा, असे सरकारचे उद्दिष्ट आहे. देशातील साडेचार कोटी कुटुंबांमधील सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळणार आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नवीन आणि स्वतंत्र आयुष्यमान कार्ड दिले जात आहे. या योजनेची दखल घेतली पाहिजे. ‘आयुष्मान भारत’ योजनेमध्ये आधी समाविष्ट केलेल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश केला जात आहे. या ज्येष्ठांना दर वर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे टॉप अप कव्हर मिळते. सध्या केंद्राच्या कोणत्याही दुसऱ्या आरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना ‘आयुष्यमान भारत’ योजनेत सहभागी होण्याचा पर्याय उपलब्ध असणे ही महत्वाची बाब ठरते. एबीपीएम–जे योजना जगातील सर्वात मोठी सार्वजनिक आरोग्य विमा योजना आहे. देशातील तळाच्या वर्गात असलेल्या ४० टक्के लोकसंख्येला त्याचा फायदा होत आहे. ही योजना ज्येष्ठ नागरिकांनाही लागू करण्याचे आश्वासन भाजपने लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिले होते. केंद्र सरकारच्या आयुष्मान ॲपमार्फत अथवा सरकारच्या कोणत्याही आरोग्य केंद्रातील ‘आयुष्मान भारत’ काउंटरवर या विम्यासाठी नोंदणी करता येणार आहे. केवळ ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली की, लाभधारकांना आपल्या विम्याचा वापर करून घेणे शक्य होईल. मात्र एखाद्या कुटुंबात ७० वर्षांवरील दोन व्यक्ती असल्यास पाच लाखांचा विमा त्यांच्यात वाटला जाईल.

एबीपीएमजे योजनेत एक कोटी ७८ लाखहून अधिक व्यक्ती समाविष्ट आहेत. अतिरिक्त ‘टॉप अप’चा फायदा देण्यामुळे सरकारवर येणारा बोजा हा अत्यल्प आहे. ‘आयुष्मान भारत’ योजनेमध्ये १,६०० विविध प्रकारचे वैद्यकीय उपचार अंतर्भूत आहेत. म्हणजे त्यासाठी येणाऱ्या खर्चाची भरपाई करून दिली जाते. केंद्र सरकारची सीजीएचएस आरोग्य योजना, निवृत्त लष्करी जवानांसाठी असलेली कॉन्ट्रीब्युटरी हेल्थ स्कीम तसेच रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी असणारा विमा अशा वेगवेगळ्या योजनांचा लाभ सध्या ८० लाख लोकांना मिळत आहे. त्याच्या लाभधारकांना विद्यमान योजनेत राहता येईल किंवा ‘आयुष्मान भारत’ योजनेमध्ये समाविष्ट होता येईल. मात्र राज्य कामगार विमा महामंडळांच्या विमा योजनेमध्ये समावेश असलेल्या व्यक्तींना त्याचे फायदे घेतानाच ‘आयुष्मान भारत’चाही लाभ घेता येईल. याचे कारण राज्य विमा योजनेचा प्रीमियम सरकार भरत नाही, तर विमा उतरवणारी व्यक्ती आणि ती काम करत असलेल्या आस्थापनेचा मालक भरत असतात. स्वतःचा खाजगी विमा काढणारेही ‘आयुष्मान भारत’ विमाछत्राला पात्र असतील. या अशा योजनांचा सरकारवर किती भार येतो, याचा विचार करावाच लागतो. मूळ योजनेचा विस्तार करताना केंद्र सरकारला सुरुवातीला ३,४३७ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित होता. चालू वर्षातील सहा महिने आणि पुढील वर्षाचा खर्च त्यातून भागू शकेल, असा अंदाज मांडला गेला होता.

या योजनेतील ४० टक्के वाटा राज्यांनी उचलायचा आहे. विविध राज्यांची हा वाटा उचलण्याची क्षमता आहे का नाही, हे बघावे लागेल. आज नवी दिल्ली, पश्चिम बंगाल आणि अन्य राज्यांमध्ये ‘आयुष्मान भारत’ ही योजना राबवली जात नाही. अर्थात असे असले तरी वयस्कर व्यक्तींसाठी सरसकट विमा संरक्षण असणे, अत्यावश्यक आहे. याचे कारण नोकरी–व्यवसाय करताना अनेक शारीरिक आणि मानसिक यातनांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे भारतातील सरासरी आयुर्मर्यादा वाढली असली, तरीदेखील लोकांच्या विविध स्वरूपाच्या आजारांचेही प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे आज उपचारांचा तसेच औषधांचा आणि खास करून शस्त्रक्रियांचा खर्च मोठा आहे. २०११ ची जनगणना झाली, तेव्हा भारतातील केवळ साडेआठ टक्के लोकसंख्या साठ वर्षांपेक्षा अधिक वयाची होती. २०५० पर्यंत हे प्रमाण १९ टक्क्यांवर जाईल, असा अंदाज आहे. म्हणजे अशांची संख्या येत्या २५ वर्षांमध्ये ३२ कोटींच्या आसपास असेल. म्हणजेच २०११ च्या तुलनेत हे प्रमाण खूपच वाढणार आहे. २०११ मध्ये भारतात साठ वर्षांवरील एकूण दहा कोटी लोक होते. ज्येष्ठ नागरिकांना इस्पितळात अधिक दिवस रहावे लागते आणि त्याचा खर्च मोठा असतो. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांना विम्याचा लक्षणीय फायदा होणार आहे. आरोग्य विमा असलेल्यांचे दाखल होण्याचे प्रमाण तरुणांमध्ये सरासरी तीन–चार टक्के तर ज्येष्ठांमध्ये सात टक्के आहे. देशातील साठ वर्षांवरील केवळ वीस टक्के लोकसंख्येला आज कोणते ना कोणते विमा कवच आहे. बाकीच्यांना त्याची नितांत गरज आहे. म्हणूनच केंद्र सरकारने ज्येष्ठांसाठी सुरू केलेल्या योजनेचा सर्वांनी लाभ घेतला पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ही योजना महत्त्वाकांक्षी आहे. कोणत्याही योजनेचे यश योजना किती चांगली आहे, यापेक्षा ती कशी राबवली जाते, राबवणारी यंत्रणा किती प्रामाणिक आहे आणि या योजनेशी संबंधित घटक ती राबवण्यास कसा हातभार लावतात, यावर अवलंबून असते. ‘आयुष्यमान भारत योजने’चेही तसेच आहे. सरकारी आरोग्ययंत्रणा सर्वांना पुरेशी नाही आणि खासगी क्षेत्र तर फुकट (नंतर ते पैसे संबंधितांना मिळणार असताना) उपचार करायला नकार देतात. वास्तविक, अशा महत्त्वाकांक्षी योजनेला ठराविक रुग्णालये न जोडता देशातील सर्व रुग्णालयांना ती सक्तीची करायला हवी. तसेच अशा योजनेतील रुग्णांवर उपचार करण्यास चालढकल करणाऱ्या, दाखल करून न घेणाऱ्या, उपचारात कुचराई करणाऱ्या किंवा उपचार गांभीर्याने न करणाऱ्यांवर कारवाईची तरतूद असायला हवी. त्याचबरोबर चांगली कामगिरी करणाऱ्या, रुग्णसेवेचा चांगला रेशो असणाऱ्या रुग्णालयांना प्रोत्साहनात्मक मदतीची, पाठीवर शाबासकीची थाप मारण्याची व्यवस्था असायला हवी. या योजनेच्या चार वर्षांच्या वाटचालीबाबत उपलब्ध माहितीनुसार ३.९५ कोटी रुग्ण (पेशंट ॲडमिशन्स) भरती करण्यात आले. त्यानुसार गरजू रुग्णांवर या योजनेचा भाग म्हणून सुमारे ४५ हजार २९४ कोटी रुपयांचे उपचार करण्यात आले. कोरोना महासाथीने देशभर थैमान घातल्यानंतर गरजू रुग्णांवर आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचार करण्यात यावेत, अशा सूचना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून देण्यात आले; मात्र नागरिकांना त्याचे प्रत्यक्ष लाभ किती मिळाले याबाबत मतमतांतरे आहेत.

जगातील अनेक विकसित आणि विकसनशील देशांच्या अर्थसंकल्पामध्ये आरोग्यासाठी केली जाणारी तरतूद आणि भारतात केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये आरोग्यासाठी केली जाणारी तरतूद यामध्ये कमालीची तफावत आहे. २०१७–१८ या आर्थिक वर्षात देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.३ टक्के एवढी असलेली सार्वजनिक आरोग्य सेवेवरील तरतूद दर वर्षी वाढणे अपेक्षित असताना २०१८–१९ मध्ये ३.२ टक्के पर्यंत खाली आलेली पाहायला मिळाली. या काळात राष्ट्रीय आरोग्य योजनेतील केंद्र सरकारचा वाटाही सातत्याने घसरत चाललेला पहायला मिळत आहे. त्यामुळेच इतर विकसित आणि विकसनशील देशांच्या तुलनेत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण हे भारताच्या प्राधान्यक्रमावरच नसल्याची टीका सातत्याने होताना दिसून येते. आयुष्मान भारत योजना सुरू झाली, तेव्हा इतर आरोग्य सेवा योजनांशी या नव्या योजनेचा ताळमेळ कसा घालायचा हा प्रश्न होता. आज योजनेला काही वर्षे पूर्ण झाल्यानंतरही काही मूलभूत आरोग्यसेवांची आव्हाने कायम आहेत. योजनेतील डॉक्टर, आजार, केंद्रांची संख्या असे काही प्रश्न आहेत. अनेक खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना या योजनेचा लाभ देणे शक्य नसल्याचे वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले आहे. बनावट देयके सादर करून या योजनेचा गैरवापरही झाल्याचीही काही उदाहरणे आहेत. ठराविक सुविधाच नसलेल्या रुग्णालयांकडून ते उपचार केल्याचा दावा करून लाभ मिळवण्याचा प्रयत्न झाला आहे. यामुळे काही रुग्णालयांना दंडही ठोठावण्यात आला आहे. आज पाच वर्षांनंतरही या योजनेतील त्रुटी दूर करण्यात सरकारला यश आलेले नाही.

# अर्थव्यवस्थेला गती, सामान्यांची अधोगती!



**भारतीय अर्थव्यवस्थेपुढे आव्हाने निर्माण करण्याचा जगातून कितीही प्रयत्न होत असला, तरी भारताची १४५ कोटींची बाजारपेठ, इथला तरुण यांच्यामुळे अर्थव्यवस्थेची गती वाढत आहे. गेल्या काही वर्षांपासून जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताने लौकिक मिळवला आहे. असे असले, तरी कोट्यधीशांची संख्या वाढत असताना दुसरीकडे सामान्यांच्या जीवनात फार फरक पडला आहे, असे चित्र दिसत नाही.**

दखल

अजय तिवारी

भारत आता जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आता तर भारताची वाटचाल जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने सुरू आहे; पण या कामगिरीमुळे सामान्य माणसाच्या जीवनात समृद्धी आली आहे का, हा खरा प्रश्न आहे. हा विकास सर्वसमावेशक आहे का आणि तो भूक, गरिबी आणि असमानता यासारख्या तळागाळातील समस्यांना संबोधित करतो का, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. भारताची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचत जपानच्या अर्थव्यवस्थेपेक्षा मोठी झाली आहे. आता फक्त अमेरिका, चीन आणि जर्मनी भारताच्या पुढे आहेत. ही कामगिरी भारताच्या वाढत्या जागतिक आर्थिक शक्ती आणि धोरणात्मक सुधारणांचा परिणाम असू शकते. ‘डिजिटल इंडिया’, ‘मेक इन इंडिया’ आणि ‘स्टार्टअप इंडिया’सारख्या सरकारच्या कार्यक्रमांनी गुंतवणूक आकर्षित केली आहे आणि औद्योगिक विकासाला चालना दिली आहे. शिवाय, भारताची तरुण लोकसंख्या आणि तांत्रिक प्रगतीमुळे जागतिक स्तरावर देशाचे स्थान मजबूत झाले आहे. तथापि, ही आर्थिक प्रगती केवळ ‘जीडीपी’च्या आकडेवारीपुरती मर्यादित आहे. जीडीपी हा एक व्यापक आर्थिक निर्देशक असला, तरी तो सामाजिक–आर्थिक असमानता, गरिबी आणि राहणीमान यासारख्या महत्त्वाच्या बाबी पूर्णतः प्रतिबिंबित करत नाही. २०२४ च्या जागतिक भूक निर्देशांकात भारत १०५ व्या क्रमांकावर आहे. यावरून दिसून येते, की देशात कुपोषण आणि उपासमार ही गंभीर समस्या आहे.

आज सरकार २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणल्याचा दावा करत असले, तरी भारतात उत्पन्नातील असमानता आणि बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक आहे. अलिकडच्या ‘ऑक्सफॅम’च्या अहवालानुसार, भारतातील सर्वात श्रीमंत एक टक्का लोकांकडे देशाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त संपत्ती आहे. ही आकडेवारी असमानतेची खोल दरी अधोरेखित करते. आर्थिक प्रगतीचे फायदे समाजाच्या प्रत्येक वर्गापर्यंत, विशेषतः गरीब आणि उपेक्षित समुदायांपर्यंत पोहोचतात का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. ग्रामीण भारतात अजूनही स्वच्छ पाणी, शिक्षण आणि आरोग्य सेवा यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे. शहरी भागातही अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांच्या परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली नाही. प्रगती आणि समृद्धी प्रत्येक घरात पोहोचते, तेव्हा सामान्य नागरिकाला अर्थव्यवस्थेच्या क्षमतेचे चांगल्या प्रकारे आकलन होते. भारताच्या आर्थिक धोरणांचे मूल्यांकन करण्यासाठी हा एक चांगला मापदंड आहे. आर्थिक वाढ केवळ कॉर्पोरेट क्षेत्र किंवा श्रीमंतांपुरती मर्यादित असेल, तर ती सर्वसमावेशक म्हणता येणार नाही. अन्नधान्य महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे मध्यम आणि निम्न उत्पन्न असलेल्या कुटुंबांवर मोठा भार पडला आहे. भारताची चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची कामगिरी खऱ्या अर्थाने साकार करण्यासाठी सरकारने समावेशक आणि शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. शिक्षण, आरोग्य आणि पोषण यासारख्या क्षेत्रात गुंतवणूक वाढवली पाहिजे, जेणेकरून विकासाचे फायदे समाजाच्या प्रत्येक वर्गापर्यंत पोहोचतील.

आजघडीला लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देऊन आणि कौशल्य विकासावर भर देऊन तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढवता येतील. प्रगतीशील कर धोरणे आणि सामाजिक सुरक्षा योजनांद्वारे संपत्तीचे असमान वितरण कमी करणे, ही आजची एक महत्वाची गरज आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्या भागात पायाभूत सुविधा आणि कृषी–आधारित उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. तो देशाच्या वाढत्या ताकदीचे प्रतिबिंब आहे. आर्थिक प्रगती खऱ्या अर्थाने तेव्हाच मोलाची ठरते, जेव्हा सामान्य लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणते. भूक, गरिबी आणि असमानता यासारख्या समस्या सोडवल्याशिवाय ही कामगिरी अपूर्ण राहील. म्हणूनच सरकारने आर्थिक वाढीसोबतच सामाजिक न्याय आणि समावेशकतेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, जेणेकरून भारत केवळ आर्थिक शक्ती म्हणूनच नव्हे, तर एक समृद्ध आणि समावेशक राष्ट्र म्हणून जागतिक स्तरावर चमकू शकेल. अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंचे विश्लेषण करणे कठीण आणि गुंतागुंतीचे काम आहे. या जगातील सर्व ‘मोठ्या’ गोष्टी, ज्या ‘मोठ्या’ लोकांचे क्षेत्र बनले आहेत, ‘मोठ्या’ लोकांच्या इच्छेनुसार हलतात आणि थांबतात. मोठी अर्थव्यवस्थाही त्याला अपवाद नाही. अनेक जागतिक संस्थांचा अंदाज आहे की भारताची अर्थव्यवस्था याच वेगाने वाढत राहिली, तर २०२८ पर्यंत जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या स्थानावर पोहोचेल. त्याचा जीडीपी २०२७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर्स आणि २०२८ पर्यंत ५.५८ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

जगातील पहिल्या दहा अर्थव्यवस्थांमध्ये अमेरिका ३०.५०७ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह पहिल्या क्रमांकावर आहे, तर चीन १९.२३१ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. जर्मनी ४.७४४ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि भारत ४.१८७ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह चौथ्या क्रमांकावर आहे. जपान ४.१८६ ट्रिलियन डॉलर्सच्या जीडीपीसह पाचव्या क्रमांकावर आहे. त्यानंतर इंग्लंड ३.८३९ ट्रिलियन डॉलर्स, फ्रान्स ३.२११ ट्रिलियन डॉलर्स, इटली २.४२२ ट्रिलियन डॉलर्स, कॅनडा २.२२५ ट्रिलियन डॉलर्स आणि ब्राझील २.१२५ ट्रिलियन डॉलर्स अशी आकडेवारी आहे. भारताच्या जीडीपीच्या आधारे अर्थव्यवस्थेची गती मोजली जात असली, तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात जीडीपी मोजण्याच्या पद्धतीत बदल झाल्याकडे अर्थतज्ज्ञ लक्ष वेधतात. जीडीपी मोजण्याच्या पद्धतीमुळे केवळ जीडीपी डेटामध्येच नाही, तर विकासदर, गुंतवणूक आणि उपभोग डेटामध्येही त्रुटी आढळतात. भारताचा जीडीपी ४.१८७ ट्रिलियन डॉलर आहे. ब्रिटनचा जीडीपी ३८.३९ अब्ज डॉलर आहे. त्यानुसार, सामान्य भारतीयांचे राहणीमान ब्रिटनमधील लोकांपेक्षा खूपच चांगले असायला हवे होते. तथापि, प्रत्यक्षात तसे नाही. ब्रिटनचे दरडोई उत्पन्न भारतापेक्षा वीसपट जास्त आहे. कारण भारताची लोकसंख्या १.४६ अब्ज आहे, तर ब्रिटनची फक्त ६७.२ दशलक्ष आहे. भारताचे दरडोई उत्पन्न २,८८० डॉलर आहे, तर ब्रिटनचे ५४,९५० डॉलर आहे. लोकसंख्या जास्त असलेल्या चीनचा जीडीपी १९.२३१ ट्रिलियन डॉलर आहे आणि त्याचे दरडोई उत्पन्न १३,६९० डॉलर आहे. म्हणजेच चीनचे दरडोई उत्पन्न भारताच्या साडेचार पट आहे.

कमी लोकसंख्या असलेल्या अनेक देशांमध्ये, भारतापेक्षा कमी जीडीपी असूनही, दरडोई उत्पन्न भारताच्या अनेक पट आहे. फ्रान्समध्ये दरडोई वार्षिक उत्पन्न ६४,३९० डॉलर, इटलीमध्ये ४१,०९० डॉलर, कॅनडामध्ये ५३,५६० डॉलर आणि ब्राझीलमध्ये ९,९६० डॉलर आहे. स्वाभाविकच, या देशांमधील सामान्य लोकांचे राहणीमान भारतातील सामान्य लोकांपेक्षा अनेक पटींनी चांगले आहे. भारताची लोकसंख्या या वर्षी १.४६४ दशलक्षपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. ती जपानच्या अंदाजित १२३ दशलक्ष लोकसंख्येच्या बारापट आहे. म्हणूनच वर्षअखेरीस भारताचा जीडीपी जपानच्या बरोबरीचा असला, तरी त्याचे दरडोई उत्पन्न जपानच्या दरडोई उत्पन्नाचा फक्त बारावा भाग राहील. याचा अर्थ असा, की जपानी माणूस भारतीयांपेक्षा बारापट श्रीमंत असेल. कोणत्याही परिस्थितीत देशाची समृद्धी त्याच्या अर्थव्यवस्थेच्या वाढत्या आकारात किंवा जीडीपीवाढीमध्ये प्रतिबिंबित होत नाही, तर दरडोई उत्पन्नाच्या वाढीमध्ये दिसून येते. कारण दरडोई उत्पन्नातील घटणारी असमानता आरोग्यसेवा, शिक्षण, घरे आणि सामान्य माणसासाठी समान संधींमध्ये वाढ दर्शवते. वाढत्या अर्थव्यवस्थेतील सतत वाढती असमानता सर्व समृद्धी आणि संपत्ती खाऊन टाकत आहे. ई–श्रम पोर्टलवर नोंदणीकृत २७६.९ दशलक्ष कामगारांपैकी ९४ टक्क्यांपेक्षा जास्त कामगार दहा हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी कमावतात आणि ८० टक्के लोकसंख्या (१.२ अब्ज लोक) दरमहा दहा हजार रुपयांपेक्षा कमी कमावते.

सर्वेक्षणानुसार देशातील ४६ टक्के लोकसंख्या दरमहा १५ हजार रुपयांपेक्षा कमी कमावते. देशाची संपत्ती काही कॉर्पोरेट घराण्यांच्या तिजोरीमध्ये केंद्रित झाली आहे. भारत उपासमारीच्या बाबतीत १२१ देशांपैकी १०७ व्या क्रमांकावर, लिंग समानतेत १२७ व्या क्रमांकावर, माध्यम स्वातंत्र्यात १६१ व्या क्रमांकावर, बौद्धिक संपदेत ५५ देशांपैकी ४२ व्या क्रमांकावर आणि भ्रष्टाचारात १०७ देशांपैकी ८६ व्या क्रमांकावर आहे. कारखाने आणि कंपन्यांचे मालक नफ्याचा मोठा भाग खिशात घालतात आणि कामगारांना किमान वेतनावर जगावे लागते. म्हणूनच देशाचा जीडीपी वाढत असताना श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत आहे. शिवाय, वेगाने वाढणारी महागाई उत्पन्नातील थोडीशी वाढदेखील खाऊन टाकत आहे.



लडाखला राज्याचा दर्जा आणि संवैधानिक संरक्षणाची मागणी करणाऱ्या आंदोलनाचे नेतृत्त्व करणाऱ्या सोनम वांगचुक यांनी वैयक्तिक सुरक्षेची चिंता व्यक्त केली होती. 'मला वाटते की ते (प्रशासन) माझ्यावर सार्वजनिक सुरक्षा कायद्याच्या अंतर्गत खटला चालवण्याचा आणि मला दोन वर्षे तुरुंगात टाकण्याचा प्रयत्न करत आहेत', असे सोनम म्हणाले होते. 'माझ्यावर कारवाई होणार आहे, यासाठी मी तयार आहे', असेही त्यांनी म्हटले होते. याचाच अर्थ लडाखमधील आंदोलनानंतर त्यांना सर्व परिस्थितीचा अंदाज आला होता. पण यामुळे प्रश्न सुटेल का? याउलट सोनम यांना तुरुंगात ठेवल्याने जास्त समस्या निर्माण होऊ शकतात. सोनम वांगचूक हे लडाखमधील एक अभियंता आणि शिक्षण सुधारक आहेत. यांना लडाखच्या शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळीचे संस्थापक समजले जाते. सौर उर्जेवर चालणाऱ्या एसईसीएमओएल कॅम्पसची रचना करण्यासाठी ते ओळखले जातात. ते स्वयंपाकासाठी, प्रकाशासाठी किंवा उष्मेसाठी कोणतेही जीवाश्म इंधन वापरत नाहीत. हा त्यांचा इतिहास संपूर्ण देशाला माहिती आहे. असे असतानाही सरकार हा संपूर्ण इतिहास विसरून गेले. त्यामुळेच प्रतिष्ठित बुद्धिमान संशोधक सोनम वांगचुकना उचलून पोलिस कोठडीत टाकले गेले. तीन लाख लडाखी जनतेला चिरडून टाकायला जास्त वेळ लागणार नाही, असा सरकारचा ठाम समज झालेला दिसतो. पण असं म्हणतात की, शेवट आला की सारेच हुकूमशहा आंधळे आणि बहिरे होतात. गरीब लडाखी जनतेला ताकद दाखवली जातेय. म्हणूनच सोनम वांगचुक यांना देशद्रोही ठरवून भारत सरकारने अटक केली. गेल्या निवडणूकत सोनम यांनी स्वतः भाजपला मतदान केले आणि त्यांच्या खासदाराने गेल्या निवडणुकीत विजयदेखील मिळवला. सर्वांनी त्यांना सत्तेत आणण्यासाठी पाठिंबा दिला होता. याचाच अर्थ असा की भाजपला पाठिंबा मिळाला, त्यावेळी सोनम हे खूप चांगले व प्रतिष्ठित व 'देशभक्त' गृहस्थ होते. मात्र त्यांनी आंदोलन हाती घेताच ते 'देशद्रोही' बनले. खरं तर आता भारत सरकारने त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिले गेलेले सन्मान परत घेण्यासाठी मोहीमच हाती घ्यायला हवी. म्हणजे निदान त्यांच्यावरील कारवाईला अधिक बळ मिळेल. तसेच भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील भुमिका अधिक उजळ होईल. सोनम वांगचुक यांच्या पाकिस्तानशी असलेल्या संबंधावर बोलायचे झाल्यास जर हे खरे असेल, तर ते गृह मंत्रालयाचे सर्वात मोठे अपयश आहे. एक पाकिस्तानी गुप्तहेर येथे फिरत होता, मग गृह मंत्रालय काय करत होते? ते त्यांच्या कामात अपयशी ठरले असेच म्हणावे लागेल. भारत सरकारने सोनम वांगचुक यांना विरोध करताना त्यांनी भारतीय सैन्यासाठी बनवलेले सोलार उपकरणे आणि शैक्षणिक सुधारणाही रद्द कराव्यात. त्यांना देशद्रोही ठरवलेच आहे तर त्यांनी निर्माण केलेले यंत्रे देखील चुकीचे असतीलच ना !

# सोनम वांगचुकची अटक ही 'घोडचूक' नाही का?

खरच किती मनमानी चालवलीय. किती भ्रमनिरासता, विद्रोह आहे भारतीय जनतेच्या मनात हे समजून येत नाही बहुतेक सरकारला. ज्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल कौतुक केलं, त्यांनाच देशद्रोही ठरवल जातयं.

खरे देशद्रोही कोण आहे हे जनतेच्या लक्षात आलय. पण करणार काय? सारेच हतबल झाले आहे. सोनम वांगचुक यांना चार वर्षांपूर्वी लडाखला राज्याचा दर्जा देण्याची आणि सहाव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याची मागणी सुरू केल्यापासून त्यांना लक्ष्य केले जात आहे. लडाख हिंसाचार उफाळल्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. सोनम यांना लडाखपासून खूप दूर असलेल्या जोधपूर तुरुंगात ठेवण्यात आले आहे.

हिंसाचार भडकवल्याबद्दल तसेच राष्ट्रीय सुरक्षा कायद्याअंतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोनम वांगचुक यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तपास यंत्रणांनी अनेक वेळा त्यांचे दार ठोठावले आहे. अधिकाऱ्यांनी त्यांच्या दोन स्वयंसेवी संस्थांना येणाऱ्या परदेशी निधीवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

सोनम यांच्या स्वयंसेवी संस्थांवर परदेशी निधी मिळाल्याचा आरोप यापूर्वी झाला आहे. सोनम वांगचुक लडाखमध्ये दोन स्वयंसेवी संस्था चालवतात. पहिल्याचे नाव हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह्ज, लडाख आणि दुसऱ्याचे नाव स्टुडंट एज्युकेशनल अँड कल्चरल मूव्हमेंट ऑफ लडाख असे आहे. दुसऱ्याला फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्टअंतर्गत परवाना देण्यात आला होता.

लडाख हिंसाचारानंतर गेल्या आठवड्यात एनजीओचा परवाना रद्द करण्यात आला. ही परिस्थिती आता निर्माण झाली असली, तरी सोनम यांच्याबद्दल समाजामध्ये एक वेगळीच भावना आहे. सोनम वांगचुक यांनी सौरशक्तीवर चालणारा तंबू भारतीय लष्करासाठी बनवला आहे. त्यांच्या नावावर अनेक पेटंट्स आहेत. धर्माने ते बौद्ध आहेत, अनुसूचित जमातीतले आहेत. लडाखला राज्याचा दर्जा द्यावा आणि भारतीय संविधानाची सहावी अनुसूची लडाखला लागू करावी या प्रमुख मागण्यांसाठी गेली काही वर्षं शांततामय नाही तर अहिंसक मार्गाने ते आंदोलन करत आहेत.

पण आता त्यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यात आली. त्यांच्यावर आरोप काय तर ते परदेशी पैशाच्या आधारे आंदोलन करतात. सोनम वांगचुक हे राष्ट्रविरोधी कारवाया करत असतील तर कोणत्याही भारतीय नागरिकाला हे सरकार राष्ट्रविरोधी ठरवेल. केंद्र सरकारचं राजकारण किती विषारी आहे हे यावरून ध्यानी येईल. भाजपने



वांगचूक यांना अटक करून स्वतःच आपल्या शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकला आहे. हळूहळू सगळा देश सोबत येणार, तेव्हा हे सत्ताधारी काय करतील?

सोनम यांचा एक व्हिडिओ शेअर केला जात आहे, ज्यात ते स्वतः म्हणत आहेत की मी पाकिस्तान मध्ये आलोय आणि इथं कार्यक्रम अटेंड करत आहे. बरं काय होता तो कार्यक्रम?? तर तो कार्यक्रम होता क्लायमेट चेंज बद्दलचा. सोनम वांगचुक यांचे याच क्षेत्रातील मोठे अन महत्वाचे योगदान आहे, जे जगाला माहिती आहे.

बरं हा कार्यक्रम आयोजित केला खाजगी वाहिनी 'डॉन' या मिडिया हाऊसने सरकारने नव्हे. खरंतर सरकारने केला तरी फरक पडत नाही, सोनम वांगचुक काय फुकट न बोलवता गेले नव्हते. सोनम वांगचुक हे लडाखचे रहिवासी असून तिथं नाविन्यपूर्ण कल्पना राबवणारे, अभियंता आणि पर्यावरण कार्यकर्ते आहेत. त्यांनी हिमालयात, विशेषतः लडाखमध्ये काम केले आहे आणि हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ अल्टरनेटिव्ह्स लडाख ही संस्था स्थापन केली आहे.

त्यांनी पाण्याचा साठा करण्यासाठी 'आईस स्तूपा' नावाचा कृत्रिम हिमनदीचा शोध लावला आहे. तसेच स्थानिक संस्कृती आणि आधुनिक गरजा यांचा संगम साधणारे शिक्षण प्रोत्साहित करण्यासाठी ते ओळखले जातात. याचमुळे त्यांना या कार्यक्रमात उपस्थित राहाण्यासाठी बोलावले गेले, एखाद्या सभ्य शेजाऱ्याप्रमाणे आणि उच्च कोटीची मानवी मूल्ये जपणाऱ्या सोनम यांनी तिथे जाऊन मार्गदर्शन केले.

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

हिमालय पर्वत सात देशांमध्ये पसरलेला आहे. हे देश म्हणजे भारत, नेपाळ, पाकिस्तान, अफगाणिस्तान, भूतान, चीन आणि म्यानमार. उद्या जर नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, म्यानमार वा चीनने अशी परिषद आयोजित केली तर तज्ज्ञ लोकांना तिथं जावं लागणार.

हे सगळे देश एकमेकांशी जोडलेले आहेत आणि निसर्गाच्या पुढे कुणाचे काही चालत नसते. म्हणून क्लायमेंटचेंजवर सर्वांनी एकत्र येऊन उपाय योजना करायची असते. खरे कारण हे होतं. पण या विकृत विखारी विषारी लोकांनी एका विद्वान देशभक्त व्यक्तीची प्रचंड बदनामी केली. एवढं करून थांबले नाहीत, खटला न चालवताच तुरुंगात टाकले आहे.

पाकीस्तानात क्लायमेंट चेंज या कार्यक्रमासाठी आपण गेलो होतो, हे त्यांनी घसा ओरडून सांगूनही काहीच उपयोग झाला नाही. पण एक लक्षात ठेवा, कारगिल मध्ये पाकिस्तानी अतिरेकी घुसले आहेत व त्यांनी बेस बनवला आहे, ही माहिती तिथल्या स्थानिक लडाखच्या लोकांनीच भारतीय लष्कराला दिली होती. त्यानंतर कारगिल युद्ध झाले होते.

त्यांच्या देशभक्तीवर संशय व्यक्त करून देशप्रेमी नागरिकांचा अपमान करतांना सरकार घाबरायलाच तयार नाही. अशाने देशभक्त नागरिक तयार होतील का याचा विचार सरकारने करायलाच हवा!


## सोनम वागचुंग यांच्या वडिलांविषयी..

सोनम वांग्याल फक्त २३ वर्षांचा एक तरुण पॅरामिलिटरी जवान. डोळ्यांत फक्त एकच स्वप्न तिरंगा सर्वात उंच शिखरावर फडकवायचा! सोनम वांग्याल यांनी एव्हरेस्ट सर केले. त्याच वर्षी त्यांना अर्जुन पुरस्कार आणि पद्मश्री सन्मान मिळाला.

१९६५ मध्ये भारत आणि अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी एक गुप्त मोहिम सुरू केली. नंदा देवी प्लूटोनियम मिशन. चीनच्या अणु चाचण्यांवर लक्ष ठेवण्यासाठी नंदा देवीच्या उंच शिखरावर गुप्त उपकरण बसवायचं होतं. सोनम वांग्याल या मोहिमेचा भाग बनले. स्वतःचा जीव धोक्यात घालून राष्ट्राच्या सुरक्षेसाठी हा तरूण उभा राहिला. काळ पुढे गेला. १९८४ मध्ये जेव्हा लडाखमधील लोक अनुसूचित जमातीचा दर्जा मिळावा म्हणून रस्त्यावर उतरले, तेव्हा हाच सोनम वांग्याल त्यांच्या आंदोलनाचा नेता झाला. त्यांनी उपोषण सुरू केलं. तेव्हा देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. त्या स्वतः लेहला आल्या, संवाद साधला, संवेदनशीलतेनं बोलल्या आणि आंदोलनाला मार्ग दिला.

एक उपाशी माणूस जिंकला, कारण त्याच्यासमोर सत्ता नव्हती तर संवेदना उभी होती. मग १९९३ आले. सोनम वांग्याल इंटेलिजन्स ब्युरोचे असिस्टंट डायरेक्टर पदावरून सेवानिवृत्त झाले. आयुष्यभर त्यांनी राष्ट्राच्या सुरक्षेसाठी, राष्ट्राच्या सन्मानासाठी, राष्ट्राच्या अस्मितेसाठी स्वतःला झोकून दिलं आणि आज? त्या देशाच्या सर्वोच्च सन्मानित वीराचा मुलगा सोनम वांगचुक जो शिक्षणासाठी, पर्यावरण सुधारासाठी लढला, जो स्वतःच्या लोकांसाठी उपोषणाला बसला; त्याला देशद्रोही ठरवलं जातं आहे.

किती विचित्र विडंबना आहे की, ज्या वडिलांनी चीनच्या अणुबॉम्बवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतःचा जीव हातावर धरला, त्याच्याच मुलावर आज 'चीन समर्थक' असल्याचा संशय घेतला जातोय. ज्यांच्या वडिलांना पद्मश्री मिळाली; त्याच्या मुलावर देशद्रोहाचा शिक्का मारला जातोयं. ज्या वडिलांच्या उपोषणाला इंदिराजींनी स्वतःच्या संवेदनशीलतेनं तोड दिलं; त्याच मुलाच्या उपोषणाला सरकार पोलिसी बंदोबस्त आणि टीव्ही प्रचारयंत्रणेतून तोडत आहे. ही फक्त सोनम वांगचुकची कहाणी नाही. ही त्या सत्तेची प्रतिमा आहे जी संवादावर नाही तर दडपशाहीवर उभी आहे. जी प्रश्न विचारणाऱ्याला शत्रू मानते. जी देशभक्तीच्या वारशालाही देशद्रोहाच्या फाइलमध्ये ढकलून देते. हा नवा भारत आहे, जिथं देशाच्या सर्वात उंच शिखरावर तिरंगा फडकवणाऱ्या वीराचा मुलगा, लोकशाहीच्या जमिनीवर उभाही राहू शकत नाही. विद्यमान सरकार आणि त्यांचं आय टी सेल त्यांना देशद्रोही ठरवण्यासाठी झाडून कामाला लागतो आणि खोटे आरोप करतो. फरक बघा सरकार म्हणजे देश आणि त्याविरुद्ध बोलेल तो देशद्रोही असं झालंय!



# अमेरिका आणि पाकमध्ये काय चालले आहे?

मध्यभागी ट्रम्प, एका बाजूला शाहबाज शरीफ आणि दुसऱ्या बाजूला असीम मुनीर... हा फोटो भारतातील आपल्यासाठी भू-राजकारणाची सर्वात महत्त्वाची प्रतिमा आहे. ती अनेक घटक प्रतिबिंबित करते.

एक म्हणजे, पाकिस्तान-अमेरिका संबंध, भारत-अमेरिका संबंधांपेक्षा जुने आणि औपचारिकरीत्या मजबूत आहेत. अबोटाबादमध्ये ओसामा बिन लादेनचा शोध आणि त्याच्या मृत्यूनंतर अमेरिकेचे पाकिस्तानवरील प्रेम थंडावले असले तरी, दोन्ही देशांमधील संबंध अबाधित राहिले. अमेरिकेने कधीही पाकिस्तानला त्यांच्या गैर-नाटो सहयोगींच्या यादीतून काढून टाकले नाही, पण भारताचाही या यादीत कधी समावेश केलेला नाही.

अमेरिकेचा अध्यक्ष कोणीही झाला तरी तो भारताचे मूल्य, दर्जा, आर्थिक प्रगती आणि स्थिरता या बाबींमुळे भारताला महत्त्व देत राहील, परंतु सध्याचे चित्र उपखंडाबाबत अमेरिकेच्या जुन्या विचारसरणीकडे परतल्याचे प्रतिबिंबित करते. २०१६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, पाकिस्तानला राजनैतिकदृष्ट्या एकटे पाडले पाहिजे, पण आज, हा हेतू सोडून देण्यात आला आहे.

काही काळापूर्वी पाकिस्तानी लष्करप्रमुख त्यांच्या पंतप्रधानांसोबत व्हाइट हाऊसमध्ये गेले होते. जुलै २०१९ मध्ये जनरल कमर जावेद बाजवा इम्रान खान यांच्यासोबत होते, पण त्यावेळी पंतप्रधान समोर होते आणि त्यांच्या मागे लष्करप्रमुख बसलेले होते हे स्पष्टपणे दिसून येत होते.

आज, निवडून आलेल्या पंतप्रधानांना त्यांच्या शेजारी बसलेल्या फील्ड मार्शलशिवाय अधिकृत दौऱ्यावर परदेशात जाणे जवळजवळ अशक्य आहे. आपण हे तियानजिन, रियाध आणि दोहामध्ये पाहिले. पाकिस्तानला तीतर आणि बटेर यापैकी एक निवडावे लागेल. त्यांना लष्करी राजवट हवी आहे की निवडून आलेले सरकार हवे आहे.

१९९३ मध्ये, बहुमत असूनही सत्तेवरून काढल्यानंतर शरीफ रावळपिंडीहून लाहोरला परतताना म्हणाले, यापैकी थोडे आणि त्यापैकी थोडे हे चालणार नाही, पण व्हाइट हाऊसमधील त्रिमूर्तीचा फोटो खूप काही सांगतो.

पाकिस्तानमधील व्यवस्था अशी आहे की लष्कराचे नियंत्रण असेल आणि एक आज्ञाधारक पंतप्रधान असेल, जो लष्कराद्वारे निवडला जाईल. पूर्वी, लष्करी हुकूमशहांनी पूर्वनिश्चित निकालांसह निवडणुकांद्वारे पक्षविरहित सरकारे स्थापन करण्याचा प्रयोग केला होता. झिया आणि जुनेजो, मुशर्रफ आणि शौकत अझीझ आठवा. अयुब आणि याह्या यांनीही भुट्टो यांना त्यांचे बिगरलष्करी मुखवटा म्हणून वापरले.

नवाझ शरीफ धाडसी होते, परंतु अनेक प्रयोगांनंतर भारतात जशी लोकशाही स्थापित झाली आहे तशीच एक दिवस पाकिस्तानात लोकशाही स्थापित होईल, अशी त्यांची आशा एक चांगल्या हेतूने केलेला भ्रम होता. त्यांनी भारताशी सामान्य संबंधांची पुनर्स्थापना ही याची गुरुकिल्ली मानली.

आज ते लाहोरजवळील रायविंड येथील त्यांच्या राजवाड्यातील घरात त्यांच्या अयशस्वी स्वप्नाबद्दल दुःख करत त्यांच्या आयुष्यातील सर्वात वाईट काळातून जात आहेत.

त्यांचा भाऊ पंतप्रधान आहे आणि त्यांची मुलगी पंजाबची मुख्यमंत्री आहे, ज्या प्रांतात पाकिस्तानची ६० टक्के लोकसंख्या आहे. या सर्व गोष्टी त्यांना बहादूर शाह जफर यांना बंडानंतर रंगूनमध्ये जाणवलेल्या निराशा आणि एकाकीपणाची आठवण करून देत असतील.

पाकिस्तानची विचारसरणी समजून घेण्यासाठी, स्वतःला विचारा की ते सातत्याने त्यांच्या नेत्यांना सत्तेवर का निवडून देते (कधी कधी प्रचंड बहुमताने) आणि नंतर त्यांना उलथवून टाकण्यासाठी लष्करी जनरल का स्वीकारते किंवा त्यांचे स्वागतही करते. हा देश त्याची विचारसरणी, त्याची स्वतःची भावना आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना लष्करी हुकूमशाही स्वीकारण्यासाठी तयार केली गेली आहे.

पाकिस्तानच्या लोकांना त्यांनी निवडलेल्या नेत्यांच्या नेतृत्वात सुरक्षित वाटत नाही. त्यांच्या सर्वात प्रिय नेत्यांना तुरुंगात टाकले तरीही ते घरीच राहतात. आपण पाहिले आहे की तेथे सैन्य कसे अप्रिय झाले आहे, तरीही त्यांनी नाट्यमय पुनरागमन केले आहे. ते एका साध्या सूत्राचे पालन करतेः भारतासोबत युद्धासारखी परिस्थिती निर्माण करा आणि लोक म्हणतील की सैन्याशिवाय त्यांचे संरक्षण कोण करू शकते?

जसे २६/११ च्या घटनेत घडले आणि आता पहलगामच्या घटनेत घडले. प्रत्येक वळणावर, लष्कराची विश्वासार्हता कमी झाली आहे. भारताकडून आलेला थोडासा धोका देखील जुनी स्थिती किंवा नवीन सामान्य पुन्हा बहाल करू शकत नाही तर शाश्वत वास्तविकता निर्माण करतो.

हे लक्षात घ्या की, पाकिस्तानमध्ये निवडणुका जिंकून सत्तेवर आलेल्या जवळजवळ प्रत्येक नेत्याने भारताशी समेट करण्याचा प्रयत्न केला. आणि नेमक्या याच कारणास्तव अशा प्रत्येक सरकारला बरखास्त करण्यात आले, हद्दपार करण्यात आले किंवा तुरुंगात टाकण्यात आले आणि एका नेत्याची दुसरी निवडणूक जिंकतील, असे वाटल्याने हत्या करण्यात आली. हे मुनीर, मुशर्रफ, झिया किंवा अयुब यांच्याबद्दल नाही.

एक संस्था म्हणून सैन्य भारतासोबत शांतता स्वीकारू शकत नाही. ते युद्ध जिंकू शकत नाही, परंतु लोकांमध्ये असुरक्षिततेची सतत भीती त्यांना सत्तेत ठेवू शकते.

अमेरिका सर्वांना ज्या निर्भर देशाह्च्या रूपात पाहू इच्छितो, तसा भारत कधी बनू शकत नाही. पण पाकिस्तान त्यांच्यासाठी तसाच देश राहिला आहे. अबोटाबादनंतर दोन्ही देशांनी परिस्थिती सामान्य करण्यात यश मिळवले आहे.


# धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि डॉ. आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी आयोजित धर्मांतर सोहळ्यात लाखो जनसमुदायासोबत बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्यानंतर देशातील बौद्ध धर्मांतर सोहळा दिवस हा धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून साजरा केला जातो.

जगात जे अनेक विद्वान होऊन गेले, त्या विद्वानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रथम दजार्चे ठरले आणि ते विश्ववंदनीय झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व असामान्य होते. पाश्चात्य विचारवंत त्यांना आदर्श स्थानी मानत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या कोलंबिया विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवली, त्या विद्यापीठाच्या लायब्ररीमध्ये आणि इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये त्यांचा अतिशय सुंदर पुतळा उभारला आहे.

पाश्चात्य राष्ट्रात विद्यार्थीदशेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र, धर्मशास्त्र, प्रशासन, समाजशास्त्र, राजनीतिशास्त्र, कायदाशास्त्र, मानवशास्त्र, घटनाशास्त्र, भाषाशास्त्र, तर्कशास्त्र, इतिहास अशा शास्त्रांचा यशस्वी अभ्यास केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार, आचार आणि कृती यांचा परस्पर समन्वय होता. त्यांची तळमळ होती, अस्मिता होती. या भारत देशासाठी विचाराने आणि कार्यकर्तृत्वाने ते दीपस्तंभासारखे होते.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांचा उद्धार केला. त्यांनी समानतेचा मूलमंत्र तथागत गौतम बुद्धांच्या तत्त्वांपासून घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पहिली राष्ट्राप्रती भूमिका ही एका देशभक्ताची होती, एका समाजसेवकाची होती व दुसरी भूमिका कायदेमंत्र्याची होती.

ते एक महान कायदे पंडित होते. तिसरी भूमिका ही घटना शास्त्राची व राष्ट्रनिर्मात्या समाजचिंतकाची होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दोन महत्त्वपूर्ण बाबी दिल्या- १) भारतीय राज्यघटना २) धम्म. त्यामुळे त्यांचा जगात फार मोठा लौकिक निर्माण झाला व ते विश्ववंदनीय ठरले. भारतीय राज्यघटना हे त्यांच्या अमाप ज्ञानाचे प्रतीक आहे.

आधुनिक भारतीय बुद्ध धम्म चळवळीचे सर्व संदर्भ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासूनच जिवंत होतात.

डॉ. बाबासाहेबांना बुद्ध धर्माचे नवयुगप्रवर्तक म्हटले जाते. बुद्ध धम्म हा जागतिक ऐक्य घडवणारा धम्म असून, हा धम्म म्हणून जगात श्रेष्ठ आहे, म्हणून त्यांनी गौतम बुद्धाला घटनात्मक दृष्ट्या पवित्र मानले आहे. बुद्ध धम्म हा जगाचा मुक्तिदाता धम्म आहे.

समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांची राजकीय व सामाजिक पातळीवर भारतात स्थापना व्हावी, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १९२७ सालापासून उत्कंठेने वाटत होते. त्यांची बीजे त्यांना तथागत बुद्धाच्या तत्त्वज्ञानात सापडली होती.



बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, जि. लातूर.
7498715661

डॉ. बाबासाहेबांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक अशा शास्त्रांबरोबरच, जलसंपदा आणि कुटुंब नियोजन, स्त्रीमुक्ती इत्यादी सर्व क्षेत्रांत भरीव योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेबांची ज्ञानतपस्या फार मोठी होती. भारत ही तथागताची जन्मभूमी आहे. बुद्ध धम्माचा पूर्ण अभ्यास करून त्यांनी, १४ ऑक्टोबर १९५६ साली न भुतो न भविष्यती अशा धम्म क्रांतीह्ल घडवून आणली.

सात कोटी बांधवांना तथागताची दीक्षा दिली. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारत भूषण ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मला बौद्ध धर्म आवडतो, कारण, जी तत्वे इतर कोणत्याही धर्मात सापडत नाही, ती मला बौद्ध धर्मात सापडतात. मला बौद्ध धर्मात प्रज्ञा, करुणा आणि समता ही तत्वे मिळतात. मनुष्याच्या चांगल्या व सुखी जीवनाला याची आवश्यकता आहे.

१९५५ नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि त्याचा धम्म या पुस्तकाचे काम सुरू केले. आपण हयात असताना पुस्तक प्रकाशन करण्याची इच्छा होती. दि. २४ मे १९५६ रोजी, ऑक्टोबर महिन्यात बौद्ध धमार्ची दीक्षा घेणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यावर चर्चा सर्वत्र सुरू झाली, शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे नागपूर स्थळ निवडले. बुद्धधर्मीय नागलोक यांची ती पुण्यभूमी आहे. त्यामुळे धर्माचे चक्र गतिमान करण्यासाठी त्यांनी निवड केली.

दि. २३ सप्टेंबर १९५६ साली धर्मांतर करत असल्याचे जाहीर केले. भिख्खू महास्थवीर चंद्रामनी यांना पाचारण केले व अनेक लाखोंच्या उपस्थितीत धर्मांतर केले. व्यासपीठावर एका टेबलावर गौतम बुद्धांची मूर्ती ठेवण्यात आली. समारंभाची सुरूवात बुद्धं सरणम् गच्छामि, संघम सरणम् गच्छामिने झाली.

जीवहत्या, चोरी, असत्य भाषण, अनाचार आणि मद्य यापासून अलिप्त राहण्याची शपथ घेतली आणि लाखो लोकांचा समूह तन्मयतेने हे सर्व पाहत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धाच्या मूर्ती समोर नतमस्तक झाले, आणि भगवान बुद्धांना वंदन केले.

बौद्ध धर्म हा खरा धर्म आहे. ज्ञान, सुमार्ग, करूणा ही तत्त्व आहेत. बौद्ध धर्म स्वीकार करून त्यांनी लाखो जनसमुदायांना पाच प्रतिज्ञा पंचशील आणि २२ प्रतिज्ञा म्हणावयास सांगितले आणि सर्व लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. दलितांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले अवघे आयुष्य वेचलं. आयुष्याच्या अगदी शेवटच्या काळात त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

१९३५ साली बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धमार्चा स्वीकार करण्याची घोषणा केली. मात्र, प्रत्यक्ष कृती करायला त्यांना २१ वर्षे जावे लागले. त्या काळात त्यांनी सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केला आणि शेवटी बौद्ध धमार्चा स्वीकार केला. या कृतीची आठवण म्हणून अजूनही दीक्षाभूमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतात. दीक्षाभूमी ही नागपूरातील आणि भारतातील एक महत्त्वाचे स्थळ आहे. आज ६८ वर्षांनंतर ही बाबासाहेबांची कृती अनेकांना प्रेरणा देते आणि देत राहील.

## : लेखकांना आवाहन :

दैनिक महासागरच्यावतिने साहित्य मैफिल ही पुरवणी दर रविवारी प्रकाशित केली जात असून, वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळतो आहे. या पुरवणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातील लेखकांकडून मोठ्या प्रमाणात साहित्य पाठविण्यात येते. तथापि, लेखकांनी त्यांचे साहित्य गुरूवारपर्यंत पोहचेल या बेताने पाठवावे. लेख पाठविताना शब्द मर्यादेचे भान असू द्यावे. आपले साहित्य nagpurpost@gmail.com या मेलआयडीवर युनीकोडमध्ये पाठवावे.

■ संपादक



# कधी लग्न करतेय श्रीया?

सचिन आणि सुप्रिया पिळगावकर ही मराठी चित्रपटसृष्टीमधील अतिशय लोकप्रिय जोडी आहे. त्यांची मुलगी श्रीया पिळगावकर हिने एकुलतीएक या चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण केले. तिने अनेक वेब सिरीजमध्येही काम केले आहे. नुकत्याच आलेल्या 'मंडला मर्डर्स' या वेब सिरीजमुळे ती आता 'वेब सिरीज क्वीन' म्हणून ओळखली जाते. तिच्या अभिनयाला प्रेक्षक आणि समीक्षक दोघांकडूनही भरभरून दाद मिळाली आहे. पण सध्या श्रीया एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आहे. तिला नुकतेच एका मुलाखतीमध्ये लग्नाविषयी विचारण्यात आले. होणाऱ्या नवऱ्याविषयी आणि लग्नाबाबत श्रीयाने एका यूट्यूब चॅनेलशी बोलताना अगदी स्पष्ट मत मांडले. ती म्हणाली, 'गेल्या वर्षभरापासून लोक मला लग्न कधी करणार, हा प्रश्न विचारत आहेत. पण यावर उत्तर द्यायचा माझ्यावर कधीच दबाव नव्हता. माझ्या आईवडिलांनासुद्धा पूर्ण कल्पना आहे की, ज्याच्यावर मी पूर्ण विश्वास टाकू शकते, असे भासवणारा मुलगा मला भेटेल तेव्हा मी लग्न करेन. हा निर्णय घाईघाईत घ्यायचा नाही हे माझं ठरलं आहे. लग्न करायचे नसेल तरी आईवडिलांचा मला पाठिंबा आहे. पण त्यांनी सांगितले आहे, करायचे असेल तर कोणी तरी मुलगा अचानक नाट्यमयरितीने समोर येऊन उभा राहील.. हे फक्त चित्रपटातच घडते. असे काही आपोआप झाले नाही तर तुलाही थोडे प्रयत्न करावे लागतील!



भिवंडीतील एका दुर्मिळ आजाराने ग्रस्त असलेल्या लहानग्याच्या उपचाराचा संपूर्ण खर्च बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसने उचलला आहे. भिवंडीतील नासिर शेख यांचा ११ महिन्यांचा मुलगा मोहम्मद मेहबूब शेख जन्मापासून हायड्रोसिफलस या गंभीर आजारानं ग्रस्त आहे. या आजारात डोक्यात पाणी साचत असल्याने डोक्याचा आकार मोठ्या प्रमाणात वाढतो. सध्या या बाळाच्या डोक्याचे

# बाळाच्या मदतीसाठी जॅकलिन तयार

वजन तब्बल १० ते १२ किलो आहे. मजुरी करणाऱ्या नासिर शेख यांना उपचाराचा १५ ते २० लाख रुपयांचा खर्च न परवडणारा आहे. ही हृदयस्पर्शी गोष्ट बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसच्या कानावर गेल्यानंतर तिने स्वतः पुढाकार घेतला आणि मोहम्मद मेहबूब शेखच्या संपूर्ण उपचाराचा खर्च उचलण्याची जबाबदारी स्वीकारली. सध्या या लहानग्याचा उपचार लिलावती रुग्णालयात सुरू आहे. जॅकलिन फर्नांडिसने स्वत: रुग्णालयात जाऊन बाळाची भेट घेतली. तिच्या मायेनं आणि आधारानं नासिर शेख यांचे संपूर्ण कुटुंब भारावून गेले. जॅकलिन फर्नांडिसच्या स्वभावाचा एक वेगळाच पैलू यानिमित्ताने समोर आला आहे.



# ४८ व्या वर्षीही एकदम फिट !

जलेबी बाई आणि बोल्ड भूमिकांमुळे कायम चर्चेत असलेली अभिनेत्री म्हणजे मल्लिका शेरावत. वयाच्या ४८ व्या वर्षीही मल्लिका शेरावत फिट अँड फाईन आहे. मल्लिकाने नुकतेच तिचे शरीर सुडौल आणि निरोगी ठेवण्याचे रहस्य उघड केले आहे. मल्लिकाने इंस्टाग्राम वर हे रहस्य सांगितले. ती म्हणाली, 'मी दररोज अय्यंगार योग करते. फिट राहण्याचे रहस्य कोणत्याही फास्टफूड किंवा ट्रेंडी डायटमध्ये नाही. ते शिस्तबद्ध आणि नियमित योगासनावर आहे.' अय्यंगार योग ही डी. के. एस. अय्यंगार यांनी विकसित केलेली योगाची एक शैली आहे. हा योग सर्वयोगटांसाठी उपयुक्त आहे. योगासनांमुळे शरीराची शक्ती आणि लवचिकता वाढते. मल्लिकाच्या मते नियमित योगाभ्यास सर्वांगीण विकासासाठी फायदेशीर आहे. त्यामुळे एकाग्रता, संयम आणि वाढतो. कोणताही शॉर्टकट किंवा ट्रेंडी उपाय कायमचा फिटनेस देऊ शकत नाहीत. मल्लिका म्हणते, फिटनेसचा अर्थ केवळ सुंदर दिसणे नाही. त्यासाठी आरोग्य आणि जीवनशैलीत संतुलन राखणे आवश्यक आहे. तिच्यासाठी योग केवळ व्यायाम नसून दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मर्डर, ख्वाहिशे, डर्टी पॉलिटिक्स, प्यार के साइड इफेक्ट्स, गुरु, वेलकम, बचके रहना रे बाबा, डबल धमाल या सिनेमांमध्ये मल्लिका शेरावत झळकली आहे. 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' या चित्रपटातही मल्लिकाने कॉमेडी भूमिका साकारली आहे.

# कांतारा आणि सनी संस्कारी चर्चेत

सध्या दोन अगदी वेगळ्या प्रकारच्या चित्रपटांची चाहत्यांमध्ये चर्चा आहे. एक आहे हलकाफुलका रोमँटिक-कॉमेडी ड्रामा आणि दुसरा पारंपरिक कथा व पौराणिक वातावरणाने सजलेला ॲक्शन-ड्रामा प्रीक्वेल. 'कांतारा: चॅप्टर १' चे दिग्दर्शन ऋषभ शेट्टी यांनी केले आहे.

या चित्रपटात ऋषभ शेट्टी, सप्तमी गौडा, जयराम, रुक्मिणी वसंत आणि गुलशन देवैया यांच्या भूमिका आहेत. हा चित्रपट 'कांतारा: चॅप्टर १' हा होम्बाले फिल्म्सच्या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे. निसर्ग आणि माणसं यांच्यातील संघर्ष या कथेत दाखवला आहे. हा चित्रपट 'कांतारा' चा प्रीक्वल म्हणजे आधीची कथा आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना पांजुर्ली देवतेची आणि गुलिगा देवतेची कथा पाहायला मिळेल. या दोन्ही देवता 'कांतारा'च्या कथेचा एक महत्त्वाचा भाग होत्या. हा चित्रपट कर्नाटकच्या सुंदर डोंगराळ भागात चित्रित केला गेला आहे. दरम्यान, 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' हा धर्मा प्रॉडक्शन्सचा नवा महत्वाकांक्षी चित्रपट आहे. या चित्रपटात वरुण धवन सनी संस्कारीची भूमिका साकारत आहे, तर जान्हवी कपूर तुलसी कुमारीच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक खैतान करत आहेत.



या चित्रपटात रोहित सराव, सान्या मल्होत्रा, मनिष पॉल आणि अक्षय ओबेरॉय देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. चित्रपटाचे कथानक दिल्लीतील एका काल्पनिक घटनेवर आधारित आहे. या कथेत माजी प्रियकर जुन्या प्रेम कहाणीत परत येतात आणि त्यामुळे होणाऱ्या गोंधळाचे चित्रण या कथेत केले आहे. हा चित्रपट करण जोहरच्या 'दुलहनिया' फ्रँचायझीचा तिसरा भाग असण्याची शक्यता आहे.



# राणी मुखर्जीचा छा गयी...

ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जीला तिच्या उत्कृष्ट अभिनयासाठी नुकतेच राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'मिसेस चॅटर्जी विरुद्ध नॉर्वे' चित्रपटातील दमदार अभिनयासाठी तिला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' हा सन्मान मिळाला. या कार्यक्रमाच्या वेळी राणीने एकदम साधी वेशभूषा केली होती. सोनेरी बॉर्डर असलेल्या कॉपर ब्राऊन रंगाच्या साडीत राणी मुखर्जी अतिशय सुंदर दिसत होती. तिने गळ्यात दिल्खेचक पर्ल चोकर सेट आणि डायमंड स्टडेड चेन घातली होती. पुरस्कार स्वीकारल्यानंतर राणी मुखर्जी म्हणाली, 'हा सन्मान माझ्यासाठी खूप खास आहे, कारण आता माझ्या अभिनय कारकिर्दीची ३० वर्षे पूर्ण झाली आहेत. मी हा पुरस्कार माझे दिवंगत वडील राम मुखर्जी यांना समर्पित करू इच्छिते. त्यांच्या आशीर्वादामुळे आणि माझ्या आईच्या प्रेरणेमुळेच मी ही भूमिका साकारू शकले.'



# त्रिशा ठोसरचा ठसा

त्रिशा ठोसर या सहा वर्षाच्या मुलीने सर्वोत्कृष्ट बाल कलाकाराचा राष्ट्रीय पुरस्कार जिंकून इतिहास रचला आहे. गेल्या ७० वर्षामध्ये सर्वात लहान वयात हा पुरस्कार मिळवणारी ही पहिली बालकलाकार आहे. 'नाळ २' या मराठी चित्रपटातील 'चिमी' या भूमिकेसाठी त्रिशाला हा सन्मान मिळाला. नवी दिल्लीतील विज्ञान भवनात झालेल्या भव्य समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्रिशाला सुवर्णकमळ पुरस्कार, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्रिशाचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. पुरस्कार सोहळ्यात अनेक दिग्गजांनी तिचे कौतुक केल्याचे पहायला मिळते आहे. गोडगोडुल्या त्रिशाने याआधी प्रसिद्ध चित्रपट निर्माते महेश मांजरेकर आणि अभिनेता सिद्धार्थ जाधव यांच्याबरोबर 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटात काम केले आहे.

# खमंग चुरचुरीत वडापाव

नावापासूनच खमंग असणाऱ्या 'वडापाव' या नव्या चित्रपटात प्रसाद ओकसोबतच अभिनय बेर्डे, गौरी नलावडे आणि रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट कॉमेडी, भावनिक क्षण आणि नातेसंबंधांवर भाष्य करणारा आहे. हा चित्रपट प्रसाद ओक यांच्या अभिनय कारकिर्दीतील शंभरावा चित्रपट आहे. या चित्रपटात ते प्रथमच दिग्दर्शक आणि अभिनेते अशा दुहेरी भूमिकेत झळकणार आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी आणि त्यांच्या चाहत्यांसाठी हा चित्रपट अधिकच संस्मरणीय ठरणार आहे. 'वडापाव' चित्रपटाविषयी बोलताना प्रसाद ओक म्हणाले, की आमचा हा चित्रपट तीन पिढ्यांची गोष्ट सांगतो. घरातील तीन पिढ्या एकत्र बसून वडापावचा जसा मनसोक्त आस्वाद घेतात तसाच संपूर्ण कुटुंबाने एकत्र पहावा, असा हा चित्रपट आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच पार पडला. त्यावेळी महाराष्ट्राचा लाडका अभिनेता रितेश देशमुखने हजेरी लावली होती आणि या चित्रपटाचे भरभरून कौतुकही केले. त्यामुळे मराठी सिनेसृष्टीत 'वडापाव'ची चर्चा रंगली आहे.



# ऋषि कपूरकन्या रिद्धिमाचे पदार्पण

कपूर खानदानाचे हिंदी चित्रपटसृष्टीत फार मोठे योगदान आहे. या कुटुंबातील पृथ्वीराज कपूर यांच्यापासून थेट रणबीरकपूरपर्यंत सर्वांनीच सिनेसृष्टी गाजवली. आता ऋषि कपूर, नीतू कपूर आणि रणबीर यांच्या पावलावर पाऊल ठेवून रिद्धिमा सहानी-कपूर सिनेमाच्या झगमगत्या दुनियेत पाऊल ठेवते आहे. रिद्धिमा लवकरच कपिल शर्माच्या चित्रपटामध्ये दिसणार आहे. विशेष म्हणजे वयाच्या ४५ व्या वर्षी रिद्धिमाने अभिनयक्षेत्रात प्रवेश केला आहे. फराहखानबरोबर एका कुक शो मध्ये रिद्धिमाने सांगितले, की मुलगी समारा हिला घरात एकटे सोडून शूटिंग करणे तिच्यासाठी अतिशय अवघड गोष्ट होती. 'दादी की शादी' नावाच्या या चित्रपटात ती कॉमेडियन कपिल शर्माबरोबर स्क्रीनवर येणार आहे. या चित्रपटासाठी कपिलनेच रिद्धिमाचे नाव सुचवले होते. चित्रपटाचे बहुतेक शूटिंग आता पूर्ण झाले आहे. रिद्धिमा म्हणाली, 'चित्रपटात काम करण्याविषयी मी विचार केला नव्हता. पण एक दिवस 'तुम्ही हा रोल करू शकाल का?' असे विचारणारा एक फोन आला. माझ्या घरी विचारून त्यासंबंधी ठरवण्याचा सल्ला माझ्या आईने मला दिला. अर्थात रिद्धिमा या क्षेत्रात अगदीच नवी नाही. खूप पूर्वी करण जोहरच्या 'फेब्युलस लाईफ ऑफ बॉलीवूड वाईफ' या शो मध्ये तिने काम केले होते. स्टार वाइफचे खरेखुरे आयुष्य दाखवणारा तो शो होता.

